## महाराष्ट्रात एटीएसने पकडले २२ बांगलादेशी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
नांदेड, अकोला, जालना, जळगाव, धुळे, कल्याण येथे २२ बांगलादेशींना पकडण्यात आले. त्या सर्वांकडे बनावट आधार कार्ड सापडले. आधार कार्डच घुसखोरीचे सेफ कार्ड ठरले आहे.

बनावट कागदपत्रांवरून आधार कार्ड बनवणाऱ्या दिल्ली, पश्चिम बंगालमधील रॅकेटमुळे बांगलादेशी घुसखोर सहज भारतात प्रवेश करत आहेत. एका अॅपद्वारे ते बांगलादेशातील आपल्या नातेवाइकांशी संपर्क साधत आहेत. त्यांच्याकडे पॅन कार्ड, मतदान कार्डही सापडले आहेत. यासीन खान अन्वर खान याने भारतात आल्यानंतर आपले नाव सुमन विकास बिस्वास (२५) असे बदलले.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात



* वर्ष ५४ * अंक २८० * * नागपूर * | मंगळवार, दिनांक ७ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


### अग्राग्रलेख
### खरीखरी..

## आणखी किती शहीद होणार

आज छत्तीसगडमध्ये आपले नऊ वीर जवान शहीद झाले. 1976 सालापासून नक्षलवादी चळवळ सुरू झाली. ज्या पश्चिम बंगाल मधून या चळवळीचा जन्म झाला. त्या पश्चिम बंगालमध्ये माओवाद आणि रक्त सांडणे सध्यातरी कमी झालेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तत्कालीन माओवाद्यांनी उच्छाद मांडला होता. त्याला उत्तर म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी भूदानाची कल्पना राबवली आणि त्या काळात विनोबाजींना अनेकांनी आपापल्या जमिनी दिल्या. त्यानंतर पोट्टी श्रीरामुलू यांनी तत्कालीन मद्रास राज्यातून आंध्र प्रदेश वेगळा व्हावा, म्हणून केलेल्या उपोषणानंतर त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर मग आंध्रप्रदेश वेगळा निघाला. काही वर्षांपूर्वी आंध्र प्रदेशातून तेलंगणा वेगळा निघाला आणि तेलंगणामधील ही चळवळ संपली. आता छत्तीसगड आणि महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया सारख्या जिल्ह्यातील भागात सध्या तरी माओवाद्यांचा खूनखराबा सुरू आहे. या अशा प्रकारच्या हल्ल्याच्या अनेक घटना आपल्या महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा आणि छत्तीसगडमध्ये सतत सुरू असतात. सरकारची अत्यंत कार्यक्षम यंत्रणा व्यवस्थित कार्यरत असताना सामूहिक रितीने आपले जवान मारले जातात, असे अनेकदा घडते ते फार चिंताजनक आहे. ज्या वीर जवानांचा जीव जातो. ते वीर जवान आपल्यासाठी किती मौल्यवान आहेत, हे आम्हाला सांगायची गरज नाही. पण परिस्थितीच अशी आहे की, आपण कितीही बोंबा ठोकल्या तरी देशातील जंगलामध्ये अजूनही काही भागात या माओवाद्यांचे राज्य चालते. काही वर्षांपूर्वी एका अशाच प्रकारच्या घातपातात काँग्रेसच्या अनेक नेत्यांचा मृत्यू झाला होता. शहीद जवान आणि अधिकाऱ्यांचे मृतदेह पाहताना काळजात धस्स होते. आपण म्हणतो की आपल्याजवळ अत्याधुनिक यंत्रणा आहे. पण ती अत्याधुनिक यंत्रणाही हतबल का होते ते कळत नाही. फक्त अशी घटना घडली की आपण मोठ्या काळजीने त्या घटनेचे वर्णन वाचतो. आपले अनेक नेते यापुढे अशा घटना घडू देणार नाही, अशा वल्गना करतात. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, आज नेते अत्यंत गंभीरपणे प्रतिक्रिया देतात आणि पुढच्या महिन्या-दीड महिन्यात अशाच प्रकारच्या हल्ल्यामध्ये आपल्या जवानांचा जीव जातो. हे जवान त्यांच्या वाहनातून जात असताना जंगलातून जे जे मार्ग असतात. त्याच्या मार्गांची तपासणी आपल्या अत्याधुनिक साधनांनी आणि उपकरणांनी करता येत नाही काय. आम्ही त्या विषयातील तज्ञ नाही. त्यामुळे संबंधित अधिकारी किंवा सरकारवर विनाकारण आरोप करणे आमच्या स्वभावात नाही आणि तसे करणे शोभतही नाही. पण एक गोष्ट मात्र नक्कीच आहे, ती म्हणजे या अशा हल्ल्यात ज्यांचा ज्यांचा जीव जातो त्यांच्या कुटुंबीयांवर कशी आणि किती आपत्ती कोसळत असेल. या कल्पनेनेच अंगावर शहारे उठतात. आपण जम्मू काश्मीर शांत आहे म्हणून सुखी होतो. पण ते सुखही क्षणभंगुर असते हे आपण नेहमीच बघत आलो आहोत. आताची ही घटना अशा प्रकारच्या अपघात मालिकेतील कितवी घटना आहे. ते सुद्धा आपल्याला आठवत नसेल एवढे हल्ले झालेले आहेत. आम्हाला एकाच गोष्टीचे नवल वाटते ते हे की, आता आपल्या अंतर्गत लढायांमध्ये आपण किती बळी जाऊ देणार आहोत. आणखी किती शहीद होणार आहेत. दुसऱ्या देशाने हल्ला केला तर ते युद्ध आपण समजू शकतो. पण हे अंतर्गत हल्ल्याचे षडयंत्र कोणाकोणाचे कसे कसे जीव घेतात. त्यामुळेच स्वतंत्र भारतावरील हे आक्रमण कसे थांबवावे, याचा आता आपल्या सरकारने अत्यंत गांभीयार्ने विचार केला पाहिजे. आम्ही त्या वीर शहीद जवानांना आदरांजली अर्पण करतो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### नक्षलवाद्यांनी घडवला सुरक्षा दलाच्या वाहनाचा स्फोट

# ८ जवान शहीद

### चालकही ठार
### छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातील घटना

■ वृत्तसंस्था
रायपूर (छ. ग.), दि. ६ :
छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी जवानांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा स्फोट केला आहे. या हल्ल्यात ८ जवान शहीद झाले आहेत. या स्फोटात एका चालकाचाही मृत्यू झाला. बस्तर रेंजच्या आयजींनी स्फोटाला दुजोरा दिला आहे.

बस्तर रेंजचे आयजी सुंदरराज पी यांनी सांगितले की, विजापूरमधील संयुक्त ऑपरेशन पार्टी ऑपरेशननंतर परतत होती. सोमवारी दुपारी २.१५ च्या सुमारास नक्षलवाद्यांनी आंबेली गावाजवळ आयईडी स्फोट घडवून आणला.


स्फोटानंतर जवानांचे मृतदेह आणि शस्त्र रस्त्यावर पडले होते. स्फोटात स्कॉर्पिओ गाडीची अशी दुर्दशा होवून तुकडा ३० फूट अंतरावर जावून पडला.

दरम्यान, शनिवारी रात्री उशिरा अबुझमदच्या जंगलात चकमकीत एक डीआरजी जवान हेड कॉन्स्टेबल सन्नू करम शहीद झाला. त्याचवेळी जवानांनी एका महिला नक्षलवाद्यांसह ५ माओवाद्यांचा खात्मा केला होता.

कुत्रु गाव विजापूर मुख्यालयापासून ४० किलोमीटर अंतरावर आहे. येथून काही अंतरावरील आंबेली गावाजवळ हा स्फोट झाला. जवान गस्त घालण्यासाठी खासगी वाहनाने जात होते. घटनास्थळी १० ते १२ फूट खड्डा दिसत आहे. त्याचवेळी स्कॉर्पिओ गाडीचे पार्ट विखरून स्कॉर्पिओ गाडीचा तुकडा ३० फूट अंतरावर असलेल्या झाडाला लटकलेला दिसून आला.

## चकमकीत ३ नक्षल्यांना कंठस्नान

छत्तीसगडमधील गरियाबंद जिल्ह्यातील नक्षलग्रस्त सोरनामल जंगलात सुरक्षा दलांनी ३ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. डीआरजी (जिल्हा राखीव रक्षक) आणि एसटीएफ (स्पेशल टास्क फोर्स) पथकांनी नक्षलवाद्यांना घेरले असल्याचे सांगण्यात येत आहे. छत्तीसगड आणि ओडिशा या दोन्ही राज्यांतील सुमारे ३०० सैनिक घटनास्थळी उपस्थित असल्याची माहिती आहे.

ओडिशातील नवरंगपूरलाही जवानांनी वेढा घातला होता, त्यामुळे नक्षलवाद्यांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. गरीबीबंदचे एसपी निखिल राखेचा यांनी याला दुजोरा दिला आहे.

नक्षलवादी बस्तरमधून पळून गरियाबंद भागात आले होते. या कारवाईत सुरक्षा दलांनी अनेक स्वयंचलित शस्त्रेही जप्त केली आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटवली जात आहे.

परिसरात दक्षता वाढवण्यात आली आहे. या मोहिमेमुळे नक्षलवादी कारवायांना आळा घालण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात येते.

## नागपुरात ३ वाघांसह एका बिबट्याचा मृत्यू

### एच ५ एन १ व्हायरसचा प्रकोप?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



एचएमपीव्ही व्हायरसने भारतात शिरकाव केल्यामुळे देशात खळबळ माजली असताना आता एव्हियन एच५एन१ व्हायरसच्या संसर्गामुळे महाराष्ट्रातील प्राणी संग्रहालयांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

नागपुरातील प्राणी संग्रहालयातील ३ वाघांसह एका बिबट्याचा या विषाणुच्या संसर्गामुळे मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा अलर्ट जारी करण्यात आला आहे. या अलर्टमुळे राज्यभरातील प्राणी संग्रहालये उद्यापासून बंद ठेवली जाण्याची शक्यता आहे.

## कोरोनासदृश चिनी विषाणूचा भारतात तिसरा रुग्ण

चीनमधील अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ही गर्दी एचएमपीव्ही विषाणूची लागण झालेल्या लोकांची असल्याचा दावा केला जात आहे. चीनमध्ये पसरलेल्या कोरोना सदृश विषाणूचा तिसरा रुग्ण भारतात आढळून आला आहे. अहमदाबादमध्ये एका २ महिन्यांच्या बाळाला ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) ची लागण झाल्याचे आढळून आले. तत्पूर्वी, सोमवारीच कर्नाटकात ३ महिन्यांची मुलगी आणि ८ महिन्यांच्या मुलामध्ये हाच विषाणू आढळला होता.

कर्नाटकातील दोन्ही प्रकरणांबाबत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सांगितले होते की, मुले नियमित तपासणीसाठी रुग्णालयात पोहोचली होती. चाचणी केल्यानंतर त्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला. मात्र, मुलांचे नमुने सरकारी प्रयोगशाळेत नव्हे तर खासगी रुग्णालयात तपासण्यात आल्याचे कर्नाटक आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी केले जम्मू रेल्वे विभागाचे उद्घाटन



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जम्मूच्या नवीन रेल्वे विभागाचे आणि तेलंगणातील चारलापल्ली न्यू टर्मिनल स्टेशनचे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी पूर्व तटीय रेल्वेच्या रायगड रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणीही केली.

पंतप्रधान म्हणाले, गेल्या दशकात भारतीय रेल्वेचे ऐतिहासिक परिवर्तन झाले आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये दृश्यमान बदल झाला आहे. यामुळे देशाची प्रतिमा बदलली आणि देशवासीयांचे मनोबलही वाढले. गेल्या 10 वर्षांत रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रचंड विस्तार झाला आहे. 2014 पर्यंत देशातील केवळ 35% रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण झाले होते. आज आपण रेल्वे मार्गांच्या 100% विद्युतीकरणाच्या जवळ आहोत.

## ताज हॉटेलमध्ये एकाच नंबरच्या २ कार आढळल्या

### पोलिसांकडून तपास

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ६ :
येथील ताजमहाल हॉटेलमध्ये एकसारख्या नंबर प्लेट असलेली दोन वाहने सापडली आहेत. दोन्ही वाहने एकाच मॉडेलची असून हॉटेलच्या गेटच्या आत होती. ही वाहने संशयास्पद वाटन पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

## तामिळनाडूच्या राज्यपालांचे विधानसभेतून वॉकआउट

■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. ६ :
तामिळनाडू विधानसभेच्या अधिवेशनात सोमवारी सभागृहात उच्चस्तरीय नाट्य घडले. राज्यपाल आरएन रवी यांनी राष्ट्रगीताचा अवमान झाल्याचा आरोप करत अभिभाषण करण्यास नकार देत विधानसभेतून वॉकआउट केले. यापूर्वीही फेब्रुवारी 2024 मध्ये त्यांनी असे केले होते.

परंपरेनुसार, तमिळ थाई वाल्थू हे राज्यगीत सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला गायले जाते आणि शेवटी राष्ट्रगीत गायले जाते. मात्र राज्यपाल रवी यांनी या नियमावर आक्षेप घेत राष्ट्रगीत दोन्ही वेळी गायले पाहिजे, असे सांगितले.

राजभवनने एका निवेदनात म्हटले आहे की, आज पुन्हा एकदा तामिळनाडू विधानसभेत भारताच्या संविधानाचा आणि राष्ट्रगीताचा अपमान करण्यात आला. राष्ट्रगीताचा आदर करणे हे आपल्या राज्यघटनेत नमूद केलेल्या पहिल्या मूलभूत कर्तव्यांपैकी एक आहे. आज राज्यपाल सभागृहात आले तेव्हा फक्त तामिळ थाई वाझाथू गायले गेले. राज्यपालांनी घटनात्मक कर्तव्याची आठवण करून दिली आणि मुख्यमंत्री, सभागृह नेते आणि सभापती यांना राष्ट्रगीत गाण्याचे आवाहन केले. तथापि, त्यांनी नकार दिला, ही गंभीर बाब आहे, त्यामुळे राज्यपालांनी सभागृह सोडले.

### सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण

## शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांनी गेल्या महिन्यात निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेवरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरत रान उठवलं आहे.



याचदरम्यान शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहीलं आहे. या हत्याप्रकरणातील आरोपी अद्याप मोकाटच असल्याची जनभावना असल्याचं नमूद करत संतोष देशमुख हत्या म्हणून माणुसकीला काळिमा फासणारी घटना असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

या हत्याप्रकरणा वेगवेगळ्या मंचावरून अनेक नेते सातत्याने आवाज उठवत असून त्यांच्या जीवाला धोक उत्पन्न होऊ शकतो अशी भीती व्यक्त करत राज्य शाससाने तातडीने या नेत्यांना सुरक्षी पुरवावी अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची महिनाभरापूर्वी काही गुंडांनी निर्घृण हत्या केली. या क्रूर घटनेला भला मोठा काळ उलटून गेला असला तरी देशमुख यांचे मारेकरी अद्याप मोकाटच असल्याची जनभावना आहे. त्यामुळे, या संपूर्ण घटनेला फार मोठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे निदर्शनास येते. बीड- परळी भागात यापूर्वी देखील माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा अनेक घटना घडल्या आहेत.

त्यामुळे या गुंड प्रवृत्तीची पाळेमूळे खणून काढण्याची राज्यभरातील अनेक लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे व त्यासाठी ते सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करत आहेत.

असे असताना याच गुंडांपासून या लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर लोकप्रतिनिधींच्या व इतर नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेत त्यांना राज्य शासनामार्फत योग्य ते पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

## ऑनर किलिंग : भावानेच घेतला लाडक्या बहिणीचा जीव

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ६ :
ऑनर किलिंगच्या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगर शहर पुन्हा एकदा हादरले आहे. १७ वर्षीय मुलीची डोंगरावरून ढकलून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

प्रेम प्रकरणातून सख्ख्या चुलत भावानेच आपल्या बहिणीला २०० फूट उंच डोंगरावरून ढकलून दिले. नम्रता गणेश शेरकर असे मृत मुलीचे नाव आहे. तर ऋषिकेश तानाजी शेरकर असे आरोपी भावाचे नाव आहे.




नम्रता ही अंबड तालुक्यातील शहागड येथील रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी ती घर सोडून निघून गेली होती. आपल्या जीवाला घरच्यांकडून धोका आहे, अशी तक्रारही तिने शहगड पोलिस ठाण्यात दिली होती. काकाचा मुलगा ऋषिकेश यानेच नंतर तिला दरीत ढकलून ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## वाघाचे तीन तुकडे करून जंगलात फेकले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
तुमसर तालुक्यातील वनपरिक्षेत्रांतर्गत झंजेरिया गावाजवळील घनदाट जंगलात एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला, विशेष म्हणजे त्याच्या मृतदेहाचे तीन तुकडे आढळल्याने एकच खळबळ उडाली असून मृत वाघाचे तुकडे करून जंगलात कुणी फेकले, या दिशेने शोध सुरू झाला आहे.

ही घटना आज सोमवार ६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. विशेष म्हणजे, मृतावस्थेत आढळलेला वाघ तीन तुकड्यात दिसून आला. पंधरा दिवसातील वाघ मृत आढळल्याची दुसरी घटना आहे.

ही शिकार की वाघाच्या झुंजीत मृत्यू झाला याचा वन विभागाकडून शोध सुरू आहे. तुमसर वन परिक्षेत्रात मागील काही दिवसांपूर्वी वाघाचे दर्शन झाल्याने येथील भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विदभार्तील जंगल परसरात गेल्या १० दिवसांत दोन वाघांची शिकार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

८ दिवसांपूर्वी तुमसर येथे एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. त्यानंतर आज सकाळी एका वाघाचे दोन तुकडे करुन त्याची शिकार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. याबाबत माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

विजेच्या प्रवाहाने या वाघाची शिकार करून दोन तुकडे केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सध्या वनाधिकारी घटनास्थळावर पोहचले असून उत्तरीय तपासणीनंतर वाघाच्या मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होईल, असं वनाधिकाऱ्यांनी सांगितलं. दरम्यान, आठवडाभरापूर्वी तुमसर वन विभागाच्या लेंडेझरी परिसरात वाघ मृतावस्थेत आढळला होता, त्यानंतर ८ दिवसांतच आणखी एका वाघाचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच, वन विभागतही अलर्ट मोडवर आहे.

## २१०० रुपये मिळणार म्हणून बोलावत भाजप सदस्य नोंदणी?

■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. ६ :
शहरासह जिल्ह्यात भाजप सदस्य नोंदणीला सुरुवात झाली आहे. या सदस्य नोंदणीचा रविवारी शेवटचा दिवस होता. दरम्यान, नांदेड मधील सांगवी भागात २१०० रुपये मिळणार म्हणून महिलांची नोंदणी करून घेण्यात आली. परंतु त्यांच्या मोबाईलवर भाजप सदस्य झाल्याचा मेसेज आला.

त्यामुळे भाजप पदाधिकाऱ्यांनी दिशाभूल करून आमची नोंदणी केल्याचा आरोप महिलांनी केला. नांदेड शहरातील श्रीनगर, आयटीआय कॉर्नर, सांगवी नाका यासह अन्य भागांमध्ये विशेष मोहीम राबवून भाजप पदाधिकाऱ्यांनी नोंदणी केली. मात्र, त्यासाठी २१०० रुपये मिळणार असल्याचे सांगितल्याने महिलांनी नोंदणीसाठी मोठी गर्दी केली होती. या महिलांची नोंदणी सुद्धा करून घेण्यात आली. तथापि, नंतर त्यांना त्यांच्या मोबाईलवर त्या भाजपाच्या सदस्य झाल्याचा संदेश आला. परिणामी, आपली फसवणूक करण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे.

### १०० बँक खाती, १ हजार कोटींची मालमत्ता

## आ. धस यांचा पुन्हा गौप्यस्फोट

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ६ :
मंत्री धनंजय मुंडे व खंडणी प्रकरणात अटक झालेल्या वाल्मीक कराड यांचे अनेक ठिकाणी संयुक्त भूखंड असल्याचा दावा आमदार सुरेश धस यांनी केला आहे.

संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणात आका हे वाल्मीक कराड आहेत, तर आकाचे आका हे धनंजय मुंडे आहेत. या दोघांच्या अनेक ठिकाणी मालमत्ता आहेत. या लोकांनी आपल्या ड्रायव्हरच्या नावाने पुण्यात एक मजलाच बूक केला आहे, असे ते म्हणालेत.

सुरेश धस सोमवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडची बार्शी तालुक्यात ४५ एकर, सोनपेठ तालुक्यात ४५ एकर, दुसरीकडे ५० एकर, शिरसी तालुका माजलगाव येथे ४५ ते ५० एकर जमीन आहे.

पुण्यातील मगरपट्टी सिटी येथे एक नवीन इमारत आहे. तिथे या लोकांनी आपल्या ड्रायव्हरच्या नावाने अख्खा मजलाच बुक केला आहे. हे पैसे धनंजय मुंडे यांचे नव्हेत तर कुणाचे आहेत? वाल्मीक कराड १७ मोबाइल वापरतात. त्यांचे १०० बँक अकाउंट सापडले आहेत. त्या अकाउंटमध्ये १ हजार कोटींहून अधिक जमा मुद्दल असण्याची शक्यता आहे. मुंडे - वाल्मीक कराडला वेगळे करताच येत नसल्याचे धस म्हणाले.



### आरोप फेक नरेटीव्ह

बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले मंत्री धनंजय मुंडे यांनी आज उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना धनंजय मुंडे यांनी आपल्यावरील विरोधकांचे आरोप फेक नरेटीव्ह असल्याचा दावा केला. तसेच अजित पवारांशी मस्साजोग प्रकरणावर कोणतीही चर्चा झाली नसल्याचाही दावा केला. त्यांच्या या दाव्यामुळे संतोष देशमुख हत्याकांडाचा मुद्दा अधिकच तापण्याची शक्यता आहे.

या दोन्ही नेत्यांत जवळपास तासभर चर्चा झाली. पण त्याचा तपशील बाहेर आला नाही. पण सूत्रांनी या दोन्ही नेत्यांतील चर्चेचा केंद्रबिंदू देशमुख यांची हत्या व विरोधकांनी केलेली राजीनाम्याची मागणी हा असल्याचा दावा केला आहे.

## मुलांना विष देऊन दाम्पत्याची आत्महत्या

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ६ :
बंगळुरूमध्ये सोमवारी एकाच कुटुंबातील ४ जणांचे मृतदेह त्यांच्या घरातून सापडले.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती-पत्नीने आधी मुलांना विष पाजले. यानंतर त्यांनी गळफास लावून घेतला.

प्रयागराज, यूपी येथील रहिवासी अनुप कुमार (३८) हे पत्नी राखी (३५), मुलगी अनुप्रिया (५) आणि मुलगा प्रियांश (२) यांच्यासोबत राहत होते. अनूप हा एका खासगी कंपनीत सॉफ्टवेअर सल्लागार होता. सोमवारी सकाळी त्यांच्या घरी काम करणारी महिला आली होती. तिने बेल वाजवली, पण अनूपच्या घराचा दरवाजा काही उघडला नाही. तिने शेजाऱ्यांना सांगितले. त्यांनीही प्रयत्न केला, पण दरवाजा उघडला नाही. यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस आल्यावर दरवाजा उघडला गेला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुप आणि राखी यांचे मृतदेह लटकलेले होते. दोन्ही मुलांचे मृतदेह जमिनीवर पडले होते. पोलिसांनी मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवले. घर सील करण्यात आले आहे. अनुप आणि राखी यांची मोठी मुलगी अनुप्रियाची प्रकृती ठीक नसल्याचे शेजाऱ्यांनी पोलिसांना सांगितले. तिला विशेष काळजीची गरज होती. अनुप आणि राखी मुलांसोबत पुदुचेरीला जाण्याच्या तयारीत होते.

## संक्षिप्त

### गोरसई येथील अत्याधुनिक व्यायाम शाळेचे लोकार्पण

भिवंडी, दि. ६ : प्रतिनिधी

भिवंडी शहर नजीकच्या गोरसई गावातील श्री समर्थ व्यायाम शाळा येथे संतोष शेट्टी यांच्या वैयक्तिक निधीतून सात लाख रुपये खर्च करून देण्यात आलेल्या अत्याधुनिक व्यायाम साहित्याने सुसज्ज व्यायाम शाळेचा लोकार्पण सोहळा संतोष शेट्टी यांच्या शुभहस्ते रविवारी सकाळी संपन्न झाला.या प्रसंगी सरपंच सुदेश अण्णा गायकवाड,सदानंद ठाकरे,शरद ठाकरे,रामदास केणे,योगेश केणे,कल्पेश केणे ,लहू ठाकरे यांसह गावातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवडणुकीत जय पराजय होत असतो म्हणून आपल्या लोकांची साथ सोडायची नसते,त्यामुळे मी दिलेल्या आश्वासना कडे मी पराभवा नंतर ही पाठ फिरवली नसून यानंतर ही गावातील विविध विकासकामांसाठी मी ग्रामस्थांच्या सोबत असून शासन दरबारी पाठपुरावा करून गावात चांगल्या सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न माझा राहील असा विश्वास व्यक्त करीत, या व्यायाम शाळेचा उपयोग गावातील तरुणांनी करून स्वतःला निर्व्यसनी व सुदृढ ठेवावे अशा शुभेच्छा संतोष शेट्टी यांनी दिल्या.तर संतोष शेट्टी यांनी विधानसभा निवडणुकी दरम्यान दिलेल्या आश्वासनाची पूर्तता निवडणुकीतील पराभवा नंतर ही पूर्ण केल्या बद्दल सरपंच सुदेश अण्णा गायकवाड यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

### बदलापूरमध्ये राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन

बदलापूर, दि. ६ : प्रतिनिधी

मागील २२ वर्षाची परंपरा जपत यावर्षी दिनांक ५ जानेवारीपासून ते १२ जानेवारीपर्यंत अंबरनाथ तालुका राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाच्या वतीने समितीचे संयोजक आमदार किसन कथोरे यांनी बदलापूर मध्ये राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी मागील २२ वर्षाची कीर्तनाची परंपरा जपत बदलापूरमध्ये गांधी चौक, कुळगाव बदलापूर नगरपरिषद मराठी शाळेच्या प्रांगणात होणाऱ्या या कीर्तन महोत्सवाचे आयोजन कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे होत असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले. यावर्षी. दि. ५ जानेवारीपासून दि १२ जानेवारीपर्यंत हा राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचा सोहळा रंगणार असल्याने याचा जास्तीत जास्त नागरिकाने लाभ घ्यावा असे सांगितले आहे. यावर्षी कीर्तन महोत्सव सोहळ्यामध्ये राज्यातील नावलौकिक असलेले नामवंत कीर्तनकार ज्यांच्या कीर्तनात हजारो लोकांची गर्दी होते. अशा चांगल्या कीर्तनकारांना आमंत्रित केले आहे. यामध्ये संगीत कीर्तन,सामुदायिक हरिपाठ, हरि कीर्तन होणार असून नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यायचे आहे आणि त्यातून चांगला बोध घ्यावा, आपली संस्कृती जपावी आणि नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या विचाराने व्हावी असे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले आहे.

### सराफाच्या दुकानातील कामगाराची हत्या करणाऱ्यास उत्तर प्रदेशातून अटक

ठाणे, दि. ६ : प्रतिनिधी

दोन आठवड्यापूर्वी शहापुरातील एका सराफाच्या दुकानात काम करणाऱ्या कामगाराचा दरोडेखोरांनी केलेल्या गोळीबारात मृत्यू झाला होता. याबाबत कोणतेही धागेदोरे नसताना केवळ खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीवरून प्रत्यक्ष गोळीबार करणाऱ्यास पोलिसांनी उत्तरप्रदेश येथून मोठ्या शिताफीने अटक केले. या गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले. या गुन्ह्यात गोळीबार करणारा शशांक मिश्रा उर्फ सोनू याला अटक केली असून त्याच्यावर यापूर्वी सहा प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. शहापुरातील पंडित नाक्यावरील महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दुकानात काम करणारा दिनेश चौधरी हा दुकान बंद करून बॅग घेऊन निघाला होता. त्याच सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळ्या झाडून दिनेश कडील बॅग हिसकावून नेत त्याची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला होता. आरोपींनी कोणताच पुरावा मागे सोडला नसल्यामुळे गुन्ह्याची उकल करणे, हे पोलिसांपुढे आव्हान होते. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांनी ७० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची एकूण १४ पथके तयार केली होती.

### अंबरनाथमध्ये जीवघेण्या खांबामुळे रिक्षाचालकाचा मृत्यू

अंबरनाथ, दि. ६ : प्रतिनिधी

अंबरनाथ शहरातून जाणाऱ्या कल्याण बदलापूर राज्यमार्गाचे काम पाच वर्षांपूर्वी पूर्ण झाले असले तरी एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण आणि स्थानिक पालिकांच्या दुर्लक्षामुळे रस्त्यावर विजेचे खांब तसेच आहेत. या खांबाला धडकल्याने गेल्या आठवड्यात एक रिक्षाचालक गंभीर जखमी झाला होता. या रिक्षा चालकाचा उपचार घेताना दुर्दैवी मृत्यू झाला. रस्त्यात असलेले हे खांब हटवण्यासाठी वर्षानुवर्षे मागणी केली जाते आहे. मात्र अपघातानंतरही हे खांब हटवले जात नसल्याने संताप व्यक्त होतो आहे. कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरपर्यंत जाणारा कल्याण बदलापूर राज्यमार्ग हा चार शहरांसाठी महत्त्वाचा आहे. पाच वर्षांपूर्वी या रस्त्याचे अंबरनाथ शहरातील काम जवळपास पूर्ण झाले होते. उल्हासनगर शहरात काही ठिकाणी आजही हा रस्ता विविध कारणांमुळे अरुंद आहे. त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी कोंडी होते.

## लाचखोर सोसायटी निबंधकाला आणि त्याच्या सहकारी लिपीकाला 60 हजारांची लाच स्वीकारताना अटक



बदलापूर, दि. ६ : प्रतिनिधी

गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्याकरिता तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक कनिष्ठ लिपिक विजयसिंग अजबसिंग पाटील यांने स्वतःसाठी आणि त्याचे वरिष्ठ अधिकारी सहाय्यक निबंधक चेतन आत्माराम चौधरी यांच्यासाठी ७० हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीअंती दि.०३ जाने. रोजी ६० हजारांची रक्कम स्वीकारताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली आहे. चेतन चौधरी आणि विजयसिंग पाटील असे असे लाचखोर अधिकाऱ्यांची नावे असून सापळा कारवाईत रंगेहात लाच घेताना पकडले आहेत. इमारतीची गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याकरिता तक्रारदार हे सोसायटी नोंदणी कार्यालयात गेल्या असताना लाचखोर विजयसिंह पाटील यांनी स्वतःसाठी व चेतन चौधरी याच्यासाठी ७० हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीअंती ६० हजार रुपयांची लाच घेताना अटक झाली आहे. सदर रक्कम स्वीकारण्याकरिता लोकसेवक विजयसिंह पाटील याला सहाय्यक निबंधक चेतन चौधरी यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडून ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई एसीबीचे अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक माधवी राजेकुंभार यांच्या पथकातील पो.ह. रुपेश पाटील, पो.ह. तानाजी गायकवाड, पो.ह.जयश्री पवार, स.पो.उप.नि. चौधरी यांनी यशस्वी केली आहे. याप्रकरणी शनिवारी उशिरापर्यंत बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याचे काम सुरु होते. दोन्ही लोकसेवकांना सोमवारी कोर्टात हजर केले जाणार आहे. "तक्रारदारांच्या माहितीनुसार निबंधक कार्यालयात गृहनिर्माण संस्था स्थापनेची फाईल गेल्यावर त्यावर कोणतीही कारवाई होत नव्हती. त्यावर त्यांची फक्त पैशाची मागणी असायची."

## उद्योग संचालनालयामार्फत निर्यात प्रचालन कार्यशाळेचे 8 जानेवारी रोजी आयोजन

पालघर, दि. ६ : प्रतिनिधी

विकास आयुक्त (उद्योग) यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाच्या ,जिल्हा हे निर्यात केंद्र, या उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्यात प्रचालन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्र पालघर यांच्या वतीने जिल्ह्यातील निर्यात प्रचालन कार्यशाळा बुधवार दि.०८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वा हॉटेल रुद्रा शेल्टर इंटरनॅशनल, सातिवली वसई पूर्व या ठिकाणी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी दिली आहे

जिल्हास्तरिय कार्यक्रमांमध्ये जिल्हातील प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत चर्चासत्र, गुंतवणुकीच्या संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणुक व्यवसाय संधीबाबत चर्चा, यशस्वी निर्यातदार उद्योजकांचे अनुभव, निर्यात प्रोत्साहानांसाठी भारत सरकारच्या योजना व धोरणे, जिल्हयातील निर्यातीला चालना देण्यासाठी रोडमॅप आदींचा समावेश करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यात संबंधित कामकाज करणारे घटक, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार व जिल्हातील संबंधित शासकीय यंत्रणांचे प्रमुख यांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र, पालघर महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी केले आहे.

## भिवंडी पोलिसांचा 'रेझिंग डे' निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये जागृती उपक्रम

भिवंडी, दि. ६ : प्रतिनिधी



भिवंडी पोलीस परिमंडळ-२ अंतर्गत २ ते ८ जानेवारी २५ दरम्यान रेझिंग डे साजरा करण्यात येत असून त्यानुषंगाने विविध उपक्रम राबवण्यात आले.दरम्यान शहरातील नारपोली पोलीस ठाणे अंतर्गत पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय, धामणकरनाका या शाळेतील विद्यार्थी/विद्यार्थिनी यांची महिला सुरक्षिततेसाठी रॅली काढण्यात आली. हि रॅली पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय येथुन सुरू होवून कॉलेज रोडने वराळदेवी सर्कल येथून फिरून परत त्याच मार्गे पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय येथे समाप्त झाली. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना मंदीराचे आवारात महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा, रस्ता सुरक्षा याबाबत उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. या निमित्ताने पद्मश्री आण्णासाहेब जाधव विद्यालयाच्या सभागृहात ज्युनियर कॉलेज च्याच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर क्राईम तसेच महिला सुरक्षा संदर्भात व्याख्यान कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात पो.निरी.प्रमोद कुंभार यांनी 'पोलीस रेझींग डे' संकल्पना समजावून सांगितली. तसेच मपोउनिरी शिंदे-सरनाईक यांनी उपस्थित विदयार्थी यांना गुड टच - बॅड टच आणि मुलींनी शाळेत जाता येताना, इतर ठिकाणी प्रवास करताना काय सावधगिरी बाळगावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सपोनि योगेश काकड व पोह महाजन यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सध्या होत असलेल्या ऑनलाईन फसवणूकीबाबत सर्व प्रकार समजावून सांगून वरिष्ठ कार्यालयातुन आलेल्या सायबर क्राईम संदर्भातील पीपीटी प्रमाणे उपयुक्त मार्गदर्शन केले.तसेच कामतघर येथील आर.बी.पवार विदयालयातील ९ वी व १० वी च्या विदयार्थ्यांना नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे बोलावून त्यांना पोलीस ठाण्यात चालणाऱ्या कामकाजाची माहिती तसेच पोलीस ठाण्यातील रजिस्टराची माहिती देण्यात आली. तसेच पोहवा.सुनील जाधव यांनी पोलीस विभागात वापरण्यात येणारी शस्त्रास्त्रे बाबतची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर पोलीस रेझिंग डे तसेच पोलीस व जनता यामधील सलोखा त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याचे कामकाजाबाबत सविस्तर माहिती उपस्थित विद्यार्थयांना दिली. नारपोली पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि (प्रशा) प्रमोद कुंभार, सपोनि काकड, मपोउनि सायली शिंदे-सरनाईक, अंमलदार आणि शिक्षक यांनी या उपक्रम यशस्वी केला.

## दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाचा खून

पुणे, दि. ६ : प्रतिनिधी

दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून खून करण्यात आल्याची घटना लोणी काळभोर परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली.योगेश लक्ष्मण काळभोर (वय ४५, रा. लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी नंदू उर्फ पोपट लक्ष्मण म्हात्रे (वय ३९, रा. लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) याला अटक करण्यात आली. याबाबत पोलीस शिपाई केतन उत्तम धेंडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या महिन्यात १५ डिसेंबर रोजी योगेश आणि सोमनाथ जाधव हे लोणी काळभोरमधील रायवाडी भागात असलेल्या दत्तात्रय कांबळे यांच्या खोलीत दारू पित होते. त्यावेळी आरोपी नंदू तेथे आला. त्याने योगेशला शिवीगाळ केली. दारू पिण्यास पैसे का दिले नाही, अशी विचारणा करुन त्याला धक्काबुक्की केली. झटापटीत त्याने योगेश यांच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारला. उपचारादरम्यान योगेशचा मृत्यू झाला. सुरुवातीला याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यू नोंद केली होती. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सोमनाथ जाधव याच्यासह चौघांकडे चौकशी करण्यात आली. चौकशीत आरोपीने दारु पिण्यास पैसे न दिल्याने योगेश याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारुन खून केल्याचे उघड झाले. आरोपी नंदू म्हात्रेला अट करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करत आहेत.

## थेऊर गोळीबार प्रकरणातील पसार आरोपी अटकेत

पुणे, दि. ६ : प्रतिनिधी

महिलेच्या डोक्यात दगड मारून, तसेच पतीवर पिस्तुलातून गोळीबार करुन पसार झालेल्या दोघांना गुन्हे शाखेने अटक केली. दगड मारल्याने गंभीर जखमी झालेल्या महिलेचा खासगी रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला होता.

मयूर शंकर जाधव (वय ३२, रा. कुरुळी, ता. खेड, जि. पुणे), प्रथमेश उर्फ सोन्या आनंदा वाहिले (वय २३, रा. केळगाव, चिंबळी-आळंदी रस्ता, ता. खेड, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पुणे-सोलापूर महामार्गावरील थेऊर फाटा परिसरात आरोपी जाधव, वाहिले आणि तीन साथीदार मोटारीतून आले. मोकळ्या जागेत आरोपी लघुशंकेसाठी थांबले होते. त्यावेळी रखवालदार अक्षय चव्हाण याने आरोपींना हटकले. आरोपींनी चव्हाण याच्या दिशेने पिस्तुलातून गोळीबार केला, तसेच त्याची पत्नी शीतला दगड फेकून मारला. दगडफेकीत शीतल गंभीर जखमी झाली. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुरुवातीला याप्रकरणी भानूदास शेलार, अजय मुंढे, सतीश उर्फ नाना मुंढे यांना अटक केली होती. त्यांच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल जप्त करण्यात आले होते.

त्यांच्याबरोबर असलेले आरोपी जाधव, वाहिले यांचा गुन्हे शाखेच्या युनिट सहाकडून शोध घेण्यात येत होता. जाधव आणि वहिले यांना खेड शिवापूर परिसरात सापळा लावून पकडण्यात आले. पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवाई, वाहिद पठाण, दिनकर लोखंडे, राजेश लोखंडे, गणेश ढगे, प्रदीप राठोड, सुहास तांबे, कानिफनाथ कारखेले, नितीन मुंढे यांनी ही कारवाई केली.

## राज्याबाहेर एक जरी उद्योग गेला तर मी तुमची काळजी घेईन

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्योग मंत्र्यांना इशारा

ठाणे, दि. ५ : प्रतिनिधी

राज्याबाहेर एकही उद्योग यापुढे जाऊ देऊ नका यासाठी काळजी घ्या, अशा स्पष्ट सूचना देत, एक जरी उद्योग राज्याबाहेर गेला तर मग, मी तुमची काळजी घेईन, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाण्यातील बिझनेस जत्रेत बोलताना उद्योग मंत्र्यांना दिला.



ठाणे येथील टिपटॉप प्लाझा येथे लक्षवेध संस्थेच्या वतीने आयोजित बिझनेस जत्रेला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शनिवारी उपस्थिती लावून उपस्थित उद्योजकांना मार्गदर्शन केले. एका उद्योगामुळे अनेक लघु उद्योजकांना काम मिळते. यातून रोजगाराची संधी उपलब्ध होते. यामुळे उद्योग हे राज्यासाठी महत्वाचे आहेत. त्यामुळे अडीच वर्षात काय झाले, याचा विचार सोडा आणि यापुढे एकही उद्योग राज्याबाहेर जाणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचना उद्योग मंत्र्यांना दिल्या आहेत. तसेच एक जरी उद्योग राज्याबाहेर गेला तर मग, मी तुमची काळजी घेईन, असा इशाराही दिल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता. मी मुख्यमंत्री झाल्यावर आता परकीय गुंतवणूकित आपले राज्य क्रमांक एकवर आले. पूर्वी उद्योजकाना माझे काय म्हणून विचारले जायचे. आता आम्ही त्यांना तुमचे काय म्हणून विचारतो.असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. महाविकास आघाडी सरकारमध्ये उद्योग, मंदिर, दुकान, सण, उत्सव बंद होते. सगळे बंद करून चालणार कसे, नुसते करोना करून चालत नव्हते. यामुळेच सर्वसामान्य लोकांच्या मनातील एका विचारधारेचे सरकार स्थापन केले, असेही ते म्हणाले. मागील अडीच वर्षात विविध क्षेत्रात काम झाले. आपले राज्य उद्योगस्नेही राज्य झाले आहे, असेही ते म्हणाले. व्यवसाय कोणताही असो, त्यात प्रामाणिकपणा आणि कष्ट असेल तर शून्यातू विश्व निर्माण होते. संधीचे सोने केले पाहिजे. असे केल्यास त्या व्यक्तीला निश्चित यश मिळते असे मतही त्यांनी व्यक्त केले.

## 81 गांजा व्यसनींवर कारवाई

कल्याण, दि. ६ : प्रतिनिधी

कल्याण-डोंबिवली परिसरातील गुन्हेगारी मोडून काढण्याचा चंग बांधलेल्या पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी आपल्या पोलीस ठाणे हद्दीतील स्थानिक पोलिसांना रात्रीच्या वेळेत झाडे, झुडपे, खाडी किनारा भागात गांजा, मद्य सेवन, काही गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दररोज रात्री आठ ते पहाटे चार वाजेपर्यंत ही छापासत्र मोहीम पोलिसांनी सुरू केली आहे. गुरुवारी रात्री ८१ गांजा, अंमली पदार्थ सेवन आणि मद्य सेवन करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली.

## आजपासून महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषण कंपनी मर्यादित आयोजित राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेला सुरुवात

नाशिक, दि. ६ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, महापारेषण मधील आयोजित आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा - कलाकुंभ २०२४ यावर्षी नाशिक येथे होणार आहे. त्याचे उद्घाटन दि.०६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता होणार आहे.

"महापारेषण कंपनी" मधील राज्यभरातील कर्मचारी हे वर्षाचे ३६५ दिवस वीज पुरवठा सुरळीत राहावा यासाठी नियमित काम करत असतात. हे कर्मचारी आपल्या जीवाची परवा न करता अत्यंत सुरक्षित साधनाचा वापर करत ग्राहकांच्या सेवेसाठी अहोरात्र मेहनत घेऊन काम करत असतात. याच कर्मचाऱ्यांमधील अनेक कलागुणांना वाव मिळावी यासाठी दरवर्षी महापारेषण कंपनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असते. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून यावर्षी राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. या नाट्य स्पर्धेसाठी राज्यभरातील आठ परिमंडळ व सांघिक कार्यालय असे मिळून एकूण नऊ नाटके सादर करण्यात येणार आहे. यामध्ये "महापारेषण" कंपनीचे कर्मचारी आणि अधिकारी सहभागी होणार आहेत. नाशिक येथील "महावीर कालिदास कलामंदीर शालिमार", नाशिक येथे चार दिवस या नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. संजीव कुमार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महापारेषण, यांच्या शुभहस्ते होणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून सतीश चव्हाण , संचालक (संचलन ) , अविनाश निंबाळकर, संचालक (प्रकल्प ) , श्रीमती.तृप्ती मुधोळकर, संचालक (वित्त), सुगत गमरे, संचालक (मासं), भरत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा मुख्य समन्वयक या मान्यवरांच्या सोबत प्रसिद्ध मराठी सिनेमा कलाकार कुशल बद्रिके आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. तर या कार्यक्रमाचे आयोजन संजीव भोळे, मुख्य अभियंता, नाशिक परिमंडल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण भालेराव, अधीक्षक अभियंता, अनिल भारसाकळे, अधीक्षक अभियंता, संजय अत्राम ,अधीक्षक अभियंता, मनीष खत्री, अधीक्षक अभियंता, प्रकाश लिमकर, अधीक्षक अभियंता, (स्था) मिलिंद घोलप, सहा. महाव्यवस्थापक (विवले) चंद्रशेखर बोराडे, सहा. महाव्यवस्थापक (मासं) यांच्यासह नाट्य स्पर्धा आयोजन समिती करणार आहे. चार दिवस या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले "महापारेषण" कंपनीचे कर्मचारी व अधिकारी आपली विविध कला नाटकाच्या माध्यमातून सादर करणार आहे.

## डीप क्लिनींगव्दारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर

नवी मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हवा गुणवत्तेमध्ये सुधारणा व्हावी हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्याकडे विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 30 डिसेंबरपासून सखोल स्वच्छता मोहीम (Deep Cleaning Drive) राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात दिनांकनिहाय विविध रस्त्यांच्या सखोल स्वच्छेतेचे नियोजन करण्यात आले असून अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ 1 उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ 2 उपआयुक्त श्री. संतोष वारुळे तसेच परिमंडळ 1 चे उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्यासह विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली संबंधित अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच स्वच्छताकर्मी यांच्या माध्यमातून धुळीचे प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने साफसफाई करण्यात येत आहे.

यामध्ये रस्ते, पदपथ यांच्या कडेला साठून राहिलेली गाळाची माती व कचरा यांची हँडब्रशने व त्यानंतर प्रक्रियाकृत पाणी मारुन यांत्रिकी वाहनाने साफसफाई करण्यात येत आहे. तसेच फॉगींग मशीनव्दारे हवेत पाण्याची फवारणी करुन धूळीचे प्रमाणही कमी करण्यात आले आहे. पदपथाच्या बाजूच्या भिंती, कुंपण, शिल्पाकृती यांचीही साफसफाई करण्यात आली आहे.

आज 4 जानेवारी रोजी बेलापूर विभागात क्रित फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहयोगाने सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे यांच्या माध्यमातून बेलापूर जेट्टी, सेक्टर 15 याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच हावरे सर्कल ते अपोलो सिग्नल या मुख्य रस्त्यावरील व परिसरातील सखोल स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले.

वाशी विभागातही सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली जैन मंदिर ते संतोष डेअरी, सेक्टर 9 ए व 10 ए या रस्त्यावर, पदपथावर व परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली. कोपरखैरणे विभागातील तीन टाकी ते वैकुंठधाम या परिसरात सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. सुनिल काठोळे यांच्या नियंत्रणाखाली त्याचप्रमाणे दिघा एमआयडीसीतील व्होडाफोन कंपनी ते स्मिथ हॉटेल या रस्त्यावर सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली सखोल स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

13 जानेवारीपर्यंत दररोज अशा प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात नियोजित कृती आराखड्यानुसार राबविण्यात येणार आहे.

## बदलापूर महानगरपालिका झाल्यावर वामन म्हात्रे महापौर होणार - वनमंत्री गणेश नाईक

बदलापूर, दि. ६ : प्रतिनिधी



कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शिक्षक सन्मान सोहळा आयोजित केला होता. कार्यक्रमाला ते उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व संस्थाअध्यक्ष, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील सर्व मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता त्या कार्यक्रमासाठी वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते.

बदलापूरमध्ये शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दि.०४ जाने. रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त "गुणवंत शिक्षक सन्मान सोहळा" आयोजित केला होता. त्यामध्ये शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्थाचालक, प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक, तंत्रज्ञान विद्यालयाचे शिक्षक असे शिक्षण क्षेत्रातील सर्व मान्यवरांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाप्रसंगी वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते. कार्यक्रमात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बोलले की, "भविष्यात बदलापूर महानगरपालिका झाल्यावर वामन म्हात्रे महापौर होतील " असे ठामपणे सांगितले आहे.

# दहा वर्षांपासून अन्नदानाची साप्ताहिक सेवा

### वीर सेवा दलाचा उपक्रम ?

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६ : असे म्हणतात की, भुकेल्याला अन्नदान केल्यास पुण्य लाभते. पोटात अन्न गेल्यानंतर आपसूकच त्यांच्या तोंडून देणाऱ्यासाठी शुभाशीर्वाद निघत असतात. दर रविवारी मोफत अन्नदानाचे काम शहरातील वीर सेवा दलाचे सदस्य गेल्या १० वर्षांपासून अखंडपणे करत आहेत. सर्वोपचार रुग्णालयासह जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या परिसरात हे अन्नदान केले जाते. दर रविवारी सायंकाळी होणा ?या अन्नदान सुरु होण्याआधीच या ठिकाणी गरजू लोक वाट पाहत थांबलेले असतात.

'रोटी नहीं सिखाती धर्म में बैर रखना' या म्हणीनुसार अन्नदानाच्या नि:स्वार्थी सेवाभावाच्या या उपक्रमात शीख, हिंदू, मुस्लिमासह अन्य विविध धर्मांचे सेवेकरी हात या सेवेशी जुळत गेले. दहा वर्षांपूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयात चार-पाच जणांनी मिळून सुरु केलेल्या या अन्नदानाच्या उपक्रमात पंचवीसच्यावर दानशूर सेवेकरी आणि इतरही काही जण दर रविवारी न चुकता सायंकाळी पाच वाजता सर्वोपचार रुग्णालय आणि सहा वाजता जिल्हा स्त्री रुग्णालयात रुग्णांसह रुग्णांच्या नातेवाइकांना गरमागरम अन्नदान आणि फळांचे वाटप करत असतात. आठवड्याचे सहा दिवस आपल्या उद्योग-व्यवसायांमध्ये व्यस्त असलेले शहरातील वीर सेवा दलाचे सदस्य सुटीच्या दिवशी रविवारी हा अन्नदानाचा सेवाभावी उपक्रम स्वत:च्या योगदानातून गेल्या १०वर्षांपासून राबवत आहेत.

त्यांच्या या नि:स्वार्थी सेवाभावी उपक्रमात काही मुस्लिम व हिंदू समाजातील बांधवांनी फळवाटप करुन योगदान दिले आहे. सर्वोपचार रुग्णालयातील आणि जिल्हा स्त्री रुग्णालयात मिळून १ हजार रुग्ण आणि भरती असलेल्या रुग्णांच्या पोटाला दर रविवारी या अन्नदानाचा मोठा आधार होत आहे. रुग्णांसह त्यांच्याजवळ देखभालीसाठी असलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांना अन्नदान करणे, हा आपला एक सेवा धर्म आहे, याच सेवाभावी वृत्तीतून अनेकांचे हात या उपक्रमाशी जुळत आहेत. मात्र यात योगदान देणारे सर्वच जण प्रसिद्धीपासून चार हात लांब आहेत. आमची ही शुद्ध समाज सेवा असून, त्यासाठी आम्हाला प्रसिद्धी नको, असे या वीर सेवा समितीच्या सदस्यांनी सांगितले. त्यातूनच त्यांच्या या समाजसेवेची खरी तळमळ दिसून आली. वीर सेवा समितीच्या या मानवता जपणाऱ्या उपक्रमामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांची चांगलीच सोय होत आहे.



**दर आठवड्याला रुग्णालय परिसरात स्वच्छता**

सेवा मोहंमद आरीफ आठवडाभरातील कमाईतील काही रक्कम दर रविवारी शासकीय रुग्णालयात होणाऱ्या वीर सेवा समितीच्या अन्न वाटपाच्या कार्यक्रमासाठी देतात. विशेष म्हणजे ते स्वत: आणि त्यांचे काही सहकारी अन्नवाटप व फळवाटपानंतर जिल्हा स्त्री रुग्णालय व सर्वोपचार रुग्णालयात होणारा कचरा उचलून परिसर स्वच्छ करतात.

# चिंचरगव्हाण परिसरात बिबट्याचे बछड्यासह दर्शन

**तालुक्यातील चिंचरगव्हाणनजीक असलेल्या शासनाच्या ईक्लास जमिनीवर दाट वृक्षवल्ली आहे.**

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ६: अमरावती वरुड तालुक्यातील चिंचरगव्हाण येथील इ-क्लास जमिनीवरील नाल्यालगत नागरिकांना शनिवारी बछड्यासह हिंस्त्र श्वापदाचे दर्शन झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, वनविभागाच्या चौकशीत तो बिबट असल्याचे निष्पन झाले असून, नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन वनपरीक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांनी केले आहे. तालुक्यातील चिंचरगव्हाणनजीक असलेल्या शासनाच्या ई-क्लासजमिनीवर दाट वृक्षवल्ली आहे. त्याच परिसरात एक नाला असून शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याचा रस्ताही येथूनच जातो. शनिवारी दुपारच्या सुमारास राजुरा बाजार येथील रहिवासी असलेले काशिब सैय्यद हे घराकडे परत येत असताना, त्यांना नाल्याच्या काठाने हिंस्त्र श्वापद बछड्यासह मार्गक्रमण करताना दिसून आले. त्यांनी आजूबाजूच्या नागरिकांना बोलावून घेतले. माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अधिकाऱ्यांनी त्या मार्गावर पाहणी केली असता, तिथे श्वापदाच्या पायांचे ठसे उमटल्याचे दिसून आले. ते ठसे बिबट्याचे असल्याचे निदर्शनात आले. तालुक्याला जंगलाची सीमा लागून असून, पाणी पिण्यासाठी ते नाल्याकडे आले असावे, सा अंदाज वर्तविण्यात येत आहे.




# सावित्रीबाई फुले या भारतीय समाज क्रांतीची जननी: सुहासिनी धोत्र

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६ : सावित्रीबाई फुले यांच्या नावात फुले येत असलं तरी कायम तिने काटे सोसले, दगड गोट्यांचा मार सहन करत स्त्री शिक्षणासाठी लढा दिला. महिलांना त्यांचा अधिकार प्राप्त व्हावा, यासाठी संघर्ष केला, असे प्रतिपादन सुहासिनी धोत्रे यांनी केले. अकोट फाईल परिसरात अनिता चौधरी व उत्तर मंडल महिला आघाडीच्या पुढाकाराने सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महात्मा फुले यांच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले यांनी सन १८४८ ते १८५२ या चार वर्षाच्या काळात पुणे आणि पुण्याच्या परिसरात एकूण १८ शाळा सुरु आहे. त्या यशस्वीपणे चालवण्यात सुद्धा आल्या.

महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी घेऊन सत्यशोधक समाजाच्या विचार व कार्यासाठी अविरतपणे प्रयत्न करत राहिल्या ,असे सुहासिनी धोत्रे म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंजूषा सावरकर होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चंदा शर्मा, सुनिता अग्रवाल, अर्चना मसने, गीतांजली शेगोकार, सारिका जयस्वाल, वैशाली शेळके ,अर्चना शर्मा, चंदा ठाकूर, अनिता गिरी, राजेंद्र गिरी, शकुंतला जाधव, सुषमा शुक्ला सुमन गावंडे, अनिता घोगलिया आदी उपस्थित होत्या.

**महिलांना त्यांचा अधिकार प्राप्त व्हावा, यासाठी संघर्ष केला,**

यावेळी भाजप सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले.

# हलव्याच्या दागिन्यांचीही वाढली क्रेझ

**घड्याळ, पुष्पगुच्छ, नारळ, अंगठी, मोबाइल, पुरुषांचे आकर्षक दागिने**



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६ : मकर संक्रांत सण जवळ आला आहे. त्यासाठी हलव्याचे तयार दागिनेही बाजारात उपलब्ध झाले आहेत. त्यात हार, नेकलेस, बिंदी, बांगड्या, कंबरपट्टा, बाजूबंद, मंगळसूत्र, कानाचे वेल, मुकुट असे प्रकार उपलब्ध आहेत. याशिवाय मागणीनुसार दागिने तयार करून दिले जात आहेत. यात पुरुषांचेही दागिने खास ठरत आहेत. नववर्षातील पहिला सण मकर संक्रांत असतो. यंदा १४ जानेवारीला हा सण आला आहे. यानिमित्त नवविवाहिता, लहान बाळ यांना हलव्याचे दागिने भेट दिले जातात. संक्रांतीला ते घालण्याची प्रथा आहे. यंदा दागिन्यांच्या किंमती दोनशे ते एक हजार रुपयांपर्यंत आहेत. कलाकुसरीची आवड असणा ?या महिला घरगुती व्यवसाय स्वरूपात ते तयार करतात. आठ ते दहा दिवस अगोदर ऑर्डर घेतली जाते, मागणीनुसार ते करून दिले जातात. शहरातील विक्रेत्या मीनल कुंभारे म्हणाल्या, नक्षीकामानुसार दरवर्षी मी हलव्याच्या दागिन्यांचे पाच ते सहा हजार सेट बनवते. प्रत्येक सेटची किंमत वेगळी आहे. मंगळसूत्र १०० ते ३०० रुपये, नेकलेस २०० ते ८०० रुपये आहे, मांगटिका ५० ते १००, कानातले ५० ते ३०० आणि नथ १०० ते २०० रुपयांपर्यंत आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार डिझाईन तयार केले जाते. साधारण दिवाळीनंतर बनवायला सुरुवात होते. रथसप्तमीपर्यंत मागणी असते. बोरन्हाण व लहान मुलींसाठी मागणी जास्त आहे. तीन हजारहून अधिक दागिन्यांची विक्री झाली आहे. तसेच नववधू आणि वरासाठी १५०-२०० सेटची विक्री होत आहे. लहान मुलांसाठी, महिलांप्रमाणे पुरुषांसाठीही हलव्याचा हार, कृत्रिम फुलांचे पुष्पगुच्छ, नारळ, अंगठ्या, घड्याळ व मोबाइल बनविला जातो. असे तयार करतात दागिने शेगडीवर पसरट खोलगट तवा ठेवून त्यात तीळ, मुरमुरे, पोहे, शेंगदाणे, साबुदाणा, डाळी, खसखस आदी टाकले जाते. नंतर एकेक दाण्यांवर साखरेचा पाक ओतून कापडाने तो हलविला जातो. गरम आचेमुळे हलवा काटेरी फुलतो. काही दाण्यांवर रंगीत पाक टाकून रंगीबेरंगी हलवा बनवतात.

# विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षणाची आवड रुजवणारे

### शालेय पक्षिमित्र संमेलन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६ : शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेला संपूर्ण भारतात एकमेव उपक्रम म्हणून ओळखले जाणारे शालेय पक्षिमित्र संमेलनाचे ८ वे शालेय पक्षिमित्र संमेलन लोकमान्य टिळक सभागृहात नुकतेच पार पडले. शिक्षणाधिकारी, निसर्गकट्टा, वन विभाग सामाजिक वनीकरण विभाग व महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संमेलनाचे आयोजन केले होते.

संमेलनामध्ये राजेश्वर कॉन्व्हेंट, जिजाऊ कन्या विद्यालय, न्यु इंग्लिश हायस्कुल, जी. डी. प्लॅटिनम ज्युबिली हायस्कूल, सन्मित्र पब्लिक स्कूल, ज्युबिली इंग्लिश हायस्कूल, मोहरीदेवी खंडेलवाल कन्या विद्यालय आदी शाळेतील निसर्गकट्टा इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पक्षी निरीक्षण छंदाविषयी विविध कार्यक्रमातून माहिती देण्यात आली होती. त्या आधारे पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, पक्षी कटआऊट स्पर्धा व प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या संमेलनात बुलडाणा येथील बाल पक्षिमित्र क्षितिज निकम याने माझे पक्षीनिरीक्षण, जळगाव येथील युवा पक्षिमित्र सौरभ महाजन यांनी पक्षी निरीक्षण 'एक छंद' व पाटेकर, डॉ. विजयश्री हेमके यांनी पक्षांवरील विविध माहितीवर स्लाइड शोद्वारे मार्गदर्शन केले. सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांक राशी यादव, द्वितीय ईशान राऊत, तृतीय ईच्छा घुरडे, उत्तेजनार्थ आदिती जगताप व समर्थ यादव यांना मिळाले. पक्षी कट-आऊट स्पर्धेत प्रथम क्रमांक कृतिका गोपाल मांडेकर, द्वितीय अर्पिता आगरकर, तृतीय गौरी अतुल साळुंके, उत्तेजनार्थ वेदिका गोलाईत, दर्शना घराडे यांनी मिळवला.



बक्षिस वितरण समारंभात कार्यक्रमात निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणारी त्रिशा यादव व शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर, सहाय्यक वनसंरक्षक नम्रता टाले, वनपरिक्षेत्र अधिकारी विश्वास थोरात, न्यू इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापिका माधव मुन्शी, संदिप सरडे उपस्थित होते. यावेळेस संदिप सरडे यांना कृतज्ञता पुरस्कार तर अनुल मनवर दीपस्तंभ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सूत्रसंचालन निसर्गकट्टाचे अमोल सावंत व आभार डॉ. मिलिंद शिरभाते यांनी केले. यशस्वितेसाठी निसर्गकट्टाचे प्रदीप किडीले, ॲड. अजिम शेख, प्रेम अवचार, डॉ. हरिश मालपाणी, डॉ. संतोष सुरडकर, नागसेन आकोडे, प्रथम सिंकटवार यांनी परिश्रम घेतले.

**निबंध स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी यश मिळवले**

निबंध लेखन स्पर्धेत प्रथम त्रिशा यादव, द्वितीय मनस्वी इंगळे, तृतीय अनुष्का जुनारे, उत्तेजनार्थ ईश्वरी फाले, सोमेश्वर मोडक तसेच पोस्टर स्पर्धेत प्रथम प्रणाली गुजर, द्वितीय वेदिका गोलाईत, तृतीय अक्सा परवीण, सालिम रेघीवाले, उत्तेजनार्थ राशी यादव, दर्शना घराडे यांना बक्षिसे देण्यात आली.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ZAINUL HAQUE ABDUL HAQUE.** NOW MY NEW NAME IS **ZAINUL ABEDIN ABDUL HAQUE SHEIKH.**
ADD : NEAR NAMAK KARKHANA GANJAKHETH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SID SADAF KAUSAR MOHD SAJID.** NOW MY NEW NAME IS **SADAF FATIMA SAYYED.**
ADD : P.NO.10, NEHRU COLONY BORGAON ROAD, NEAR NAGPUR NAGRIK BANK, ANANT NAGAR, NAGPUR-440013, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **SHAMIM AKHTAR.** NOW MY NEW NAME IS **SHUMAILA SAYYED.**
ADD : P.NO.10, NEHRU COLONY BORGAON ROAD, NEAR NAGPUR NAGRIK BANK, ANANT NAGAR, NAGPUR-440013, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **MOHAMMAD IMAD MOHAMMAD SAJID.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD IMAD SAYYED.**
ADD : P.NO.10, NEHRU COLONY BORGAON ROAD, NEAR NAGPUR NAGRIK BANK, ANANT NAGAR, NAGPUR-440013, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **SHILPA KAILASH NANWANI.** NOW MY NEW NAME IS **NANDINI SHYAM BUDHWANI.**
ADD : NETAJI WARD, ARVI, WARDHA. 442201

MY OLD NAME WAS **HAMEEDA BANO.** NOW MY NEW NAME IS **HAMIDA BANO NASIR KHAN.**
ADD : 104 KARGIL NAGAR SHARDA H. SOC ROSHAN BAG KHARABI NAGPUR: 440035 (MS)

MY OLD NAME WAS **ALI-ASGHAR PANDHARPURWALA.** NOW MY NEW NAME IS **ALIASGHER HATIMBHAI PANDHARPURWALA.**
ADD : FLAT NO 404 MEMOON HEIGHT LALGANJ RAUT CHOWK NAGPUR : 440002 (MS)

## अधिसूचना

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
पेंच प्रकल्प नागपूर यांचे कार्यालय
नागपूर दिनांक : ०२/०१/२०२५

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम १९(१)ची अधिसुचना प्रसिद्ध करण्याकरीता

**क्र.क.लि./उजि(भू)/पे.प्र/कावि-** ०१**/२०२५, दिनांक** - ०२/०१/२०२५

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) आणि (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, **क्र.क.लि./उजि(भू)/पे.प्र/कावि-८२५ दिनांक ०१/०८/२०२४** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या गावठाणा मधील जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणाची जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणच्या जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **श्रीमती. पुजा सुदाम पाटील, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पेंच प्रकल्प,नागपूर** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूचि-एक**
**जमिनीचे वर्णन**

**गाव :- शिवणगाव, तालुका :- नागपूर (शहर), जिल्हा :- नागपूर,**
**भूसंपादन प्रकरण क्रमांक :- २०/अ-६५/२०२३-२०२४**

| अ.क्र. | सर्व्हे क्र. किंवा गट क्रमांक | नगर भूमापन क्र | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर. |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| १ | २७७/५ | ६७४ | ०.१४ |
| | अदमासे क्षेत्र हे.आर. मध्ये | | ०.१४ |

**अनुसूची–दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :- नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतुक हब विमानतळ, नागपूर (मिहान) (International Air Cargo Passenger Terminus And Multimodel Hub/(I.A.C.P.T.M.H) विकसित करणेबाबत.

प्रकल्पकार्याचे वर्णन :- नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतुक हब विमानतळ, नागपूर (मिहान) (International Air Cargo Passenger Terminus And Multimodel Hub/(I.A.C.P.T.M.H) विकसित करणेबाबत.

समाजाला मिळणारे लाभ :- सदर धावपट्टी तयार झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय मालवाहतुक /विमानांचे आवागमन करणे सोईचे होईल. तसेच धावपट्टीमुळे क्षेत्रातील विकास कामे जलद गतीने होणेसाठी.

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- **विस्थापीत होत नाही**

**अनुसूची–चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

१) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र एलएसी/कार्या -२५/कावि -०९ दिनांक ०२/०२/२०२४
२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विमानतळ विकास कं. मर्या नागपूर यांचे पत्र क्र. ३९८/ मिहान /२०२४ दिनांक १९/०१/२०२४ प्राप्त दिनांक ३०/०१/२०२४

**टिप :-** उक्त जमिनीच्या नकाश्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पेंच प्रकल्प नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**ठिकाण :- नागपूर**
**दिनांक :**०२/०१/२०२५

**(पुजा सुदाम पाटील)**
**उपजिल्हाधिकारी**
**(भूसंपादन) पेंच प्रकल्प,नागपूर**

**क्र. जिमाका - नाग / जाहिरात / ३२२ / २०२५**

# धार्मिक सुधारणावादी परंपरेच्या संरक्षणाचा लढा...

शिवगिरी मठाकडून सर्व पक्षांशी चांगले संबंध ठेवले जात असतात. वार्षिक शिवगिरी यात्रेत राजकीय क्षेत्रातील पक्षांच्या नेत्यांना यात्रेकरूंना संबोधित करण्याची संधी दिली जाते. अलिकडच्या वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी यात्रेकरूंना संबोधित केले आहे. यंदा शिवगिरी मठाच्या कार्यक्रमात विजयन यांना आमंत्रित करण्यात आले होते.

त्यानुसार केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी 31 डिसेंबर 2024 रोजी वर्कला येथील श्री नारायण गुरु यांच्या समाधि स्थळावर 92 व्या शिवगिरी तीर्थक्षेत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात हजर होते. विरकलातील नारायण गुरु यांच्या समाधीवर शिवगिरी यात्रेच्या संदर्भात झालेल्या एक सभेत विजयन म्हणाले की, गुरुंचे सनातन धर्माचे प्रतीक म्हणून चित्रण करण्यासाठी एक संघटित प्रयत्न चालवला जात आहे. गुरू कधीही सनातन धर्माचे प्रचारक किंवा पालन करणारे नव्हते. उलट, ते त्या काळाच्या नव्या युगासाठी सनातन धर्माचे पुनर्निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे होते.

विजयन यांनी पुढे सांगितले की, सनातन धर्माचे सार त्याच्या वर्णाश्रम पद्धतीत आहे, ज्याचा गुरुंनी स्पष्टपणे विरोध केला. गुरू हे जातिवादाविरुद्ध उभे राहणारे व्यक्ती होते. त्यांचा नवा युगातील धर्म हा धर्माद्वारे परिभाषित केलेला नाही, तर तो लोकांच्या भल्यासाठी असलेल्या पद्धतीवर आधारित होता, धर्माच्या बाबतीत ते कोणतेही भेद करत नव्हते...त्यांना सनातन धर्माच्या चौकटीत बांधणे हे गुरुंच्या विरोधात पाप होईल, असे ते म्हणाले.

ते यांनी समाजसुधारक श्री नारायण गुरूंना सनातन धर्माच्या कुशीत आणण्याचा जो प्रयत्न चालू आहे त्याची निंदा केली. विजयन यांनी त्यांच्या भाषणात सनातन धर्माला समाजातील जातीय विभाजनाचा पाया असलेल्या वर्णाश्रम धर्माच्या समान म्हटले. त्यांनी श्री नारायण गुरूंना सनातन धर्माचे पुरस्कर्ते म्हणून प्रचारीत करण्याच्या कामाला श्री नारायण गुरु यांच्या जातीव्यवस्थेवर आधारित दडपशाहीचे निर्मूलन करण्याच्या कायार्चा आणि मानवतावादी संदेशाच्या विरुद्ध असल्याचे मांडले.

विजयन म्हणाले, श्री नारायण गुरूंना सनातन धर्माचे पुरस्कर्ते म्हणून पाहिले जाऊ शकत नाही. 'एक जात, एक धर्म, आणि लोकांसाठी एक देव' असा पुरस्कार करणारे गुरू सनातन धर्माचे प्रवक्ते किंवा पुरस्कर्ते नव्हते. गुरूंनी सुधारणा करण्यात प्रमुख भूमिका बजावली होती. तुम्ही त्यांचा इतिहास तपासलात तर तुम्हाला ते कळेल, सनातन धर्म हा वर्णाश्रम धर्माशी समानार्थी किंवा अविभाज्य आहे, जो चातुर्वण्य पद्धतीवर आधारित आहे. तो वंशपरंपरागत व्यवसायांचा गौरव करतो.

पण श्री नारायण गुरूंनी काय केले? त्यांनी वंशपरंपरागत व्यवसायांचा अवमान करण्याचे आवाहन केले. मग गुरू सनातन धर्माचे पुरस्कर्ते कसे होऊ शकतात? आज जेव्हा जग हा धर्माच्या हिंसेवर आधारित व्याख्या केल्या जात आहेत अश्या परिस्थितीत श्री नारायण गुरु यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत. गुरु जय गोष्टींच्या विरुद्ध लढले, त्यांना त्याच गोष्टींचा समर्थक दाखवण्याचा प्रयत्न लोकांनी हाणून पडला पाहिजे, गुरूंना केवळ धार्मिक नेता किंवा संत म्हणून प्रचारीत करण्याचा विरोध झाला पाहिजे. गुरु यांचा कुठलाच धर्म किंवा जात नव्हती.





ॲड. संजय पांडे
(9221633267)
adv.sanjaypande@gmail.com

विजयन म्हणाले की या आदरणीय सामाजिक सुधारकांना सनातन धर्माशी जोडले जाऊ नये. विजयन यांनी सांगितले की, गुरुंच्या शिकवणी आणि कृती समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी आणि जातीय भेदभावाला विरोध करण्यासाठी होत्या, ज्या सनातन धर्माच्या तत्वांशी विसंगत आहेत. पुढे ते म्हणाले, सनातन धर्म, जो सत्ताधारी आहे, त्यामुळे उत्तर भारतातील ग्रामीण भागात दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांवर सतत अत्याचार होत आहेत.

त्यांच्या या विधानाने चवताळून भारतीय जनता पक्षाचे माजी केंद्रीय मंत्री व्ही. मुरलीधरन यांनी तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांच्याप्रमाणेच केरळच्या मुख्यमंत्र्यांवर सनातन धर्माचा अपमान केल्याचा आरोप केला आहे.

**पूर्वार्ध**

19 व्या शतकातील केरळमधील जातीय व्यवस्था अत्यंत कठोर आणि शोषणकारी होती. हिंदू समाज वेगवेगळ्या जातीय गटांमध्ये विभागलेला होता, ज्यात ब्राह्मण समाज उच्च स्थानावर होता, तर खालच्या जातींना भयंकर भेदभावाचा सामना करावा लागत असे.

इझावा समाजासारख्या जातीय गटांना शिक्षण, मंदिर प्रवेश, आणि सार्वजनिक ठिकाणी जाण्याचा अधिकार नाकारला जात होता. हे लोक प्रचंड दारिद्रयात आणि अपमानकारक परिस्थितीत राहत होते. अशा दडपशाहीच्या वातावरणात श्री नारायण गुरु यांचा जन्म १८५५ मध्ये केरळमधील चेम्पाझंथी या छोट्या गावात इझावा कुटुंबात झाला.

बालपणापासूनच त्यांची बुद्धिमत्ता आणि अध्यात्मिक झुकाव विलक्षण होते. त्यांच्या समाजातील लोकांसाठी वर्ज्य ठरवल्या गेलेल्या संस्कृत आणि हिंदू धर्मग्रंथांचे त्यांनी अध्ययन केले. त्यांचा विश्वास होता की देवत्व सर्व माणसांमध्ये समान आहे, ते जात आणि धर्मावर अवलंबून नाही. त्यांनी जातीय भेदभावाला आव्हान दिले.

श्री नारायण गुरु यांनी १८८८ मध्ये अरुविप्पुरम नदीकाठी शिवलिंगाची स्थापना करून ब्राह्मणांच्या वर्चस्वाला खुले आव्हान दिले, कारण मंदिर स्थापनेचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. हा विधी स्वतः पार पाडून, त्यांनी सांगितले की आध्यात्मिकता सर्वांसाठी आहे, ती कोणत्याही जातीपुरती मर्यादित नाही.

जेव्हा गैर-ब्राह्मणांनी केलेल्या अभिषेकाला विविध स्तरातून विरोध झाला, तेव्हा त्यांनी स्पष्ट केले की ही मूर्ती ब्राह्मण शिवची नव्हे तर इझवा शिवची होती आणि इझवा समाजाचा अत्याचारग्रस्त जात म्हणून उल्लेख केला. यानंतर त्यांनी केरळभर अनेक मंदिरे स्थापन केली, जी फक्त उपासनेसाठी नसून शिक्षण आणि सामाजिक सुधारणा केंद्रे बनली.

एक जाती, एक धर्म, एक देव हा त्यांचा प्रसिद्ध घोषवाक्य बनला, ज्याने जातीवादी विभागणीला स्पष्टपणे नाकारले. त्यांचा विश्वास होता की देवत्व सर्व माणसांमध्ये समान आहे, ते जात आणि धर्मावर अवलंबून नाही. त्यांनी जातिवाद आणि अस्पृश्यतेने ग्रासलेल्या समाजाचे किमान काही स्तरांसह प्रगतीशील समाजात परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

१८८८ मध्ये, मंदिर प्रवेशाच्या हालचाली आणि समानताच्या घोषणांच्या अनेक दशकांपूर्वी त्यांनी अत्याचारित जातींना मंदिरात प्रवेश मिळवून दिला. श्री नारायण गुरु यांनी शिक्षणाला मुक्तीचे एक प्रभावी साधन मानले. त्यांनी शाळा स्थापन केल्या आणि जातीभेद झुगारून लोकांना शिक्षण घेण्याचे आवाहन केले. अशा प्रकारे, त्यांनी दुर्बल घटकांना आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली.

त्यांनी मंदिरांच्या माध्यमातून ग्रंथालये आणि वाचनालये उभारली, ज्यामुळे सर्वांना ज्ञान मिळाले. या उपक्रमामुळे शिक्षणाचे लोकशाहीकरण झाले आणि समाजात एकता आणि सामुदायिक भावना निर्माण झाली. श्री नारायण गुरु यांनी अस्पृश्यता आणि जातीआधारित बंधनांच्या विरोधात सक्रियपणे प्रचार केला. त्यांनी शोषितांमध्ये आत्मसन्मान आणि प्रतिष्ठा जागवली.

कमीपणाची भावना झुगारून त्यांनी लोकांना संघटित होऊन आपल्या अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी जातीभेद मोडून काढण्यासाठी अंतरजातीय भोजनाला पाठिंबा दिला, जी त्या काळात निषिद्ध गोष्ट होती. त्यांनी समाजातील कट्टरतेच्या भिंती पाडण्यासाठी प्रयत्न केले.

श्री नारायण गुरु हे केवळ सामाजिक सुधारकच नव्हे तर महान तत्त्वज्ञ आणि कवीही होते. त्यांच्या लेखनातून करुणा, समानता आणि न्याय यासारख्या सार्वत्रिक मूल्यांचा प्रचार झाला. आत्मोपदेश सतक (शंभर ओव्या आत्मशिक्षणासाठी) आणि दैव दशकम (दहा श्लोक देवासाठी) यांसारख्या त्यांच्या रचनांनी जातीय भेदभावाविरुद्धचा त्यांचा संदेश स्पष्ट केला. त्यांचे तत्त्वज्ञान सर्वसमावेशक होते.

-------------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# बाबासाहेबांची पत्रकारिता

मराठी वृत्तपत्रसृष्टी केवळ एकाच वर्गाची आहे, इतरांना यात प्रवेश नाही अशी एकप्रकारची भावना त्यावेळी होती, परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांनी आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दलित व अस्पृश्य वृत्तपत्रांनी जो प्रपंच केला तो आपल्याला दुर्लक्षित करता येणार नाही.

मराठी वृत्तपत्रसृष्टीत जर कोणत्या महान व विचारवंत पत्रकाराचे कर्तृत्व दुर्लक्षित केले गेले असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचारवंत पत्रकाराचे. उलट, ज्यांना बाबासाहेबांचा सहवास घडला, ज्यांनी मुलाखती घेतल्या त्यांनी ही त्यांचा पत्रकार म्हणून कधी गौरव केलाच नाही . परंतु त्यांच्या पत्रकारितेचीही फारशी दखल घेतली नाही. ज्या काळात बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांना जन्म दिला त्या काळात भल्याभल्या पत्रपंडितांनी कातडीबचाव धोरण ठेवले, त्यामुळे नुकसान बाबासाहेबांचे झाले नसून इथल्या मराठी वृत्तपत्रसृष्टीचे झाले.

बाबासाहेबांनी मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता(१९३०), प्रबुद्ध भारत (१९५६), रोजी सुरु केले,प्रबुद्धभारत स्वतंत्रपणे जन्माला आले नाही तर ते ₹जनता₹ चेच रूपांतर होते.ही वृत्तपत्रे सामाजिक व सांस्कृतिक निकडीतून जन्माला आली होती.

समाजातील विषमता, सांस्कृतिक अहंकार, नेतृत्वातील विसंवाद, पोखरलेपण आणि अर्थहीनता विशद करून एक नवा समाज घडविण्याची प्रेरणा यामागे होती. बाबासाहेब आपल्या मूकनायक या पत्राच्या पहिल्या अंकात म्हणतात, आम्हाला या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रासारखी अन्य भूमीच नाही. (मूकनायक ३१ जानेवारी १९२०).

बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांनी केवळ अस्पृश्यांना व दलितांना जगविण्याचे कार्य केले नाही तर, स्पृश्यांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन वारंवार केले . या आवाहनाच्या मागे संपूर्ण भारतीय समाजाच्या एकात्मतेची, स्वातंत्र्याची व समतेची मागणी होती.

वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजेत अशी त्यांची धारणा होती, परंतु भारतीय वृत्तपत्रसृष्टीकडून ही अपेक्षा करणे चूक होते. अर्थात काही ध्येयवादी मराठी पत्रे होती आणि ती अपवादात्मक मानायलाही हवीत.

बाबासाहेबांना वृत्तपत्रांकडे केवळ धंदा म्हणून पाहणारी वृत्ती मान्य नव्हती. पुणे येथील न्या.रानडे व्याख्यानमालेत वृत्तपत्रासंबंधी विचार मांडताना बाबासाहेब म्हणाले होते, journalism in india was once a profession, it has now become a trade, it has




no more moral function than the manufacture of soap."

मुकनायकाचे संपादक म्हणून शिर्षभागी बाबासाहेबांचे नाव नसून त्याकाळातील उच्चविद्याविभूषित पांडुरंग नंदराम भटकर या विदर्भातील तरुणाचे नाव असले तरी, मुकनायकाचे संगोपन, धोरण, अग्रलेख बाबासाहेबांचेच असत. मूकनायक तसे अल्पजीवीच ठरले कारण मुकनायकाचे व्यवस्थापन आणि संपादन या दोन्ही बाबतीत बाबासाहेबांना फारसे समाधान नव्हते. ज्यांच्यावर जबाबदारी टाकली जाते ती माणसे अर्थहीन वाद निर्माण करतात.

याचा प्रत्यय बाबासाहेबांना आला होता तसेच त्यांना त्यावेळी परदेशातही जावे लागले. या कारणामुळे मूकनायक अल्पजीवी ठरले. परंतु ज्या पाक्षिक वृत्तपत्रावर त्यांचे संपादक म्हणून नाव होते आणि ज्या पत्राचा त्यांनी सर्वार्थाने प्रपंच केला ते पत्र होते बहिष्कृत भारत. या वृत्तपत्राला बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने जोपासले.

बहिष्कृत भारताच्या मागे अन्य वृत्तपत्रांसारखी कोणतीही सुसज्ज यंत्रणा नव्हती, संपादकीय विभाग नव्हता की, वितरणव्यवस्था नव्हती, हे सारे बाबांसाहेबांच करावे लागे. आपल्या पत्राला आर्थिक बळ मिळावे म्हणून त्यांनी बहिष्कृत भारत फंडासाठी आवाहन केले पण त्यांना फारसा प्रतिसाद लाभला नाही.

आपले वृत्तपत्र हा व्यवसाय नव्हे तर समाजप्रबोधन कायासाठी स्वीकारलेली जबाबदारी आहे,अशी त्यांची धारणा होती. आणि म्हणूनच बहिष्कृत भारताचे चोवीस-चोवीस रकाने स्वतःच लिहणाऱ्या या पत्रकाराने बहिष्कृत भारताचे ऋण हे लौकिक ऋण नव्हे काय? या शिर्षकाच्या ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकात नमूद केले.

ब्रिटिश शासनाने अनेक सुधारणा केल्या. त्यांच्यामुळे अस्पृश्याना शिकता आले, सैन्यात प्रवेश मिळाला हे बाबासाहेबांनी जरी मान्य केले असले तरी, ब्रिटिशांनीच भारताला गुलाम केले, भारताच्या गुलामगिरीला कारण ब्रिटिश धोरण आहे हे त्यांनी परखडपणे मांडले आहे.

भारताचा विचार करता, भारताला ब्रिटिशांनी देहाने गुलाम केले आहे असे उद्गार त्यांनी काढले.आंग्लाई ही एक जळू आहे व ती भारतातील संपत्तीचे शोषण करते (दुःखात सुख, बहिष्कृत भारत,१ जुलै १९२७) असा आरोप त्यांनी केला. इंग्रज सरकार धीमे आहे, मार्च ऑन करण्याऐवजी होता होईल तो मार्क टाईम करण्याचे अवलक्षण त्यांच्या अंगी अगदी खिळून गेले आहे व सामाजिक प्रश्न आले की त्यांचे पाय लटके पडतात. (महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारीः- बहिष्कृत भारत, ६ मे १९२७) असे स्पष्टपणे त्यांनी खडसावले.

धर्मांतरासंबंधी बाबासाहेबांनी केलेली मीमांसा लक्षणीय आहे. ते म्हणतात, धर्मांतर हा मौजेचा विषय नाही, हा प्रश्न माणसाच्या जीविताच्या साफल्याचा प्रश्न आहे. जहाज एका बंदरातून दुसऱ्या बंदरात नेण्याकरिता नावाड्याला जेवढी पूर्वतयारी करावी लागते तेवढीच पूर्वतयारी धर्मांतराकरिता करावी लागणार आहे.(मुक्ती कोण पथेः जनता २० जून १९३६)

बाबासाहेबांनी धर्मांतरासंबंधी दोन दृष्टीने विचार केला होता. १.सामाजिक आणि ऐहिक दृष्टीने तर २. धार्मिक आणि तात्विक दृष्टीने. धर्मांतर हे राष्ट्रांतर किंवा वस्त्रांतर नव्हे, अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. बाबासाहेबांनी आपल्या पत्रातून विविध प्रश्नांवर आपले विचार मांडले आहेत. त्यात बालविवाह ते सहशिक्षण, सहभोजन, तसेच शेती, शेतकरी, खोतशाहीपर्यंत.

या सर्व लेखनाचे सूत्र प्राधान्याने सामाजिक-सांस्कृतिक आणि नवसमाजनिर्मिती हेच आहे. गांधी, नेहरू यांपासून ते हिंदुमहासभा, सत्यशोधक समाज या संदर्भात ही त्यांनी परखड विचार मांडले आहेत. या प्रचंड लिखाणातून त्यांचा अभ्यास, तर्कशुद्धता, परखडपणा, चिकित्सकता यांचा प्रत्यय येतो. तेजस्वी विचारसरणी आणि धारदार भाषा, प्रतिपक्षावर अज्ञान आणि असत्यावर कठोर प्रहार करणारे बाबासाहेब अनेकदा उपरोधिक भाषेचाही उपयोग करतात.

यात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, बाबासाहेबांनी आपले विचार, भाषेच्या फुलोऱ्यातून मांडलेले नाहीत, लोडाशी टेकून भाषा सजविण्याचा किंवा श्रृंगारिक शब्दांचा सोस बाळगण्याची हौस त्यांना कदापि नव्हती. त्यांचे सर्व वृत्तपत्रीय लेखन चिंतनशील, मार्मिक आणि कृतीस आवाहन करणारे आहे.

बाबासाहेबांचे हे वैचारिक लेखन मराठी निबंध वाङ्मयाचा अलंकारच होय . स्वतःची अशी स्वतंत्र शैली निर्माण करणारे बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीला, लोकजागृतीच्या चळवळीचे भान दिले आहे. सर्व पत्रकार बांधवांना पत्रकार दिनाच्या मंगलमय सदिच्छा !!

# महाकुंभाची जमीन वक्फ बोर्डाची कशी?

प्रयागराज येथे महाकुंभाची सिद्धता अंतिम टप्प्यात आली आहे. लाखो भाविक आणि भक्तगण आतापासूनच या पावन क्षेत्रात आले आहेत. देशभरातून आणि विदेशातूनही संत-महंत, योगी, संन्यासी, साधू, साध्वी या ठिकाणी शाहीस्नानासाठी येतात. यंदा हा आकडा ५० कोटीच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाकडूनही भाविकांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

देशाच्या अर्थकारणात मोठा हातभार लावणाऱ्या हिंदूंच्या या महा उत्सवाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. हा सोहळा जवळून पाहण्यासाठी आणि येथील सात्विकता अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक भारतात येतात. दर तीन वर्षांनंतर एकदा अश्या पद्धतीने बारा वर्षांत प्रयागराज, उज्जैन, त्र्यंबकेश्वर, हरिद्वार या चार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री पूर्ण कुंभमेळे भरत असतात.

दर सहा वर्षांनी हरिद्वार व प्रयाग येथे अर्धकुंभमेळा भरतो. सूयाभोवती भ्रमण करणारे नऊ ग्रह एका रेषेत येतात त्यावेळी सूर्याचे किरण ज्या स्थानावर पडतात तिथे कुंभमेळ्याचे औचित्य असते असे मानले जाते. कुंभमेळ्यासाठी कोणालाही निमंत्रण दिले जात नाही. तरीही कोट्यवधी भक्तगण या ठिकाणी येतात हे या पर्वाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

कुंभमेळ्याचा संदर्भ पौराणिक धर्मग्रंथांतून दिसून येतो. भगीरथाने प्रयत्न करूनही गंगा नदी पृथ्वीवर अवतरण करायला तयार होत नव्हती, त्यावेळी तिला असे सांगितले गेले की कुंभमेळा प्रसंगी तुज्या पाण्यात साधू स्नान करतील. हे ऐकताच तिने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. त्यामुळे कुंभमेळ्यात विविध आखाडे आणि साधू यांचे विशेष महत्त्व आहे.

या उत्सवात विविध साधू आणि त्यांचे आखाडे यामध्ये होम-हवन, वैदिक मंत्रांचे पठण, प्रवचने, लोकांना उपदेश करणे असे अनेक विविध उपक्रम पहायला मिळतात. लाखो वर्षांपूर्वीपासून गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या पवित्र त्रिवेणी संगमावर कुंभमेळ्याचे आयोजन होत आले आहे.

जिथे कुंभ भरतो, ती गंगा मातेची भूमी असल्याचे मानले जात आहे. महाकुंभाचे एव्हढे सारे वैशिष्ट्य असताना आता एका नव्या वादाला तोंड फुटले आहे.

ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी कुंभमेळा स्थळावरील ५४ बीघा भूमीवर वक्फचा दावा केला आहे. वक्फच्या भूमीवर कुंभमेळा आयोजित करणे हा मुस्लिम समाजाचा मोठेपणा असल्याचे विधानही त्यांनी केले आहे.

महाकुंभाची सिद्धता अंतिम टप्प्यात आली असताना मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी केलेले विधान हा वक्फचा खोडकरपणा असून समस्त हिंदूंकडून त्यांचा निषेध केला जात आहे. कुंभमेळ्याच्या पवित्र वातावरणाला आणि हिंदूंच्या श्रद्धेला गालबोट लावण्याचा हा प्रकार असून मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी हिंदू संघटनांनी केली आहे.

जगभरात ज्या ज्या ठिकाणी मुस्लिमांची श्रद्धास्थाने आहेत त्या ठिकाणी गैर मुस्लिमांना दुकाने लावण्यास परवानगी दिली जात नाही, मग हिंदूंच्या परम पवित्र महाकुंभाच्या ठिकाणी मुस्लिमांना दुकाने लावण्यास परवानगी दिली जाऊ नये अशी भूमिका काही संत महंत आणि हिंदू संघटनांनी घेतली आहे.

त्या संदर्भात बोलताना मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी महाकुंभाची ५४ बीघा जमीन वक्फची असल्याचा दावा करत मुस्लिमांना त्याठिकाणी केलेल्या प्रवेशबंदीला विरोध केला आहे तर अरब राष्ट्रात वक्फ ही संकल्पनाही अस्तित्वात आली नव्हती तेव्हापासून प्रयागराजच्या पवित्र संगमावर कुंभमेळा आयोजित केला जात असल्याचे दाखले देत हिंदु जनजागृती समितीने मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांचे विधान खोडून काढले आहे.

वक्फ बोर्ड किंवा वक्फ कायदा आज पाकिस्तानसह कोणत्याही मुस्लिम राष्ट्रात नाही. असा कायदा बहुसंख्य हिंदू असलेल्या हिंदुस्थानात आहे याचे कोणालाही नक्कीच आश्चर्य वाटेल.

या वक्फ बोर्डाची स्थापना १९५४ साली केंद्र सरकारनेच केली असून आज देशभरात असे ३० हून अधिक वक्फ बोर्ड आहेत. १९९५ च्या वक्फ कायद्याच्या कलम तीनमध्ये असे लिहिले आहे की वक्फला कोणतीही जमीन आपली आहे, असे वाटत असले तरी ती त्याची मालमत्ता असेल. वक्फ बोर्डाला हे सिद्ध करण्याचीही गरज नाही.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

वक्फ बोर्डाने एखाद्या व्यक्तीच्या जमिनीवर हक्क सांगितला आणि ही जमीन वक्फची असल्याचे सांगितले तर ती चुकीची सिद्ध करण्याची जबाबदारी वर उल्लेख केल्यानुसार त्या जमिनीच्या मालकाची असेल. जर न्यायाधिकरणाने मालकाची आवृत्ती स्वीकारली नाही, तर न्यायालयही हा निर्णय बदलू शकत नाही.

एखादी जमीन एकदा वक्फची झाली कि ती कायमस्वरूपी वक्फचीच होऊन जाते. त्या जमिनीवरील स्थावर जंगम मालमत्ताही वक्फच्या अधिकारात येते. वक्फ हा अरबी शब्द आहे ज्याचा अर्थ राहणे असा असून देवाच्या नावाने अर्पण केलेली वस्तू असाही त्याचा एक अर्थ सांगितला जातो.

वक्फ म्हणजेच कोणत्याही मुस्लिमाने धार्मिक कार्यासाठी दान केलेली मालमत्ता. १९९५ साली देशात पी.व्ही. नरसिंहराव सरकार असताना सरकारने १९५४ च्या वक्फ कायद्यात सुधारणा करून वक्फ बोडार्ला अमर्याद अधिकार बहाल केले. ज्यामुळे दानधर्म राहिला बाजूला भारतातील वक्फ बोर्ड हिंदूंच्याच भूमीवर अधिकार सांगून ती भूमी ताब्यात घेऊ लागला आहे.

वक्फ कायदा १९९५ चे कलम ४० म्हणते की, एखादी जमीन कोणाची आहे, हे वक्फ बोर्ड ठरवेल. वक्फला जर एखादी जमीन आपल्या आपल्या मालकीची वाटल्यास, ती जमिन वक्फ बोर्डाची होईल. देशभरात मनमानी करून मुस्लिमेतर समाजाची लाखो एकर भूमी बळकावणाऱ्या वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्याद अधिकारांवर अंकुश आणण्याची मागणी मागील कित्येक वर्षांपासून केली जात आहे. त्याकरिता केंद्र सरकारने जनतेकडून मते मागितली. जाणकारांकडून मार्गदर्शन घेतले; मात्र त्याचे पुढे काय झाले? हा प्रश्न आता सरकारला विचारला जात आहे. मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्या विधानाने वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्याद अधिकारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे.

## ७ जानेवारी दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**

१६१०: गॅलेलिओ यांनी दुर्दार्शीच्या सहाय्याने इयो, युरोपा, गॅनिमिडी आणि कॅलिस्टो या गुरूच्या चार उपग्रहांचा शोध लावला.

१६८०: मुंबई कौन्सिलने शिवाजी महारांजाबरोबर करायच्या कराराचा मसुदा तयार केला.

१७८९: अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन निवडून आले.

१९२२: पंजाब केसरी लाला लजपतराय आणि त्यांचे सहकारी पंडित संतानम यांना राजद्रोहाच्या आरोपावरुन १८ महिन्यांची शिक्षा झाली.

१९७२: कन्याकुमारी येथील विवेकानंद केन्द्राचे काम पूर्ण झाले.

२०२२: कोविड-१९ - जगभरात ३० करोड पेक्षा अधिक लोकांना कोरोना साथीची लागण झाली.

**७ जानेवारी जन्म :**

१८९३: जानकीदेवी बजाज यांचा जन्म.

१९२०: सरोजिनी बाबर यांचा जन्म.

१९२१: अभिनेते चंद्रकांत गोखले यांचा जन्म.

१९४८: विदुषी व लेखिका शोभा डे यांचा जन्म.

१९६१: अभिनेत्री सुप्रिया पाठक यांचा जन्म.

१९७९: अभिनेत्री बिपाशा बासू यांचा जन्म.

१९६७: भारतीय अभिनेते इरफान खान यांचा जन्म

**७ जानेवारी मृत्यू :**

१९८९: जपानी सम्राट हिरोहितो यांचे निधन.

१९५७: वास्तुविशारद - जोजे प्लेनिक यांचे निधन.

१९२०: ऑस्ट्रेलिया देशाचे पहिले पंतप्रधान एडमंड बार्टन यांचे निधन.

२०००: स्वातंत्र्यसैनिक डॉ. अच्युतराव आपटे यांचे निधन.

# औषधांची फॅक्टरी आहे ही भाजी




बीनच्या शेंगांमध्ये असलेले पोषक तत्व हिवाळ्यात फायदेशीर ठरतात. या भाजीच्या सेवनामुळे शरीर निरोगी असते. शरीरात उत्साह ठेवण्यास त्यामुळे मदत मिळते.

बीनच्या शेंगांमध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजांचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत. विशेषतः जीवनसत्त्वे ए, ई तसेच लोह, कॅल्शियम आणि मॅग्नेशियममध्ये समृद्ध आहे.

शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी बीनच्या शेंगाची भाजी फायदेशीर आहे. यामुळे हाडे मजबूत होतात. पचनसंस्था निरोगी ठेवण्यास त्याची मदत होते. याशिवाय यामध्ये असलेले फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते.

बीनच्या शेंगा वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्यांमध्ये मिसळून बनवल्या जातात. बटाटे, कोबी किंवा वाटण्यात मिसळून हे बनवता येते. त्यामुळे त्याची चव आणखी वाढते.

आयुर्वेदानुसार, हिवाळ्यात शरीराला उबदार आणि पोषक ठेवण्यासाठी बीन्सच्या शेंगांचा नियमित आहारात समावेश केला पाहिजे. त्यामुळे शरीराला थंडीपासून संरक्षण मिळते. पण त्यात असलेले पोषक तत्व शरीराला ऊर्जावान ठेवतात.

हिवाळ्यात आहारात जो बदल केला जातो तो आपल्याकडील हवामान आणि वातावरण बदलून केले जाते. थंडीत शरीरासाठी काय फायदेशीर आहेत, त्याची माहिती आयुर्वेदात असून त्यानुसार फळे, भाज्या यांचे सेवन करण्याची परंपरा आहे.

## अशोकायन

### नाही कसं म्हणता ?

डोळे असून आंधळे
कान असुन बहिऱ्यांची
समाजात संख्या
नाही कमी म्हणूनच
भ्रष्टाचार अत्याचार व
जिवित्वाची राहीली
नाही हमी...

२० टक्के लोकांच्या हाती
आहे हुकमी एक्का
कारण ८० टक्के बजावतात
'जी रं जी ' ची भूमिका ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# एसयूडी लाइफने त्यांचा आणखी एक युनिट लिंक्ड फंड लॉन्च केला: एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड

**नागपूर, ६ जानेवारी :** स्टार युनियन डाई-इचि लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाइफ) या नवीन वर्षात एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड सुरू करण्याची घोषणा करत आहे, ज्यामुळे पॉलिसीधारकांना भारताच्या उत्साही मिड-कॅप बाजारातील वाढीच्या संधीचा लाभ घेण्याची रोमांचक संधी मिळते.

ज्यांना माहित नाही, मिडकॅप कंपन्या त्या आहेत ज्या सिद्ध व्यवसाय मॉडेलसह उच्च वाढीसाठी तयार आणि इक्विटी बाजारात कमी गुंतवणूक केलेल्या आहेत. जरी मिड-कॅप निर्देशांक उच्च अस्थिरता दर्शवू शकतात, तरीही ते अनेकदा मोठ्या कॅप निर्देशांकांपेक्षा दीर्घकालीन दृष्ट्या उत्कृष्ट परतावा देतात, त्यामुळे हे वाढीच्या दिशेने लक्ष केंद्रित करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आकर्षक निवड बनतात. दुसरीकडे, मॉमेंटम गुंतवणूक कमी जोखमीसह असते. एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड, ज्यात ६ महिन्यांच्या पुनर्संतुलनाची प्रक्रिया आहे, सर्वोत्तम कार्यरत स्टॉक्स हायलाइट करते आणि पद्धतशीरपणे कमी कार्यक्षम स्टॉक्स काढून टाकते. ही पुनर्संतुलन पद्धती मजबूत परताव्यावर लक्ष केंद्रित करत असताना, कमी अस्थिरता दर्शविणाऱ्या स्टॉक्सना सुद्धा बक्षिसे देते.

हा फंड निफ्टी मिडकॅप १५० मोमेंटम ५० निर्देशांक चा मागोवा घेतो, जो दोन शक्तिशाली गुंतवणूक धोरणे: मिड-कॅप वाढीची क्षमता आणि मॉमेंटम एकत्र करतो. हे उत्कृष्ट कार्यरत मिड-कॅप स्टॉक्स ओळखतो, जे त्यांच्या किमतीच्या मॉमेंटमच्या आधारावर निश्चित कालावधीमध्ये कार्यरत असतात, यामुळे सतत कार्यक्षमता आणि वाढीच्या प्रवृत्तीं दर्शविणाऱ्या कंपन्यांचा एक लक्षित पोर्टफोलिओ सुनिश्चित केला जातो. हा फंड कमी खर्चात, विविधता असलेला मिडकॅप स्टॉक्सचा पोर्टफोलिओ तयार करतो, ज्यामुळे गुंतवणूकदारांना मिडकॅप युनिव्हर्समधील विविध स्टॉक्समध्ये वाढीचे चक्र पकडण्यास मदत मिळते.

एसयूडी लाइफ चा मिड कॅप मोमेंटम इंडेक्स फंड मध्यम ते उच्च जोखमीच्या आवडी असलेल्या गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे, जो दीर्घकालीन भांडवली वाढीचा उद्देश ठेवतो आणि भारताच्या विकसित मिड-कॅप बाजारात प्रवेश मिळवू इच्छितो. हे त्या व्यक्तींना उपयुक्त आहे ज्या स्मार्ट, मॉमेंटम-चालित धोरण वापरून त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये सुधारणा करू इच्छितात, असे प्रशांत शर्मा, एसयूडी लाइफ चा मुख्य गुंतवणूक अधिकारी म्हणाले.

एसयूडी लाइफ च्या मिड कॅप मोमेंटम इंडेक्स फंड सह, गुंतवणूकदार बाजाराच्या कलनवर लक्ष ठेवू शकतात आणि त्यांच्या पोर्टफोलिओंना भारताच्या वाढीच्या कहाणीतून लाभ मिळवण्यासाठी स्थानबद्ध करू शकतात, त्याच वेळी त्यांच्या जीवन विम्याचे संरक्षण देखील राखून ठेऊ शक्ततात. आजच गुंतवणूक करा आणि आपल्या आर्थिक उद्दिष्टांच्या दिशेने एक आत्मविश्वासाने पाऊल उचला.

हा फंड एसयूडी लाइफ स्टार ट्यूलिप, एसयूडी लाइफ वेल्थ क्रिएटर, एसयूडी लाइफ वेल्थ बिल्डर, आणि एसयूडी लाईफ ई-वेल्थ रॉयल अंतर्गत उपलब्ध असेल..

या पॉलिसीमध्ये, गुंतवणूक पोर्टफोलिओमधील गुंतवणुकीची जोखीम पॉलिसीधारकाने उचलली आहे.

# सॅमसंगची भारतातील एसी व्यवसायात मोठी बाजी : २०२५ मध्ये नवीन विंड फ्री मॉडेल्स लाँच करण्यासाठी सज्ज

**गुरुग्राम, ६ जानेवारी :** भारतातील सर्वोच्च ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड असलेले सॅमसंगने २०२५ या वर्षात वातानुकुलीत यंत्र श्रेणीच्या क्षेत्रात एक डझनहून अधिक मॉडेल्स लाँच करण्याची योजना आखली आहे. दक्षिण कोरियातील उपकरणांची प्रमुख कंपनी असलेल्या सॅमसंगने ग्राहककेंद्री लक्ष वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. उद्योग तज्ज्ञांच्या मते वातानुकुलीत यंत्रांच्या श्रेणीत सॅमसंग हा भारतातील प्रमुख ब्रँड बनू इच्छित आहे.

सॅमसंगचे हे नवीन वातानुकुलीत यंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता गुणवत्ता योग्य आधारावर समर्थित असणार आहे. प्रीमियम दर्जाची वातानुकुलीत यंत्र खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना यातून आकर्षित केले जाणार आहे.रेफ्रिजरेटर आणि वॉशिंग मशीन श्रेणींमध्ये सॅमसंगने कृत्रिम बुद्धिमत्ता गुणवत्ता योग्य आधारावर सर्व घरगुती उपकरणांच्या क्षेत्रात भारतीय बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे सॅमसंगने आगामी वर्षात वातानुकुलीत यंत्रांच्या श्रेणीमध्ये विस्तार करण्यास चांगली सुरुवात केली आहे, असे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

सॅमसंगची नवीन वातानुकुलीत यंत्राची श्रेणी जलद आणि आरामदायी कूलिंग, ऊर्जा बचत, सोयी आणि टिकाऊपणासह उत्कृष्ट सौंदर्याचा मेळ घालत शक्तिशाली एअर कंडिशनरची ग्राहकांची मागणी पूर्ण करेल, असे जागरूक वितरकांचे म्हणणे आहे. भारतात रूम एअर कंडिशनर (RAC) उद्योग उल्लेखनीय वाढीच्या मार्गावर आहे. त्यामुळे अनेक विश्लेषकांनी २०२५ या वर्षात विक्रीचे प्रमाण वार्षिक २०% पर्यंत वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

## सा रे ग म प चा मेंटॉर जिगर म्हणाला, आमच्या इंडस्ट्रीतील सर्वोत्कृष्ट लेखकांपैकी एक प्रिया माझी पत्नी आहे यासाठी मी खूप भाग्यवान आहे असे मला वाटते



**मुंबई, ६ जानेवारी :** झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे. ह्या वीकेन्डला दीर्घ प्रतीक्षेतील रेसटूदिफिनाले एपिसोड संगीतप्रेमींसाठी नक्कीच खास असेल कारण ह्या शोमध्ये संगीत उद्योगातील नावाजलेल्या ज्यूरी सदस्यांचे स्वागत केले जाईल.

या शनिवार व रविवारच्या भागादरम्यान एका हृदयस्पर्शी क्षणी मेंटॉर जिगर सरैयाला एक आनंददायक आश्चर्य मिळाले जेव्हा त्याची पत्नी, प्रसिद्ध गीतकार आणि पार्श्वगायिका प्रिया सरैया शोमध्ये हजर झाली. तिच्या उपस्थितीने मनापासून प्रभावित झालेल्या जिगरने प्रियाने आपल्या जीवनावर आणि करिअरवर किती प्रभाव पाडला आहे हे शेअर केले. सचिन-जिगर जोडीच्या यशामागील एक प्रमुख शक्ती म्हणून त्याने तिला श्रेय दिले. कशी तिने केवळ १५ मिनिटांत 'सायबो' आणि 'जीना जीना' सारखी आयकॉनिक गीते लिहिली आणि त्यांच्या आव्हानात्मक दिवसांमध्ये ती कशी त्यांच्या पाठीशी उभी राहिली हे ही त्याने सांगितले. जिगरने प्रियाच्या बिनशर्त पाठिंब्याबद्दल आणि योगदानाबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली आणि संगीत उद्योगातील त्यांच्या प्रवासात ती किती महत्त्वपूर्ण आहे यावर भर दिला.

जिगर म्हणाला, मी अगदी मनापासून बोलतोय. खूप कमी लेखक आहेत जे विविध शैलींमध्ये अखंड गीते तयार करू शकतात आणि प्रिया निःसंशयपणे त्यापैकी एक आहे. 'सायबो' सारख्या गाण्यापासून ते 'स्लोली स्लोली', 'मिलेया मिलेया' आणि 'मेरे मेहबूब' सारख्या चार्टबस्टरपर्यंत, प्रियाने आपल्या रचना खरोखरच उंचावल्या आहेत. मला अनेकदा असे वाटते की अशी अपवादात्मक गीते आमच्याकडे येण्यासाठी आम्ही काहीतरी योग्य केले असावे. जेव्हा आम्ही प्रियाला चाल पाठवतो तेव्हा ती त्याचे बोल थेट मला पाठवत नाही. ते माझ्यापर्यंत पोहोचण्याआधी ते नीट व्हावेत म्हणून ती ते नेहमी सचिनसोबत प्रथम शेअर करते. मागे वळून पाहताना मला जाणवते की हा एक आशीर्वादच आहे. जर मी त्यांना मान्यता दिली असती तर कदाचित ही गाणी इतकी हिट झाली नसती!

तो पुढे म्हणाला, आम्ही फक्त पती-पत्नी नाही तर चांगले मित्रही आहोत. प्रियाने सचिनच्या आणि माझ्या आयुष्यावर खूप मोठा प्रभाव पाडला आहे आणि आम्ही या गोष्टीचे खरोखर कौतुक करतो. एक वेळ अशी होती जेव्हा आमच्याकडे गाणे नव्हते आणि १५ मिनिटांत मीटिंग होती, पण जसा आम्ही मॉल सोडला आणि स्टुडिओकडे चालायला लागलो तेव्हा आम्ही फक्त 'सायबो' शब्दाचा विचार केला आणि प्रियाने १५ मिनिटांत गाण्याचे कोरस लिहिले. आम्ही तिथे पोहोचलो. अजून एक प्रसंग होता जिथे एक निर्माता येणार होते आणि आमच्याकडे गाणे नव्हते. तेव्हाच आम्ही गाण्याचा मसुदा तयार करण्याचे ठरवले आणि निर्माते समोरच्या गेटवरून वर आले तोपर्यंत प्रियाने 'जीना जीना' गाण्याचे बोल सुरुवातीपासून शेवटपर्यंत लिहिले. त्यामुळे, आमच्या इंडस्ट्रीतील सर्वोत्कृष्ट लेखकांपैकी एक प्रिया माझी पत्नी आहे यासाठी मी खूप भाग्यवान आहे असे मला वाटते.

जिगरचा प्रामाणिक खुलासा या तिघांच्या छान सहकार्यावर भर देतो, ज्यामुळे लाखो लोकांची मने जिंकलेली अनेक अविस्मरणीय गाणी निर्माण झाली आहेत.

## सॅमसंग इंडियाकडून बिग टीव्ही डेज मोहिमेची घोषणा, एआय-पॉवर्ड प्रीमियम टीव्हीवर आकर्षक ऑफरचा लाभ

**गुरुग्राम, ६ जानेवारी :** भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने नवीन वर्ष आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त 'बिग टीव्ही डेज' मोहीम सुरू केली आहे. यामध्ये मोठ्या स्क्रीनच्या प्रीमियम टीव्हीवर उत्तम ऑफर्स दिल्या जात आहेत. यामध्ये निओ क्यू एलईडी, निओ क्यू एलईडी ४ के, ओ. एलईडी, आणि ४ के युएचडी टीव्ही मॉडेल्सचा समावेश आहे. ही मोहीम ३ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधी पर्यंत लागू आहे.

ज्या ग्राहकांना घरगुती मनोरंजनाचा अनुभव वाढवायचा आहे, ते या अविश्वसनीय संधीचा लाभ घेऊ शकतात. सॅमसंगकडून २,०४,९९० रुपयांपर्यंतच्या टीव्हीच्या निवडक खरेदीवर ९९,९९० रुपयांपर्यंतचे मोफत साउंडबार ऑफर करण्यात आले आहे. सॅमसंगची प्रीमियम टीव्ही श्रेणी देशभरातील ग्राहकांचा टीव्ही पाहण्याचा अनुभव आणखी समृद्ध करीत आहेत. सॅमसंगची उपकरणे एआय अपस्केलिंग आणि उत्तम तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. यामुळे फोटो अधिक स्पष्ट, स्वच्छ आणि वास्तविक दिसतात.

नवीन वर्षात सॅमसंग ग्राहकांना क्रांतिकारी दृकश्राव्य अनुभव देण्यासाठी सज्ज आहे. ग्राहक त्यांच्या निवडक टिव्ही खरेदीवर २०% कॅशबॅक, शून्य डाउन पेमेंट आणि ३० महिन्यांपर्यंत सर्वात कमी इएमआय सारख्या सवलती मिळवू शकतात. या




रोमांचक ऑफर Samsung.com सह भारतभरातील आघाडीच्या ऑनलाइन पोर्टल्स आणि सॅमसंग रिटेल आउटलेट्समध्येही उपलब्ध असतील.

सॅमसंग इंडियाच्या व्हिज्युअल डिस्प्ले बिझनेसचे वरिष्ठ संचालक विपलेश डांग म्हणाले, सॅमसंगमध्ये, आम्ही बिग टीव्ही डेज मोहिमेसह घरातील मनोरंजनाची व्याख्या समृद्ध करत आहोत. हे टीव्ही तुमच्या लिव्हिंग रूमला सिनेमा हॉलमध्ये परावर्तित करून जबरदस्त आवाज आणि स्मार्ट कनेक्टिव्हिटी सारख्या सुविधा देतात. या नवीन वर्षात सॅमसंग नॉक्स ही एक विशेष सुरक्षा तुमचा डेटा आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याची हमी देते.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक तंत्रज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे हा सॅमसंगच्या नवीन ऑफर्सचा उद्देश

आहे. जेणेकरून अधिकाधिक लोक प्रीमियम टीव्ही श्रेणी खरेदी करू शकतील. सॅमसंगचे प्रीमियम एआय टीव्ही एआय अपस्केलिंग आणि एआय ऑप्टिमायझेशनसह तुमचा टीव्ही पाहण्याचा अनुभव आणखी समृद्ध करेल. यामुळे टीव्हीवर अधिक स्पष्ट, स्पष्ट आणि सुंदर चित्रे दिसतात. क्यू सिंफनी आणि डॉल्बी ॲटोमस सह, सभोवतालचा आवाज टीव्ही दृश्यांना सिनेमा हॉलसारखा भव्य बनवतो. सॅमसंग नॉक्स सुरक्षा प्रणाली तुमची वैयक्तिक माहिती पूर्णपणे सुरक्षित ठेवून तुमचा टीव्ही आणि त्याच्याशी जोडलेल्या उपकरणांना कोणत्याही अनधिकृत संचालनापासून संरक्षित करते.

हे नवीन सॅमसंग टीव्ही एआय आणि क्वांटम मॅट्रिक्स तंत्रज्ञानाद्वारे समर्थित आहेत. जे अतुलनीय कॉन्ट्रास्ट, स्पष्टता आणि प्रतिमांची चमक प्रदान करतात. यामुळे प्रत्येक खोलीत सिनेमा हॉलसारखा अनुभव येतो. आपल्या 'बिग टीव्ही डेज' मोहिमेसह, प्रत्येकासाठी एआय तंत्रज्ञान आणण्यासाठी आणि भारतीय ग्राहकांच्या टीव्ही पाहण्याचा अनुभव समृद्ध बदलण्यासाठी सॅमसंग वचनबद्ध आहे. सॅमसंग बिग टीव्ही डेज सेलसह, तुम्हाला नावीन्य, प्रीमियम डिझाइन आणि उत्कृष्ट मूल्याचा योग्य संतुलन मिळेल. नवीन ऑफर निओ क्यू एलईडी ८ के, निओ क्यू एलईडी ४ के आणि ओ. एलईडी टिव्ही ९८ इंच, ८५ इंच, ७७ इंच, ७५ इंच, ६५ इंच, ५५ इंच आकारात उपलब्ध आहेत.



## ॲक्सेलने उभारला नवीन ६५० मिलियनचा फंड

**मुंबई ६ जानेवारी :** आघाडीची ग्लोबर व्हेंचर कॅपिटल फर्म ॲक्सेलने आज ६५० मिलियनचा प्रारंभिक टप्प्याचा फंड उभारल्याची घोषणा केली आहे, जो भारत आणि दक्षिण-आशियातील धाडसी संस्थापकांना पाठिंबा देण्यासाठी समर्पित आहे. ॲक्सेलचा हा आठवा फंड प्रारंभिक टप्प्यातील संस्थापकांसोबत भागीदारी करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेवर आधारित आहे, ज्यायोगे परिवर्तन घडविणारे आणि श्रेणी-निर्धारण करणारे व्यवसाय उभारले जातील, जे अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करतील. ॲक्सेल आपल्या ४० हून अधिक वर्षांच्या अनुभवाचा आणि जागतिक प्लॅटफॉर्मचा लाभ घेत, संस्थापकांना त्यांच्या क्षेत्रात आघाडी मिळविण्यासाठी मार्गदर्शन, नेटवर्क्स आणि समर्थन प्रदान करते.

भारत आणि दक्षिण-आशियामध्ये १६ हून अधिक वर्षांपासून कार्यरत असलेल्या ॲक्सेलने ई-कॉमर्स, SaaS (सॉफ्टवेअर ॲज अ सर्व्हिस)पासून उत्पादन क्षेत्रापर्यंत अनेक उद्योगांची पुनर्रचना करणाऱ्या कंपन्यांसोबत भागीदारी केली आहे. ॲक्सेलने अमागी, ॲको, ब्लॅकबक, ब्लूस्टोन, ब्राउजरस्टॅक, कल्ट.फिट, फ्लिपकार्ट, फ्रेशवर्क्स, स्विगी, अर्बन कंपनी आणि झेटवर्क यांसारख्या विविध क्षेत्रांतील कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ॲक्सेल आपल्या पोर्टफोलियोमधील ८०% कंपन्यांमध्ये पहिला संस्थात्मक गुंतवणूकदार (फर्स्ट इंस्टिट्युशनल इन्व्हेस्टर) राहिला आहे.

ॲक्सेलचे भागीदार शेखर किरानी म्हणाले, भारताचे स्टार्टअप इकोसीस्टम देशाच्या आर्थिक प्रगतीमागील प्रमुख प्रेरक शक्ती बनत आहे. ज्यामध्ये व्हीसी-समर्थित कंपन्यांनी सार्वजनिक बाजार भांडवलात ५० अब्जांहून अधिक आकडा पार केला आहे. भारतीय उद्योजकांनी स्थिर आणि टिकाऊ व्यवसाय उभारले आहेत, ज्यांना सार्वजनिक बाजारपेठेने मोठ्या प्रमाणावर स्वीकारले आहे. भारताच्या GDPआणि सार्वजनिक बाजार भांडवलात वाढ होत असताना, आम्हाला ठाम आणि दूरदृष्टी असलेल्या संस्थापकांच्या नेतृत्वाखालील बदल घडविणाऱ्या व्यवसायांकडून मोठे परिणाम अपेक्षित आहेत. नेहमीप्रमाणे ॲक्सेल या महत्त्वाच्या उद्योजकांचा पहिला भागीदार होण्यासाठी कटिबद्ध आहे.

अलीकडच्या वर्षांत ॲक्सेलने संस्थापकांचा प्रवास शक्य तितका सुलभ करण्यासाठी आणि इकोसीस्टमच्या वाढीस चालना देण्यासाठी काही महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. कंपनीची ओपन-सोर्स कंटेंट आणि कम्युनिटी प्लॅटफॉर्म ही यशस्वी संस्थापक, ऑपरेटर्स आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठितांकडून मिळालेल्या उपयुक्त माहितीच्या आधारे कंपनी उभारणीचे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचविते. ॲक्सेलचा आरंभिक टप्प्यातील व्यवसाय विस्तार उपक्रम ॲक्सेल ॲटम्स हा सध्या आपल्या चौथ्या सत्रात आहे. आजपर्यंत ३६ स्टार्टअप्सना सहकार्य प्रदान केले आहे. या स्टार्टअप्सनी एकत्रितपणे २०० दशलक्षांहून अधिक निधी उभारला आहे. फक्त गेल्या दोन वर्षांतच ॲक्सेलने भारतातील किंवा भारतीय वंशाच्या संस्थापकांद्वारे उभारलेल्या २७ हून अधिक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली आहे.

## २०२५ नवीन वर्षानिमित्त वी ने सुपरहिरो सादर करून आपला वार्षिक रिचार्ज पोर्टफोलिओ मजबूत केला

**नागपूर, ६ जानेवारी :** आघाडीची टेलिकॉम ऑपरेटर कंपनी वी ने नुकताच सादर केला आहे सुपरहिरो, हाय-स्पीड डेटाची मागणी सातत्याने वाढत असल्याने डिझाईन करण्यात आलेल्या या प्रस्तावामध्ये रात्री १२ ते दुपारी १२ वाजेपर्यंत अनलिमिटेड डेटा ॲक्सेस पुरवला जात आहे. वार्षिक पॅक किंवा पैशाचे पुरेपूर मूल्य वसूल करून देणाऱ्या ऑफर्स ज्यांना हव्या असतात अशा ग्राहकांसाठी ही डील अजून जास्त आकर्षक करण्यासाठी वी ने बेस्ट इन व्हॅल्यू ॲन्युअल रिचार्जचे तीन पर्याय प्रस्तुत केले आहेत, त्यामुळे मासिक प्लॅन्सच्या तुलनेत २५% पर्यंत बचत होईल, इतकेच नव्हे तर, मनोरंजन आणि अखंडित मोबाईल डेटाच्या गरजा संपूर्ण वर्षभर पुरवल्या जातील.

वी च्या वार्षिक रिचार्ज प्लॅन्समध्ये रात्री १२ ते दुपारी १२ वाजेपर्यंत अर्धा दिवस अनलिमिटेड डेटा मिळेल, त्याखेरीज दिवसाच्या उरलेल्या १२ तासांसाठी २ जीबी दैनंदिन डेटा कोटा देखील मिळेल. इतकेच नव्हे तर, वी सुपरहिरो पॅकमध्ये वीकएन्ड डेटा रोलओव्हरची देखील सुविधा आहे, त्यामुळे युजर्सना न वापरलेला वीकडे डेटा कॅरी फॉरवर्ड करून वीकएन्डला वापरता येईल. या प्लॅन्समध्ये डेटा डिलाईट सुविधा असल्याने इमर्जन्सी डेटा टॉप-अप देखील करता येईल, यामध्ये कोणत्याही अटी व शर्तींविना अतिरिक्त १ जीबी डेटा महिन्यातून दोनदा मिळेल. अतुलनीय मूल्य प्रदान करण्यासाठी तयार केलेले वी चे वार्षिक सुपरहिरो पॅक युजर्सना आवडतील हे नक्की!

या लाभांव्यतिरिक्त युजर्सना डिस्ने+ हॉटस्टार आणि ॲमेझॉन प्राईम लाईट यांसारख्या सबस्क्रिप्शन्स संपूर्ण वर्षभर मिळवता येतील.

वी च्या वार्षिक सुपरहिरो पॅकच्या किमती दर दिवसासाठी कमीत कमी १० रुपये असून त्यामुळे मासिक रिचार्जेसच्या तुलनेत २५% पर्यंत बचत करण्याची संधी मिळते, ज्याचे मूल्य जवळपास ११०० रुपयांपेक्षा जास्त आहे. एकदाच रिचार्ज करण्याची सुविधा खर्च केलेल्या पैशांचे सर्वोत्तम मूल्य ज्यांना हवे असते, त्यांच्यासाठी ही खूप छान निवड आहे.

## मुख्यमंत्र्यांनी दिले ॲडव्हांटेज विदर्भला सहकार्य करण्याचे आश्वासन

**नागपूर, ६ जानेवारी :** विदर्भातील उद्योगांचा विकास व्हावा, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने फेब्रुवारी २०२५ मध्ये भव्य प्रमाणात होत असलेल्या खासदार औद्योगिक महोत्सव - ॲडव्हांटेज विदर्भ २०२५ ला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिले.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एड) चे अध्यक्ष अध्यक्ष आशिष काळे, उपाध्यक्ष गिरीधारी मंत्री, सचिव डॉ. विजय कुमार शर्मा व कार्यकारी मंडळाचे सदस्य महेश साधवानी यांनी रविवारी मुख्यमंत्र्यांची त्यांच्या रामगिरी बंगल्यावर भेट घेतली.

आशिष काळे यांनी एआयडीच्या वतीने ७ ते ९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानात आयोजित करण्यात येत असलेल्या ॲडव्हांटेज विदर्भ-२०२५ या भव्य प्रदर्शन व बिझनेस कॉन्क्लेव्हची सविस्तर माहिती दिली व महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थति राहण्याचे आमंत्रित केले.


## आज का अंदाज

मंगळवार ७ जानेवारी २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| ६७८ | २३७ | १६८ | १३४ | २५७ | १५९ | ११४ | ४५० |
| ५७९ | ५७० | २६७ | ३५० | ७८९ | २५८ | २७७ | ५७७ |
| ४७० | ६६० | ३५७ | ५६७ | ६८० | ३४८ | ३३० | ३८८ |
| १० | २० | ५३ | ८३ | ४० | ५० | ६७ | ९७ |
| १४ | २४ | ५७ | ८७ | ४१ | ५१ | ६८ | ९८ |
| १६ | २६ | ५९ | ८९ | ४२ | ५२ | ६३ | ९३ |

७ जानेवारी: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ७८ | ०८ |
| ३२ | ६२ | ७५ | ०५ |
| ३९ | ६९ | ७४ | ०४ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** शिक्षणात रस घ्याल. बेरोजगारांना रोजगार मिळण्याची चिन्हे आहेत. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. प्रियजनांसोबत सुखद क्षण शेअर कराल. लक्ष्यावर लक्ष केंद्रित ठेवा.

**वृषभ :** काम आणि व्यवसाय सांभाळू शकाल. योजनांना गती मिळेल. निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. व्यावसायिक बाबतीत सोयीस्कर राह. आर्थिक बाजू चांगली राहील.

**मिथुन :** परीक्षा स्पर्धेत अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी कराल. छोट्या छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा. चर्चेत आरामात रहा. शिस्तीवर भर द्या. करिअर आणि व्यवसायात यश मिळेल. मोह टाळा.

**कर्क :** विस्तारासाठी प्रयत्न केले जातील. मनोबल वाढेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत आनंद शेअर कराल. चांगल्या कामासाठी तुम्हाला सन्मान मिळेल. आनंदात वेळ जाईल.

**सिंह :** इमारत आणि वाहनाच्या बाबतीत काळजी घेऊ शकाल. व्यवस्थापन प्रशासन चांगले होईल. सहकारी मदत करतील. आज घरी पाहुणे येऊ शकतात. नोकरी-व्यवसायात अनुकूलता येईल.

**कन्या :** नम्रता आणि सहभाग वाढेल. उद्योजकता वाढेल. नातेसंबंध चांगले राहतील. सहकारी अपेक्षा पूर्ण करतील. चांगले प्रस्ताव मिळतील. आनंदात वाढ होईल. तुम्हाला नवीन सहयोगी लाभतील.

**तुळ :** प्रशासकीय निकाल लावले जातील. यशाची टक्केवारी चांगली राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा. कर्ज घेणे टाळा. आज तुम्ही मित्रांच्या मदतीने तुमच्या इच्छित कामांना गती द्याल.

**वृश्चिक :** अनोळखी व्यक्तींशी बोलणे टाळा. अनुकूल वातावरणाचा लाभ घ्याल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. योग्य गोष्टीवर लक्ष केंद्रित केले जाईल. प्रियजनांच्या सुखाची काळजी घ्या.


**धनु :** कलागुण दाखविण्याच्या संधी वाढतील. शुभ कार्यात सहभागी व्हाल. सौंदर्यदृष्टी वाढेल. जीवनशैली सुधारेल. प्रेमातीव व्यक्तींना भेटवस्तू मिळतील. बजेटच्या बाहेरील खर्चावर नियंत्रण ठेवावे.

**मकर :** मनाच्या बाबतीत आनंदाचे आणि आनंदाचे क्षण येतील. प्रेमसंबंधात शुभता राहील. बोलणे आणि वागणे प्रभावी होईल. पुढाकार कायम ठेवा. कलात्मक कौशल्ये मजबूत होतील.

**कुंभ :** व्यवसायात प्रगती होईल. महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण करा. यशाची टक्केवारी जास्त असेल. विरोधक शांत राहतील. ध्येय स्पष्ट ठेवेल. तुमच्या करिअर आणि व्यवसायासाठी समर्पित व्हा.

**मीन :** आज तुम्ही सेवा व्यवसायाच्या क्षेत्रात प्रभावशाली व्हाल. कामात सावध राहाल. मेहनती राहावे. शिस्त वाढेल. व्यावसायिकतेने काम कराल. व्यवस्थापनात सुसंगतता असेल.

## शब्दकोडे क्रमांक २००९



**आडवे शब्द :-**

१) वर-वधूची मिरवणूक
५) ह्यगय, दुर्लक्ष
८) स्वच्छ
१०) साखळी लावलेला लोंबता दिवा
१२) हवेतील शीतलता
१४) गळाला अडकणारा जलचर
१६) फिकीर, काळजी
१७) एक द्विदल धान्य
१८) एकटा, शिंपण
१९) सत्तावीसावे नक्षत्र
२१) संगोपन
२४) लाकडी जिना
२६) गळ्यामागचा प्रतिष्ठित अवयव
२७) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२८) ऐक्य, तादात्म्य पावणे
३०) केसांना मूळ रंग आणण्याचा पदार्थ
३४) अरण्य
३५) राजाचा राज्य करण्याचा काळ
३७) सर्प
३८) मध्यम प्रमाण
३९) खोदकाम
४१) गोजी, पाडी, जनावरांचे बछडे
४३) बेकरीतील एक पदार्थ
४४) प्रत्यक्ष दिलेली धमकी
४७) हत्या, खून
४८) मीटिंग, विचार मांडण्यासाठी बोलावलेली बैठक
५०) हातोहात, त्वरित
५२) निमित्त
५५) निमग्न, गुंग
५७) मनाची शक्ती
५९) बाप
६०) रात्रभर
६२) आरोप
६३) गुजराती नृत्यप्रकार
६४) अतर्क्य घटना
६६) अजगर
६७) मोठी चूल
६८) भेग, चीर
७०) नवऱ्याची दुसरी पत्नी
७२) पैंजण
७४) राज्य, एक पंथ
७६) बाळाचा गुटगुटीतपणा
७८) यमराज्य
७९) कोर्टातील अशीलाचा आधार
८०) तांबड्या पंखाचा पोपट

**उभे शब्द:-**

१) जंगली फुलांचा हार
२) बूड ३) रेलचेल, विपुलता
४) जंगलातील आग
५) आकस, मत्सर
६) हाडांचा सापळा
७) भय, भीती
९) उपहास, चारचौघात झालेला पचका
११) मनाचा उदार, मनमिळाऊ
१३) अगणित, पुष्कळ
१५) सज्जन, साव
१६) शोध, माग
१८) पावसाची झड
२०) इंग्रजीतील पहिला आकडा
२२) नरसिंह
२३) माणूसघाणा, मत्सरी
२५) सीमोल्लंघनाचा सण
२९) चिंतन
३०) विळखा, मिठी
३१) खोटा, तात्पुरता राग
३२) वस्त्र)
३३) अफूचे बी
३६) खाण्याची तंबाखू
३७) दक्ष, सतर्क
४०) मोठी नदी
४२) मीठ
४३) वाघूळ, एक लहानसा पक्षी
४५) थडगे
४६) समीक्षा, प्रतिकूल मत
४९) हिंदुस्थान
५१) सरोज, पंकज
५३) रुक्ष
५४) राजाची कचेरी
५६) हुबेहूब, अगदी त्याच प्रमाणे
५८) हावरटपणा
६०) राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांचे निवासस्थान
६१) रम्य, मनोहर
६२) पारा लावलेली काच
६५) पडदा
६६) नभ
६९) गवंड्याकडचे पाणी वाहून नेण्याचे कातडी साधन
७१) केस कापणे
७२) पवित्र
७३) बारीक केस
७५) सगळा, कर
७६) तमाशाचा फड
७७) सैन्यदल

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# स्थानांतरणासाठी नवीन इमारतीमधील समस्यांवर तोडगा काढा: आमदार खोडके

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६:** डफरीन, इर्विन व सुपर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध सोयी सुविधांच्या अनुषंगाने आमदार खोडके यांनी शनिवारी ४ जानेवारीला आढावा बैठक घेतली. डफरीन रुग्णालय परिसरात २०० खाटांची नवीन इमारत तयार झाली असून लवकरच डफरीन नवीन इमारतीमध्ये स्थानांतरीत करण्यासाठी बैठकीत चर्चा करण्यात आली.



नवीन ईमारतीत शल्यचिकित्सागृह सुरु करण्याबाबत काही प्रशासकीय प्रक्रिया व निधीची गरज असल्याची माहितीसुद्धा आमदार खोडके यांना आरोग्य अधिकाऱ्यानी दिली. यावर आमदार सुलभा खोडके यांनी रुग्णालय प्रशासनाला त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची सूचना केली.तसेच समस्यांवर तोडगा काढून तातडीने नविन ईमारतीत रुग्णसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना केल्यात.

दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) बाबतचा सुद्धा आढावा घेण्यात आला. इर्विन मध्ये ३७९ बेड उपलब्ध असतांना मात्र सातशेहुन अधिक रुग्ण दाखल होतात. त्यामुळे आरोग्य यंत्रणेला उपचाराला घेऊन चांगलीच कसरत करावी लागते. इर्विनची ८०० खाटांची नूतन इमारत प्रस्तावित असल्याने आगामी काळात निधीसाठी पाठपुरावा करणार असल्याचे आमदार खोडके यांनी सांगितले. तसेच नवीन इमारत तयार होईपर्यंत इर्विनमधील रुग्णांसाठी डफफरीन भागात तात्पुरते रुग्णालय सुद्धा साकारण्यात येणार असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. यावेळी आमदार सुलभा खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल च्या फेज-१ व फेज- २ध्ये सध्या सुरु असलेल्या आरोग्य सेवांची माहिती जाणून घेतली.

सध्या रुग्णालयात २२० बेडची सुविधा उपलब्ध आहे. मात्र प्रत्यक्षात भरती रुग्णांची संख्या ही साडेतीनशे ते चारशे इतकी आहे. तर येथे अनेक रिक्त पदांमुळे मनुष्यबळाचा अभाव आहे.

त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यावंरील कामाचा ताण वाढल्याचे सुपर हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. या बैठकीला राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, सीएस डॉ. दिलीप सौंदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार, सुपरचे एमएस डॉ. अमोल नरोटे, यश खोडके, डॉ. मंगेश मेंढे तसेच साबांविचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# 'स्थान निश्चिती'वरुन प्राध्यापकांची लूट

## राज्य सरकारने मोडला युजीसीचा नियम

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६:** वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या स्थान निश्चितीच्या संदर्भात संस्थाचालक, प्राचार्य आणि सह-संचालक कार्यालयाच्या माध्यमातून संबंधित प्राध्यापकांची लूट केली जात असल्याचा आरोप लावण्यात आला आहे.




स्थानिक पातळीवरील उदाहरण लक्षात घेता, येथे गेल्या दहा वर्षांपासून काही प्रकरणे रखडली असून त्यासाठी उच्च शिक्षण क्षेत्रातील राजकीय मंडळी आणि काही संस्थाचालक कारणीभूत आहेत. परंतु त्याचे बळी मात्र संबंधित प्राध्यापक ठरले आहेत. एका प्राध्यापकाच्या मते हा शोषणाचा प्रकार दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांना संस्थेमध्ये काम करावे लागत असल्यामुळे ते कोणाला सांगू शकत नाही. या भ्रष्टाचारी व्यवस्थेच्या विरोधात एखादाच प्राध्यापक प्रतिकार करू शकतो, पण सर्वच प्राध्यापक लढू शकत नाहीत, ही वास्तविकता आहे.

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार एखादा प्राध्यापक पीएच.डी.असेल तर चार वर्षांनी, एम फिल असेल तर पाच वर्षांनी, नेट,सेट असेल तर सहा वर्षांनी स्थान निश्चिती केली जावी, अशा स्वरूपाची विद्यापीठ अनुदान आयोगाची नियमावली आहे. याला महाराष्ट्र सरकारने बगल दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या रेगुलेशननुसार हे ठरले आहे. परंतु राज्य सरकारने ५ मार्च २०१९ रोजी एक पत्र जारी करुन ज्या दिवशी विद्यापीठ व सहसंचालक कार्यालयाच्या संयुक्त समितीची स्थान निश्चितची सभा आयोजित करण्यात येईल, त्या दिवसापासून स्थान निश्चिती दिली जाईल. असे करणे म्हणजे युजीसीच्या नियमांचे उल्लंघन आहे.

कारण काही संस्थाचालक प्राचार्यांना हाताशी धरुन योग्य वेळी स्थान निश्चिती न करता जाणीवपूर्वक विलंब करतात. यामागे त्यांचे अर्थकारण दडलेले असते. जाणीवपूर्वक विलंब केल्यास संबंधित प्राध्यापकांना चिरीमिरीची तयारी दर्शवावी लागते. तसे केले तरच समितीची सभा आयोजित करुन स्थान निश्चिती वेळेवर केली जाते, असा काहींचा अनुभव आहे. अनेक संस्थाचालकांना हा विसर पडलेला आहे की, आपण विश्वस्त आहेत. मालक नाही. आम्ही स्वतःच्या खिशातून प्राध्यापकांना पगार देतो किंवा आमच्यामुळे त्यांना मिळतो, असा अविर्भाव निर्माण करून पैशाची मागणी करून शोषण करण्याचा प्रयत्न सतत अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत अनेक महाविद्यालयात सुरु आहे. यासंदर्भात विद्यापीठ आणि सहसंचालक कार्यालय फक्त हात शेकत बसले आहे. विद्यापीठ आणि सहसंचालक यांची काही भूमिका नाही काय हे कळायला मार्ग नाही, असाही काही प्राध्यापकांचा आरोप आहे.

# नागपूर पोलिसांचा अंजनगावच्या नदीपात्रात तपास

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६:** रात्रीच्या अंधारात अंजनगाव सुर्जीच्या शहानूर नदीपात्रात नागपूर पोलिसनी शोध मोहिम राबविली. या शोध मोहिमेमुळे नागरिक बुचकळ्यात पडले असून याबाबत स्थानिक पोलिसांनाही काहीच माहित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. फार तपशिलात गेल्यानंतर नागपुरात पकडल्या गेलेल्या एका आरोपीने येथे शस्त्र फेकले आहे. त्याचा शोध घेण्यासाठी नागपुरचे पोलिस याठिकाणी आले आहेत.



प्राप्त माहितीनुसार नागपूर येथील एका मोठ्या घटनेतील तपासासाठी गेल्या दोन-तीनदिवसापासून नागपूर येथील पोलीस अधिकाऱ्यांचे एक पथक अंजनगाव सुर्जी येथे दाखल झाले आहे. त्यांच्याद्वारे शहानुर नदीपात्रात रात्रीच्या अंधारात काहीतरी शोध घेतला जात आहे. शनिवारी रात्रीही अशीच शोध मोहिम सुरु होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांचा मोठा जमाव तेथे जमला होता. मात्र कुणालाच काही माहित नसल्याने सर्वजण एक-दुसऱ्याला खुणा करुन विचारत होते. नागपुरचे प्रकरण नेमके काय? पोलीस अंधारात काय शोधत आहेत ? असे काही प्रश्न नागरिक एकमेकांना विचारत होते. परंतु सत्य माहिती नागपूर पोलीस नागरिकांना सांगत नसल्याने संपूर्ण शहरात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले होते. काही ठिकाणी भीतीचे वातावरण सुद्धा निर्माण झाले होते.

### खरी परिस्थिती काय आहे ?

याबाबतची माहिती स्थानिक पोलिसांनासुद्धा नव्हती. याबाबत स्थानिक पत्रकारांनी नागपूर येथील तपास पोलीस पथकाला विचारणा केली असता पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. अंजनगाव पोलीस स्टेशनला या आम्ही माहिती देतो अशी वेळ मारून पोलीस पथक रवाना झाले. जनतेचा कोणताही गैरसमज होऊ नये म्हणून नागपूर पोलिसांनी अंजनगाव पोलिसांना सत्य माहिती देणे महत्त्वाचे होते. परंतु स्थानिक पोलिसांना याबाबत पत्रकारांनी विचारले असता त्यांनासुद्धा माहिती मिळाली नाही. दरम्यान सत्य माहिती समोर येत नसल्याने वेगवेगळ्या चर्चा शहरात सुरू झाल्या. काही अफवाही पसरल्या.

रात्रीच्या अंधारात सुरू असलेला पंचानामा, अंधारात सुरू असलेले तपास कार्य, अंजनगाव पोलिसांना तसेच नागरिकांना सत्य माहिती सांगण्यास नागपूर पोलिसांची टाळाटाळ, या सर्व प्रकाराची अंजनगाव शहरात सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या प्रकरणाबाबत स्थानिक ठाणेदारांना पत्रकारांनी विचारणा केली असता सदरचे पोलीस तपासासाठी अंजनगाव सुर्जीत आले असताना आम्हाला जी सहायता मागितली, त्याप्रमाणे आम्ही त्यांना मदत पुरवली, एवढेच ठाणेदार प्रकाश अहिरे याते म्हणणे होते.

# जि.प.शाळेत आनंद मेळावा



■ महासागर प्रतिनिधी,
**मोताळा , दि. ६:** विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर व्यावहारीक ज्ञान कळावे तसेच त्यांना अन्नपदार्थांची माहिती व्हावी यासाठी ४ जानेवारी रोजी टाकळी (वाघजाळ) येथील जिल्हा परिषद शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

तालुक्यातील टाकळी येथील आयएसओ प्राप्त जि.प.शाळेत विद्यार्थ्यांना अन्नपदार्थांची माहिती व्हावी तसेच अन्नपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या घटक पदार्थांची माहिती व्हावी आणी त्याची कृती समजावी. सोबतच अन्नपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या कष्टाची जाणीव व्हावी तसेच व्यावहारिक ज्ञान कळावे यासाठी काल ४ जानेवारी रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. या आनंद मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सविता गायकवाड यांनी केले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉलला पालकांनी मोठा प्रतिसाद दिला त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगली कमाई झाली. पालक व माजी विद्यार्थ्यांनी पदार्थाची खरेदी करुन त्यांचा आनंद द्विगुणीत केला. कार्यक्रमाला सरपंच अंजना साळोकार, ग्रामपंचायत सदस्य गुलाब शिराळ, तुळशीराम सपकाळ, मुख्याध्यापिका संगीता जवरे, प्राची शुक्ला, सुभाष करवंदे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर व्यावहारीक ज्ञान कळावे तसेच त्यांना अन्नपदार्थांची माहिती व्हावी**

### धर्मगुरूंनी शाळेला दिली टीव्ही

भेट ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडू नये. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षणात पुढे जावे यासाठी थायलंड येथील बौद्ध धर्मगुरू अजान जयसारो यांनी शाळेला ३२ इंची एलईडी टीव्ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भेट दिली. यावेळी त्यांचे मुख्याध्यापिका व सरपंच यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.




# राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी अकोल्यातून ७ खेळाडू

## स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा वरीष्ठ संघ अकोलामधून रवाना

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ६ :** उत्तर प्रदेशातील बरेली येथे ७ ते १४ जानेवारी दरम्यान आठवी वरिष्ठराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा वरीष्ठ संघ अकोलामधून रवाना झाला. एकूण १३ सदस्यीय संघातील १० पैकी ७ खेळाडू अकोला क्रीडा प्रबोधिनी व प्रशिक्षण केंद्रातील आहेत. महाराष्ट्र १३ सदस्यात ३ प्रशिक्षक आणि १० बॉक्सर आहेत. यात ५० किलो गटात माजी राष्ट्रीय विजेता शिवाजी गेडाम, ५५ किलो गटात संकेत गोंडे, माजी राष्ट्रीय पदक विजेता ६० किलो गटातील विशाल नुपे, ६५ किलो गटामधील हरिवंश टावरी, माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेता, ७० किलो गटात मुहम्मद राहिल सिद्दीकी, माजी राष्ट्रीय विजेता ७५ किलो गटात कुणाल घोरपडे, माजी राष्ट्रीय विजेता ८० किलो गटातील सनी कापसे, माजी राष्ट्रीय पदक विजेता ८५ किलो गटातील हर्ष सनवाल, ९० किलो गटात कृष्णा लोखंडे, ९२ किलो गटातील समीर अहमद यांचा समावेश आहे.

संघासोबत प्रशिक्षक योगेश निशाद, राकेश यादव, प्रवीण कम्मार हे मार्गदर्शक म्हणून काम पाहणार आहेत. स्पर्धेकरिता पात्र झालेल्या खेळाडूंना जिल्हाधिकारी अजित कुंभार, गणेश पुरोहीत, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट व महाराष्ट्र बॉक्सिंग परिवाराकडून खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

# शिक्षकाची बदली रोखण्यासाठी एकवटले ग्रामस्थ




■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६:** दर्यापूर तालुक्यातील अडुळाबाजार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक प्रकाश लिंगोट यांची बदली रद्द करण्यासाठी ग्रामवासी एकवटले असून त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली आहे. सदर शिक्षक हे कर्तव्यदक्ष व पोटतिडकीने शिकविणारे असून ऐन शैक्षणिक सत्राच्या मधात बदली केल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात गावकरी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी सरपंच अंकुश खंडारे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला निवेदन दिले आहे. निवेदनाला ३१ डिसेंबर रोजीच्या ग्रामसभेचा प्रस्तावही जोडण्यात आला आहे. सदर निवेदनानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये तसेच जि.प. शाळेच्या पटावरील संख्या कमी होवू नये यासाठी लिंगोट यांची बदली रद्द केली जावी. निवेदन सादर करताना निलेश कुरडीवाल, अमोल मोरे, रामेश्वर वाघमारे, नूतन थोरात, अमृता बावणे, सोनाली बोरकर, किरण भिसे, पार्वती खिल्लारे आदी नागरिक उपस्थित होते.

### प्रशासनाने न्याय द्यावा

सध्याच्या स्पर्धेच्या युगात गावागावांतील विद्यार्थी व पालक कॉन्व्हेन्ट संस्कृतीच्या मागे धावत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा ओस पडत आहेत. याला जबाबदार शासनाचे चुकीचे धोरण आहे. जिल्हा परिषद शाळेला योग्य न्याय दिला तर ग्रामीण भागातील विद्यार्थी गावातच शिकतील यासाठी आम्ही गावकरी प्रयत्न करत आहोत. या शाळेत असणारे शिक्षक अतिशय प्रामाणिकपणे शिकवत असून त्यांची बदली झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. तरी त्यांची बदली रद्द करावी ही आमची मागणी आहे, असे अडुळाबाजारचे सरपंच अंकुश खंडारे म्हणाले.

# नांदगाव पेठ येथे संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सव प्रारंभ



■ महासागर प्रतिनिधी,
**नांदगाव पेठ , दि. ६:** संत श्री काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला शनिवारपासून प्रारंभ झाला. पहाटे संत काशिनाथ महाराज समाधी मंदिरात तीर्थस्थापना व आरती झाल्यानंतर गावातून काशिनाथ धाम मार्गाकडे ग्रंथदिंडी निघाली. डोक्यावर ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन भाविक 'संत काशीनाथ महाराज की जय' चा गजर करत काशिनाथ धामवर पोहोचले. त्याठिकाणी ज्ञानेश्वरी पारायण झाल्यानंतर नंतर श्रीमद भागवत कथेला प्रारंभ झाला.

ग्रंथदिंडीने अवघी संतनगरी या वेळी दुमदुमली होती. संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी असंख्य भाविकांनी हजेरी लावली होती. काशिनाथ धामवर सकाळपासून भक्तांचा मेळा लागला होता.

सोपान महाराज काळबांडे (आळंदीकर) यांच्या वाणीतील संगीतमय भागवत कथा श्रवणाचा भाविकांनी लाभ घेतला. दैनंदिन कार्यक्रमात सकाळी साडे पाच वाजता काकड आरती, सकाळी ८ वाजता बाबांची पूजा व आरती, सकाळी ८.३० ते ११.३० श्री. ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते ५ दरम्यान सोपान महाराज आळंदीकर यांच्या वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन केले आहे. सायंकाळी हरिपाठ, सामुदायिक प्रार्थना व त्यानंतर रात्री हरिकीर्तन होणार आहे.

संत काशिनाथ धामवर भागवत कथेसह इतर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजनही केले आहे. पुण्यतिथी महोत्सवादरम्यान विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम याठिकाणी होणार आहेत. या धार्मिक सोहळ्यासाठी दूरवरून भाविकांचे आगमन झाले असून, संत काशिनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी गर्दी झाली आहे.

या महोत्सवाचा समारोप धार्मिक कार्यक्रमांची पूर्णाहुती झाल्यानंतर होणार आहे.

# परभणी येथील सूर्यवंशी कुटुंबीयांनी घेतली ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ६ :** परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफफोड झाल्यानंतर आंदोलन पुकारण्यात आले होते. पोलिसांनी कारवाई सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. रविवारी सूर्यवंशी कुटुंबीयांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. या भेटीत कुटुंबीयांनी काही गंभीर आरोप यंत्रणेवर केले. हे आरोप पैसे व नोकरीच्या अनुषंगाने होते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ ठेवलेल्या संविधानाची तोडफफोड करण्यात आली होती. अवमानानंतर बंदची हाकही देण्यात आली. बंदला हिंसक वळण लागले होते. त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल करून अटकसत्र राबवले. तसेच न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा मृत्यू झाला होता.



दरम्यान सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी, भाऊ प्रेमनाथ सूर्यवंशी आदींनी ॲड. आंबेडकर यांची भेट घेतली.

पोलिस व शासन आम्हाला न्याय देत नाही नसून, आमचा केवळ आपल्यावरच विश्वास आहे, आपण आम्हाला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती सूर्यवंशी कुटुंबीयांनी ॲड. आंबेडकर यांच्याशी बोलताना केली. यावेळी वरिष्ठ अधिकारी व यंत्रणेशी ॲड. आंबेडकर यांनी फोनवर चर्चा केली. कुटुंबीयांनी माध्यमांशी संवाद साधला. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या आरोपींना शिक्षा मिळावी व आम्हाला न्याय मिळवून द्यावा, अशी कुटुंबीयांनी मागणी केली.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन म्हणजे भारत वर्षाला लाभलेला मायेचा पदर : आशुतोष अडोणी

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६:** राजमाता अहिल्यादेवींचे संपूर्ण जीवन म्हणजे भारतवर्षाला लाभलेला मायेचा पदर आहे. त्यावेळी संपूर्ण देशाला या राजकारणात कणखर पण, समाजावर माया करणाऱ्या अहिल्यादेवी रुपी पदराने सांभळले. काकणभर पुरुषार्थापेक्षा त्यांचे विलक्षण कर्तृत्व आणि नेतृत्त्व देशाला सांभाळत राहिले, असे भारावलेले उद्गार प्रख्यात वक्ते आशुतोष अडोणी यांनी अमृतमंथन व्याख्यानमालेचे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर शेवटचे व तिसरे पुष्प गुंफताना काढले.



तुषार भारतीय मित्र मंडळाद्वारे साईनगरातील श्री साईबाबा मंदिर परिसरात असलेल्या साईरत्न लॉनमध्ये आयोजित अमृतमंथन व्याख्यानमालेला १२ व्या वर्षी नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. संपूर्ण देशाची दशा सुधारून ज्यांनी योग्य दिशा दिली त्या प्रखर नेत्री अहिल्यादेवी यांच्या कर्तृत्वावर बोलताना अडोनी यांनी केवळ एका दिवसांत त्यांचा असामान्य जीवनपट उलगडता येणार नाही, असे सांगितले. अहिल्यादेवींनी कठोर साधनेतून स्वतःला घडवून समाजसेवा, शिक्षण, राजकारण, धर्म, कुटुंब, राज्यकारभार कसा सांभाळावा यांचे जणू धडेच दिले. साधनेचे वेगवेगळे पदरच या महान महिलेच्या आयुष्यात दिसून येतात, असे मत अडोणी यांनी व्यक्त केले. अहिल्यादेवींच्या जीवनातील कोणकोणत्या पैलूंना स्पर्श करावा, अशा विचारात असतानाच माझ्या स्नेही व ज्येष्ठलेखिका तेलंग यांचे लेखन माझ्या वाचनात आले. अहिल्यादेवी या स्त्री म्हणून कर्तृत्ववान नसून त्या स्त्री आहेत, म्हणूनच कर्तृत्ववान आहेत, असे म्हणावे लागेल. त्यांचा जीवन परिचय उलगडून सांगणे ही काही सोपी बाब नव्हे. स्त्री आणि पुरुषांमधील कर्तृत्व उलगडून सांगायचे असेल तर आपण अमूक एका मोठ्या व्यक्तीशी त्याची तुलना करतो. परंतु, अहिल्यादेवी होळकरांचे एकूण कार्य, जीवनपट असा राहिला आहे की, त्यांची कोणासोबतही तुलना होऊ शकत नाही. त्यांच्या सारख्या त्याच होत्या.


## कामठी नगर परिषद कामठी

**बांधकाम विभाग**

जिल्हा नागपुर ४४१००२

Phone 07109 288262, Fax: 07109286665, Mail: chiefofficermekamptee@gmail.com

जा.क./न.प.का./सा.बां.वि./४३/२०२५ दि.: ६/१/२०२५

**निविदा/कोटेशन सुचना २०२४-२०२५**

नगर परिषद कामठीला स्थानिक बाजारातुन पेंटर/ दुकानदार/ कंत्राटदाराकडुन नगर परिषद कामठी क्षेत्रातील महापुरुषाचे पुतळे पेन्टींग / पेडस्टल पेंटींग / ग्रेनाईट लावणे/एस.एस. स्टीलची सिढी तयार (साहित्यासह) करण्याकरीता द्वी लिफाफा पध्दतीने निविदा/ कोटेशन पध्दतीने दर मागविण्यात येत आहे. निविदा/कोटेशन बाबतची सविस्तर माहिती दिनांक ०७/०१/२०२५ पासुन नगर परिषद कामठी जुने कार्यालय येथील बांधकाम विभागात पाहण्यास उपलब्ध आहे.

(संदिप बोरकर)
मुख्य अधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद कामठी


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# मिक्स भाजीने करा रुचीपालट

दोस्तांनो, त्याच त्या चवीच्या भाज्या खावून कंटाळा आला आहे का? तुम्ही मस्तपैकी मिक्स रस्सा करू शकता. आवडीचे मसाले घालून, वेगवेगळे फंडे लढवून तुमच्यातलं शेफचं कौशल्य पणाला लावा.

**साहित्य:** फ्लॉवरचे तुरे, एक कांदा, गाजर, थोडी फरसबी, मटार, टोमॅटो, दोन चमचे तेल, मोहरी, तिखट, हळद,गरम मसाला, मीठ आणि चिरलेली कोथिंबिर

**झटपट रेसिपी**

**कृती:** सर्व भाज्या चिरून घ्या. कढई गॅसवर ठेऊन त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. त्यानंतर कांदा घालून छान परतून घ्या. त्यात हळद आणि तिखट घालून दोन मिनिटं परता. आता फ्लॉवर, गाजर, फरसबी, मटार घालून शिजू द्या. भाज्या शिजल्यावर बारीक चिरलेला टोमॅटो आणि गरम मसाला घाला. तो शिजल्यावर मीठ घाला. हलवून घ्या. सुकी भाजी नको असेल तर शेवटी थोडं पाणी घालून रस्सा करा.कोथिंबिरीने सजवा. ही भाजी तुम्ही पोळी किंवा पावासोबत खाऊ शकता.

# जोश

## फंडू एसएमएस

जिंदगी के मजे
लेना सिखो
वक्त तो तुम्हारे
मजे
लेता ही रहेगा।

अपने तो अलग
असूल है। यार
के खातिर,
कांटे भी कबुल
है।

जिंदगी के सारे गम बांट
लेते है दोस्त,
क्यों जिंदगी में साथ देते है दोस्त,
रिश्ता तो सिर्फ उनसे दिल
का होता है, फिर भी हमें क्यों
अपना मान लेते हैं दोस्त।

**बंगळूरूची गणना देशातल्या सुंदर शहरांमध्ये होते. इथलं वातावरणही आल्हाददायक असतं. बंगळूरू हे बागांचं, तलावांचं शहर. मात्र इथे प्रदूषणही प्रचंड आहे. वायू प्रदूषणच नाही तर जल प्रदूषणाची समस्याही बंगळूरूला भेडसावते आहे. कचरा, सांडपाणी, कारखान्यातून बाहेर पडणारं रासायनिक पाणी यामुळे तलाव प्रदूषित झाले आहेत. यामुळे व्यथित झालेला ए. पवन रेड्डी या समस्येवर उपाय शोधण्याच्या प्रयत्नात आहे.**

# जलप्रदूषणावरील नामी उपाय

एअरोनॉटिकल इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलेला ए.पवन रेड्डी स्वत:पुरता विचार करून थांबला नाही. त्याला बंगळूरूतल्या प्रदूषित तलावांची खूप काळजी वाटते. तलावांचं शहर अशी ओळख असणाऱ्या बंगळूरूवर प्रदूषणाची काळी छाया आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इथल्या तलावांमध्ये कचरा टाकला जात आहे. इतकंच नाही तर कारखान्यांमधलं रासायनिक पाणी बेकायदेशीर पद्धतीने त्यात सोडलं जात आहे. इथला 'बेलांदूर' तलाव सर्वाधिक प्रदूषित झाला आहे. या तलावात सगळीकडे फक्त पांढरा फेस दिसतो. सतत टाकला जाणारा कचरा आणि सांडपाण्यामुळे अत्यंत विषारी असा हा फेस तयार झाला. याबाबत वृत्तपत्रांमध्येही बातम्याही छापून आल्या.

अनेकांप्रमाणे पवनलाही तलावाची अशी अवस्था बघवत नाही. 'बेलांदूर' तलावाची बिघडत जाणारी अवस्था बघतच तो मोठा झाला. वर्तमानपत्रांमध्ये याबाबत बातम्या यायच्या, काळजी व्यक्त केली जायची. पण प्रत्यक्षात काय करता येईल याबद्दल काहीच सांगितलं जात नव्हतं. यासाठी आपणच काहीतरी करायला हवं असं पवनच्या मनात आलं. त्याने प्रयत्न सुरू केले. या समस्येवरचा उपाय त्याला सापडला.फळांच्या सालांचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करता येईल, असा विचार त्याच्या मनात आला.



अशी परिस्थिती हाताळण्यासाठी इतर देश करत असलेल्या उपाययोजनांचा धांडोळा त्याने घेतला. यातून फारसं काही हाती लागलं नाही. परदेशात वापरलं जाणारं प्रगत तंत्र इथे वापरता येणार नव्हतं. मात्र त्याने हार मानली नाही. पवनचं संशोधन सुरूच होतं. याच दरम्यान त्याला फळांच्या सालांच्या शुद्धिकरण क्षमतेची माहिती मिळाली. कलिंगड, अननस, पपई, लिंबू, केळं अशा फळांच्या सालांमध्ये हे गुणधर्म असतात. ठोस काहीतरी मिळेपर्यंत त्याने एकही पाउल मागे घेतलं नाही. सुरूवातीला त्याने ताज्या फळांची सालं घेतली. सालांमधल्या पाण्याच्या प्रमाणामुळे पहिला प्रयोग फसला. मग त्याने उन्हात वाळवलेल्या सालांवर प्रयोग केला. वाळलेल्या सालींची पूड करून घेतली. 'फिल्टरेशन मेंब्रेन' तयार केला. त्यात 'हायड्रोक्लोरिक ॲसिड' घातलं. मग तलावातलं पाणी आणून फिल्टरमध्ये ओतलं. त्यात वाळलेल्या सालांची पूड घातली. १०० मिलिलीटर पाण्यात एक ग्रॅम पूड घातली. यानंतर पाणी ९० ते ९२ टक्क्यांपर्यंत शुद्ध झालेलं होतं. हे शुद्ध पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरता येईल, असं पवन सांगतो. आपलं हे संशोधन त्याने प्रदूषण नियंत्रण मंडळालाही दाखवलं. इथेही त्याची चाचणी यशस्वी ठरली. यानंतर त्याने या शोधाचा आवाका वाढवायचं ठरवलं आहे. 'बेलांदूर' तलाव स्वच्छ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असं तंत्रज्ञान त्याला वापरायचं आहे. पाण्याचे स्रोत प्रदूषित होत असताना पवनचं संशोधन भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल.

**अचिव्हर**



# वजन कमी करताय?

वजन कमी करणं सोपं नसतं. जिभेवर नियंत्रण ठेवण्यासोबत व्यायामही करावा लागतो. अर्थात व्यायाम केला आणि वजन कमी झालं असं होत नाही. व्यायामही योग्य पद्धतीने करावा लागतो. चुकीचा तसंच चुकीच्या पद्धतीने केलेला व्यायाम घातक ठरू शकतो. वजन कमी करताना नेमकं काय करावं आणि करू नये याविषयी...

✽ सुरूवातीपासूनच तीव्र स्वरुपाचा व्यायाम करू नका. सोप्या पण प्रभावी व्यायामाने वजन कमी करण्याच्या प्रवासाला सुरूवात करा. सुरूवातीलाच तीव्र व्यायाम केल्यास तुम्ही लवकर दमाल. शिवाय स्नायू दुखवण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे दमाने घ्या.

**फिटनेस फंडा**

✽ प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारचा व्यायाम आवडतो. कोणाला धावायला आवडतं तर कोणाला जॉगिंग बरं वाटतं. तुम्हीही ओढूनताणून व्यायाम करू नका. आवडत्या व्यायाम प्रकारांना प्राधान्य द्या.

✽ एकीकडे व्यायाम करायचा आणि दुसरीकडे जंक फूड खायचं याला काहीच अर्थ नाही. व्यायामासोबतच हेल्दी फूडही खायला हवं. तेलकट, गोड, मैद्याचे पदार्थ टाळा.

✽ खूप दिवसांनी व्यायाम सुरू केल्यानंतर अंगदुखी, स्नायूदुखीसारखे त्रास संभवतात. त्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती द्या. उगाचच धावपळ करू नका. विश्रांतीमुळे शरीर पुन्हा ताजंतवानं होईल आणि तुम्हाला बरं वाटेल.

## स्मार्ट टिप्स

### हे सर्च करू नका...




गूगल सर्चवर काहीही सर्च करता येतं. कोणतीही माहिती हवी असल्यास आपणही पटकन गूगल सर्चवर जातो. गूगलवर सगळं उपलब्ध असलं तरी त्यावर सगळ्या गोष्टी शोधू नयेत. आजारी पडल्यावर गूगलवर औषधाचा शोध घेऊ नका. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधं घ्या. ऑनलाईन शॉपिंगसाठी डिसकाउंट कूपन्सचा शोध घेत असाल तर सावध व्हा. अशा कूपन्सच्या माध्यमातून तुमचा डाटा चोरीला जाऊ शकतो. गूगलवर कस्टमर केअर नंबरही सर्च करू नका.

## बी अलर्ट


### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोन चोरीला गेलाय?

मोबाईल फोन चोरीला गेल्यानंतर चांगलीच पंचाईत होते.



फोनमधला महत्त्वाचा डाटा, फोटो, व्हिडिओ लीक होण्याची भीती वाटत राहते. मात्र तुम्ही हा डाटा घरबसल्या डिलिट करू शकता. यासाठी माय डिव्हायसेस गूगल डॉट कॉमवर जा. स्मार्टफोनमध्ये सेव्ह केलेला जी मेल आयडी ओपन करा. इथे प्ले साउंड, सिक्योर डिव्हाइस आणि इरेझ डिव्हाईस असे पर्याय दिसतील. यापैकी इरेझ डिव्हाइसची निवड करा. यानंतर जीमेल आयडी आणि पासवर्डची नोंद करून पुढे जा. आता तुमच्या जुन्या फोनमधला डाटा डिलिट झाला असेल. अर्थात यासाठी जुन्या फोनचं इंटरनेट कनेक्शन ऑन असायला हवं.


## ॲप वर्ल्ड

### संकटकाळाचा साथी

आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. अँड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.

# नातं टिकेल का?

मी २९ वर्षांची तरुणी असून गेल्या दोन वर्षांपासून वयाने दोन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मुलाच्या प्रेमात आहे. भूतकाळात घडलेल्या काही अप्रिय घटनांमुळे त्याचा खऱ्या प्रेमावरचा विश्वासच उडून गेला आहे. आमचं नातं खूप घट्ट असलं तरी मी त्याला फक्त आवडते. त्याचं माझ्यावर प्रेम नाही. आयुष्यात स्थिरस्थावर व्हायचं की नाही याबाबत त्याच्या मनात बराच गोंधळ आहे. त्याला यावर काही बोलायचंही नाही. माझं त्याच्यावर खूप प्रेम असलं तरी आमच्या भविष्याबद्दल मला खूप काळजी वाटते. मी काय करू?



**मॅच मेकिंग**

**उत्तर:** एखाद्याचा भूतकाळ त्याच्या वर्तमानावर प्रभाव टाकू शकतो. या परिस्थितीतून त्याचं त्यालाच बाहेर यावं लागेल. दुर्दैवाने तू त्याची फारशी मदत करू शकणार नाहीस. तू या नात्याबाबत साशंक असलीस तरी त्याने त्याचं मत तुला सांगितलं आहे. आपण कोणाच्याही भावना किंवा विचार बदलायला भाग पाडू शकत नाही. हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय असतो. काळानुरुप त्यात बदल होत असला तरी त्याची काहीच शाश्वती देता येत नाही. त्यामुळे तू तुझ्या आयुष्याचे प्राधान्यक्रम ठरव. या नात्याच्या चांगल्या आणि वाईट परिणामांची यादी कर. पूर्ण विचारांती पुढचा निर्णय घे.

# फ्लोरल्सचा ट्रेंड

फ्लोरल म्हणजे फुलाफुलांच्या डिझाईनचे किंवा प्रिंटचे शर्ट आता मुलांच्या वॉर्डरोबचा भाग होऊ लागले आहेत. उन्हाळ्यात फ्लोरल प्रिंटचे हे शर्ट ताजेपणाची अनुभूती देतात. फ्लोरल्स खूप छान दिसतात. मात्र ते योग्य पद्धतीने कॅरी करणं आवश्यक आहे. आयुष्यात थोडे रंग भरण्यासाठी फ्लोरल शर्ट तुमच्या फॅशनचा भाग व्हायला हवेत. फ्लोरल्समुळे तुमचं व्यक्तिमत्त्व खुलू शकतं. ट्रेंडी फ्लोरल्स कशा पद्धतीने कॅरी करता येतील याविषयी...

✽ प्लेन, चेक्स किंवा स्ट्राईप्सवाले शर्ट घालण्याची सवय असणाऱ्या मुलांना फ्लोरल किंवा प्रिंटेड शर्टशी पटकन जुळवून घेता येत नाही. अशा वेळी न्यूट्रल रंगांची निवड करून सेफ गेम खेळता येईल. फ्लोरल प्रिंटवाला बेज रंगाचा कॉटन शर्ट आणि खाकी पँट असं कॉम्बिनेशन करा. यासोबत ड्रेस शूज कॅरी करा. ऑफिसमध्ये कॅज्युअल वेअर म्हणून असा पेहराव करता येईल.



✽ फ्लोरल शर्टवर डेनिम जॅकेट घालता येईल. यामुळे तुमचा लूक फार बटबटीत वाटणार नाही. तसंच तुम्ही ट्रेंडीही दिसाल. फ्लोरल शर्ट, डेनिम जॅकेट, ब्लू डेनिम जीन्स आणि स्नीकर्स घालून तुम्ही चित्रपट बघायला जाऊ शकता.

✽ मोठ्या प्रिंटवाला किंवा गडद रंगाचा फ्लोरल शर्ट आणि फिकट रंगाची पँट हे कॉम्बिनेशन शोभून दिसेल. अशा शर्टसोबत लिननची ऑफ व्हाईट पँट घाला. ग्रीन कॅनव्हास स्नीकर्सनी तुमचा लूक खुलवा. मित्रमंडळींसोबत भटकंती करायला जायचं असेल तर हा पेहराव बेस्ट ठरेल.

✽ जास्त स्टायलिश दिसायचं असेल तर काळ्या टी शर्टवर फ्लोरल प्रिंटचा शर्ट जॅकेटसारखा कॅरी करा. यावेळी ब्राउन ट्राउझर घाला. कॉफी डेटसाठी हा पेहराव अगदी उत्तम आहे.

**फॅशन पॅशन**

✽ मोनोक्रोमॅटिक फॅशनही करता येईल. काळ्या फ्लोरल शर्टवर काळी पँट घाला. स्नीकर्सऐवजी काळ्या स्लीप ऑन्सही निवड करा. कॅफे किंवा रेस्टॉरंटमध्ये जाताना हा लूक कॅरी करा.

✽ खास प्रसंगासाठी तयार होतानाही फ्लोरल्स कॅरी करता येतील. फ्लोरल शर्टवर ऑफ व्हाईट ब्लेझर घाला. सोबत ज्यूट कॉटन ट्राउझर असेल तर उत्तमच! फ्लोरल कफलिंक्स, पॉकेट स्क्वेअरने तुमचा लूक खुलवा.

# तारेल वाचनाची आवड

वाचाल तर वाचात असं म्हटलं जातं. पुस्तकांचं वाचन हा ज्ञान मिळवण्याचा उत्तम मार्ग आहे. वाचनाचा हा छंद विविध प्रकारच्या करिअरमध्ये यश मिळवून देऊ शकतो. वाचनामुळे आपण प्रगल्भ होतो. भाषा समृद्ध होत जाते. मेंदूला तरतरी येते. वाचन करणारे युवक-युवती करीअरचे कोणते मार्ग अवलंबू शकतात याविषयी...



✽ 'मार्केट रिसर्च ॲनालिस्ट' स्पर्धक कंपन्या, बाजारपेठेतली स्थिती आणि ग्राहकांच्या व्यवहाराचा अभ्यास करून संबंधित कंपनीची उत्पादनं तसंच सेवा उपलब्ध करून देतात. यात बरंच वाचन करावं लागतं. 'मार्केटिंग' आणि 'मार्केट रिसर्च'सह 'इंन्फॉर्मेशन सायन्स'चे अभ्यासक्रम या क्षेत्रात उपयोगी पडतील.

✽ 'कंटेंट रायटर' म्हणून काम करता येईल. वेबसाईट्ससाठी लिखाण करता येईल. 'ब्लॉगर' म्हणून सुरूवात केल्यानंतर पुढे मार्ग मिळत जातील.

✽ वाचनाच्या आवडीसह कल्पकता असेल तर 'स्लोगन रायटिंग' आणि आकर्षक हेडिंग्ज तयार करून 'कॉपी रायटिंग'च्या क्षेत्रात हात आजमावता येईल.

**वेगळ्या वाटा**

✽ प्रकाशनाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत.

✽ पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करून वृत्तपत्रात नोकरी करता येईल. या कामाला सध्या बरंच वलय आहे.

✽ वकिलांनाही भरपूर वाचन करावं लागतं. सतत कायदे अभ्यासाचे लागतात.सर्वोच्च तसंच उच्च न्यायालयाचे निकाल वाचावे लागतात. त्यामुळे वाचनाची आवड इथे तारून नेऊ शकते.

# नितांत सुंदर कोला बीच

गोवा हे प्रसिद्ध टूरिस्ट टेस्टिनेशन. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत भटकंती करता येते. समुद्रात मनसोक्त डुंबता येतं. 'फुल टू धम्माल' करण्यासाठी गोव्यासारखं उत्तम ठिकाण नाही. गोव्यात सगळं काही आहे. इथल्या नागमोडी रस्त्यांवरून बाईक चालवण्याचा आनंद वेगळाच. गोव्यातले शांत आणि रम्य समुद्रकिनारे मन मोहवून टाकतात. इथे काही काळ घालवल्यानंतर मन कसं प्रसन्न होऊन जातं. आपण नव्या उत्साहाने कामाला लागतो. गोव्यातले अनेक समुद्रकिनारे प्रसिद्ध आहे. विविध बीचवर पर्यटकांचा गजबजाट पहायला मिळतो. मात्र याच गोव्याच्या कुशीत दडलेली काही रत्न या गजबजाटापासून, कोलाहलापाहून दूर आहे. असंच एक रत्न म्हणजे कोला बीच. कोलाची गणना गोव्यातला सुंदर आणि आकर्षक बीचमध्ये होते. विशेष म्हणजे इथे शांतता असते.

तुम्हालाही गजबजाटापासून काही काळ लांब रहायचं असेल तर गोव्याला या आणि कोला बीचला भेट द्या. या बीचलगत महागडी रिसॉर्टस किंवा हॉटेल्स नाहीत मात्र तुमच्यासाठी तंबूची सोय होऊ शकते. साधं पण चविष्ट जेवण मिळू शकतं. कोला हा स्वच्छ आणि सुंदर बीच आहे. इथल्या निळ्याशार समुद्रात पोहण्याची हौस भागवता येईल. या बीचवर कयाकिंगची सुविधा आहे. कयाकिंगची गणना धाडसी खेळांमध्ये केली जाते. वेगळा अनुभव म्हणून कयाकिंग करता येईल. या बीचवर सूर्यास्ताचं मनोहारी दर्शन घडतं.

**भटकंती**

कोला हा गोव्यातला सर्वोत्तम बीच असल्याचं म्हटलं जातं. या समुद्रकिनारा छोटेखानी टेकड्यांनी वेढलेला आहे. भरपूर झाडी असणाऱ्या या टेकड्यांमुळे समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्याला चार चांद लागले आहेत.गोव्यातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांवरून सूर्यास्ताचं दर्शन घडत असलं तरी कोलाचा सूर्यास्त वेगळाची आहे. निसर्गरम्य वातावरणामुळे इथला सूर्यास्त खास ठरतो. या बीचवरची सोनेरी वाळू आपल्याला आकर्षित करते. या वाळूवर नुसतं बसून राहिलं तरी खूप छान वाटतं. पणजीहून कोला बीचला जायला दोन तास लागतात. या प्रवासादरम्यान वेगळाच निसर्ग तुम्हाला खुणावत असतो.



# स्पा आणि मसाज सेंटरच्या नावाखाली
# उपराजधानीत देहव्यापाराचे अड्डे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
शहरात सुरु असलेल्या अर्ध्यापेक्षा जास्त स्पा-मसाज सेंटरमध्ये ह्यसेक्स रॅकेट सुरु असल्याची माहिती पोलिसांच्या छापा कारवाईतून उघडकीस आली आहे.

गेल्या वर्षभरात गुन्हे शाखेने घातलेल्या २६ छाप्यात तब्बल १४ स्पा-मसाज सेंटरमध्ये देहव्यापार करताना तरुणींना ताब्यात घेण्यात आले होते. तर नागपुरातील सर्वाधिक नामांकित असलेल्या गंगा स्पामध्ये पोलिसांनी छापा घालून ४ तरुणींना देहव्यापार करताना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील अनेक ब्युटी पार्लर, पंचकर्म, युनिसेक्स सलून आणि स्पा-मसाज सेंटरच्या आड बिनधास्त देहव्यापार सुरु असतो. देहव्यापाराचे लोण हे महिला जीमपर्यंत पोहचला आहे. स्पा-मसाज सेंटरमध्ये सर्वाधिक देहव्यापार होत असल्याचे पोलिसांच्या छापा कारवाईवरुन समोर आले आहे. सोमलवाडा चौकातील गंगा स्पा सेंटरमध्ये देहव्यवसायाचा कारभार सुरू होता. सेंटरचे मालक दाम्पत्य हा अवैध व्यवसाय चालवत होते.

व्यवसायाची कुणकुण लागताच गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने येथे छापा टाकला. कारवाईत पोलिसांनी चार तरुणींची सुटका केली तर अवैध व्यवसाय चालविणारा स्पा सेंटरचा मालक नवीन भगवान सिंग (३७, रा. अमरनगर, सोनेगाव) याला अटक केली आहे. तर त्याची पत्नी विद्या उर्फ श्रृती नवीन सिंग ही देखील प्रकरणात आरोपी आहे.

सोनेगाव पोलीस ठाणे हद्दीतील सोमलवाडा चौकात गंगा स्पा सेंटर आहे. येथे स्पा सेंटरच्या आड अवैधरित्या देहव्यवसाय सुरू होता. नवीन सिंग आणि त्याची पत्नी श्रृती सिंग या दोघांनीही काही तरुणींना झटपट पैसा कमविण्याचे आमिष दाखवून देहव्यवसायाच्या दलदलीत ढकलले.

दोघेही या मुलींकडून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी देहव्यवसाय करून घेत होते. तर देहव्यवसायाकरिता तरुणींना आंबटशौकीन ग्राहक आणि जागा उपलब्ध करून देत होते. सिंग दाम्पत्याच्या या व्यवसायाची कुणकुण गुन्हे शाखेच्या अधिकारी आणि अंमलदारांना लागली होती.

त्यानुसार पोलिसांनी शनिवारी एक बनावट ग्राहक स्पा-मसाज सेंटरला पाठविला. येथे या ग्राहकाने त्यांच्याकडे तरुणीबाबतची मागणी केली असता आरोपींनी त्याला एका तरुणीसोबत पाठविले. या ग्राहकाने लगेच पोलिसांना इशारा करताच गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकली आणि मालक नवीन सिंग याला ताब्यात घेतले. करवाईत पोलिसांनी ४ पीडित तरुणींची सुटका केली. पोलिसांनी आरोपींचे ताब्यातून १ मोबाईल, ४ हजार ५०० रुपयांची रोकड, डीव्हीआर तसेच ईतर साहित्य असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर कलम १४३, ३(५) भान्यासं सहकलम ४, ५, ७ पिटा ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करत नवीन सिंगला अटक केली आहे.

याशिवाय, कारवाई न झालेल्या अनेक स्पा सेंटरमध्ये देहविक्रीचा धंदा राजरोसपणे सुरू आहे.


नोकरी अथवा रोजगाराच्या शोधात आलेल्या अनेक मुलींना काम देण्याच्या बहाण्याने देहविक्रीच्या धंद्यात ढकलले जात असल्याचे अनेक प्रकरणातून उघड झाले आहे.

## उद्धव ठाकरे टाचणी एवढीही मोदींची बरोबरी करू शकत नाहीत
### चंद्रशेखर बावनकुळे यांचा घणाघात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आयुष्य हे छोट्याशा चहाच्या ठेल्यापासून सुरू केले. त्यांनी अत्यंत हालअपेष्टा व संघर्ष सहन करून ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचले.

त्यांचा आयुष्याचा अभ्यास केला, तर उद्धव ठाकरे टाचणी एवढीही त्यांची बरोबरी करू शकत नाहीत, अशी तिखट टीका भाजप प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.

बावनकुळे सोमवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, उद्धव ठाकरे यांना समजले पाहिजे की, मोदींनी आपले आयुष्य १४० कोटी जनतेसाठी समर्पित केले आहे. त्यांचे समर्पण, त्यांचा त्याग, हा सूर्यप्रकाशाएवढा सत्य आहे. त्यामुळे त्यांच्यासारख्या व्यक्तीवर उद्धव ठाकरे यांनी बोलणे हे चुकीचे आहे.

खरे तर अतिविलासी उद्धव ठाकरे हे मातोश्री-२ मध्ये कसे राहतात हे सामनातून छापून आले असते तर बरे झाले असते. कसा अतिविलास करतात. अडीच वर्षे मुख्यमंत्री म्हणून कसा अतिविलास केला? दोन दिवसही मंत्रालयात आले नाही. दोन दिवसही विधानभवनात आले नाही. स्वतःला काचेच्या कॅबिनमध्ये बसून अतिविलास केला. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी अतिविलासावर बोलू नये.

खरे तर अरविंद केजरीवाल यांच्या शिशमहलला पाठिंबा देण्यासाठी हे उद्धव ठाकरे बोलले होते. त्यांची मोदींवर बोलण्याची लायकी नाही. केजरीवालांना पाठिंबा देण्यासाठी त्यांनी मोदींवर टीका केली. त्यांनी आत्मचिंतन करून मोदींवर बोलले पाहिजे.

**आम्ही राजे नाही तर सेवक**

बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी मतदारांचा वेश्या म्हणून उल्लेख केला आहे. पत्रकारांनी याविषयी बावनकुळे यांना छेडले असता, ते म्हणाले, आम्ही निवडून आलेले प्रतिनिधी पब्लिक सर्व्हंट आहोत. जनसेवक आहोत. जनसेवकाने जनतेच्या व मतदारांच्या पुढे नतमस्तक होऊनच आपला कारभार केला पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण अंगिकारली पाहिजे. आम्ही सेवकाच्या भूमिकेत असले पाहिजे. ते मतदारांविषयी काय बोलले? या वादात मला पडायचे नाही. पण मला असे वाटते की, मतदार सर्वोतपरी आहे. जनतेपुढे नतमस्तक होऊनच आम्ही काम करतो. आम्ही राजे नाही तर सेवक आहोत.

सुरेश धस यांना मी व स्वतः फडणवीस बोललेत. निश्चितपणे त्यांनी आपल्या भूमिका सार्वजनिक व्यासपीठावर मांडण्यापेक्षा पक्षाकडे मांडल्या पाहिजेत. सरकारकडे मांडल्या पाहिजेत, असे बावनकुळे म्हणाले.

# बीड प्रकरणी राज्यपाल हस्तक्षेप करणार
### सर्वपक्षीय नेत्यांच्या भेटीनंतर आश्वासन : मुंडे यांच्या राजीनाम्याची शिष्टमंडळाकडून मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हस्तक्षेप करणार आहेत. या संदर्भात सर्व पक्षीय नेत्यांच्या वतीने राज्यपालांची भेट घेत त्यांना निवेदन देण्यात आले होते. यावर राज्यपालांनी आपण यासंदर्भात हस्तक्षेप करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. अशी माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

बीड जिल्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड याच्यावर कलम 302 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात यावा, यासह आपल्या विविध मागण्यासाठी सर्वपक्ष मंडळाने राज्यपाल यांची भेट घेतली.

युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्वात हे शिष्टमंडळ राज्यपालांना भेटले. या शिष्टमंडळने आपल्या मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देखील या संदर्भात हस्तक्षेप करण्याचे आश्वासन या शिष्टमंडळाला दिले असल्याची माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी विविध पक्षाचे आमदार आणि नेते उपस्थित होते.



: निवेदनातील प्रमुख चार मागण्या :

या प्रकरणाशी संबंध आणि या प्रकरणात हस्तक्षेप होण्याची शक्यता लक्षात घेऊन मंत्री धनंजय मुंडे यांच्या मंत्रीपदाचा तातडीने राजीनामा घेण्यात यावा.

कायद्याचे राज्य ही भावना दृढ झाली पाहिजे. त्यासाठी अपहरण, खंडणी व खुन प्रकरणाचा सुत्रधार वाल्मिक कराड याच्याविरुध्द बीएनएस 103 (जुना आयपीसी 302) अन्वये तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करुन खटला अंडर ट्रायल चालवावा.

कायद्याची अंमलबजावणी कारणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी सुनिश्चित करा. त्यांच्या कर्तव्यात दुर्लक्ष करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.

बीडमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करुन, खंडणी आणि गुंडगिरीला आळा घालण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

## पारधी वस्तीवर तिघांची हत्या
### धाराशिव जिल्ह्याच्या करमाळा ठाणे हद्दीतील घटना

■ वृत्तसंस्था
धाराशिव, दि. ६ :
जिल्ह्यातील करमाळा पोलिस ठाणे हद्दीत बावी या गावात पारधी वस्तीवर तीन जणांचा खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

शेतात पाणी देण्याच्या कारणावरून मध्यरात्री दोन गटांमध्ये झालेल्या वादातून हा प्रकार घडला आहे. यात एका गटातील दोघांचा तर दुसऱ्या गटातील एकाचा जीव गेला आहे. घटनेची माहिती मिळताच करमाळा पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून मृतांचे शव विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

या प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## वादग्रस्त विघ्नेसह ३ अधिकाऱ्यांची एसआयटी मधून उचलबांगडी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारच्या वतीने चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे.

यासाठी नेमण्यात आलेल्या एसआयटीमध्ये एक प्रमुख आयपीएस अधिकारी हा बाहेरील असून उर्वरित सर्व अधिकारी हे वाल्मीक कराडची माणसे असल्याचा आरोप शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला होता. त्यांच्या आरोपानंतर या अधिकाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडवर अनेक आरोप होत आहेत. वाल्मिक कराड हा हत्ये मागील मुख्य सूत्रधार असल्याचा दावा केला जात आहे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटीची स्थापना केली आहे. मात्र, यासाठी एसआयटीमध्ये एक प्रमुख आयपीएस अधिकारी हे बाहेरील असला तरी त्यांच्या हाताखाली दिलेले अधिकारी हे वाल्मीक कराडचे पोलिस असल्याचा आरोप झाला होता.

या संदर्भात जितेंद्र आव्हाड यांनी वाल्मीक कराड सोबत या अधिकाऱ्यांचे फोटो देखील पोस्ट केले होते. त्यामुळे आता या प्रकरणाची राज्यात चांगलीच चर्चा रंगली होती. याची दखल घेत अखेर या अधिकाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली आहे. एसआयटीमध्ये वाल्मिकशी संबंधित पोलीस अधिकारी असल्याचे आव्हाड म्हणाले होते.

: हॅलो डॉक्टर :



## डोक्यावरचे टक्कल आणि केसांचे रोपण

लोकारोग्य

स्त्री असो किंवा पुरुष डोक्यावरचे काळेभोर आणि दाट केस म्हणजे स्त्री पुरुषांच्या सौंदर्याचे, तारुण्याचे प्रतीक असतात. किंबहुना या केसांमुळेच चेहऱ्याचं सौंदर्य खऱ्या अर्थाने खुलते. परंतु जेंव्हा ऐन तारुण्यात किंवा वार्धक्यापूर्वीच अचानक जेंव्हा केस गळती होऊ लागते आणि हळूहळू डोक्यावर टक्कल दिसू लागत तेंव्हा याच केसानी आपला गळा कापला अशी भावना आपल्या मनात निर्माण होते.

मात्र, आता वैद्यकशास्त्र हे अत्याधुनिक बनलेले आहे. शरीराच्या कुठल्याही अवयवाचे जसे रोपण होऊ शकते, तद्वतच डोक्यावरील केसांचे देखील रोपं अर्थात हेअर ट्रान्सप्लांट होऊ शकते. यासंदर्भात केशविकार तज्ज्ञ आणि त्वचाविकार तज्ज्ञ डॉ . धनंजय चव्हाण यांच्याशी केलेली बातचीत.

**केस गळती आणि टक्कल पडू लागणे ही प्रक्रिया नेमकी कशी सुरु होते आणि त्याची कारण काय?**

○ केस हा मानवी शरीराचा अत्यंत महत्वाचा घटक मानला गेला आहे. अचानक केस गळू लागतात तेंव्हा अनेक कारण असू शकतात. अनुवंशिकता हे महत्वाचं कारण असू शकते. आहारातील अनेक पोषक घटकांची कमतरता त्यामुळे होणारा ॲनिमिया यामुळे रक्ताचा अभाव असू शकतो आणि केस गळतात.

आपल्या शरीरांतर्गत अनेक प्रकारचे हार्मोनल आजार असू शकतात त्याचा केसांवर परिणाम होऊ शकतो. विविध प्रकारची औषध, ताणतणाव, आजार अशा कारणामुळे डोक्यावरचे केस गळू शकतात. मात्र योग्य उपचार करून आणि हेअर ट्रान्सप्लांट करून केस पूर्ववत होऊ शकतात.

**स्त्रियांमध्ये आणि पुरुषांमध्ये केस गळतीचे वेगवेगळे प्रकार असतात का?**

○ पुरुषांमध्ये पुढच्या बाजूने किंवा मागच्या बाजूने किंवा दोन्ही बाजूचे मधले केस गळतात. स्त्रियांमध्ये मात्र डोक्यामध्ये मध्ये जो भांग असतो तिथे केस गळती होते आणि टक्कल पडू लागते.

**केस गळतीवर नेमके उपचार काय?**

○ डाएट हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. आपल्या आहारात प्रथिन, व्हिटॅमिन्स, कर्बोदके, कॅल्शिअम अशा सर्व घटकांचा समावेश असायला हवा. आपण जर मांसाहारी असू तर चिकन, मासे, मटण, अंडी याचा समतोल समावेश आहारात असावा. पालेभाजा आणि मोड आलेली कडधान्य महत्वाची आहेत. आपल्या ताण तणावाचं सुयोग्य नियोजन देखील असायला हवं. केस गळती अनुवांशिक असेल तर केस गळती सुरु होण्यापूर्वीच जर योग्य त्या केशविकार तज्ज्ञ आणि त्वचाविकार तज्ज्ञांचा सल्ला घेतला तर केसांची गळती थांबवता येऊ शकते

**टक्कल पडल्यानंतर कोणी औषध उपलब्ध आहेत? केसांचे रोपण म्हणजे काय?**

○ केसगळतीवर जगभरात एफडीए प्रकारची उपचार अपद्धती प्रसिद्ध झालेली आहे. फिनास्टेराइट नावाची गोळी आणि मिनॉक्सीडील हे औषध टक्कल पडलेल्या जागी लावू शकतो. याशिवाय लो लेव्हल लेझर थेरेपी, डर्मा रोलर थेरेपी देखील केस गळतीवर उपलब्ध आहेत. मानवी डोक्यावर सुमारे १ लाख केस असतात. जर पुढल्या बाजूला टक्कल पडले असेल तर डोक्याच्या मागील बाजूचे केस काढून ते रोपण करता येतात. केसांचे रोपण हे एक शास्त्र आहे. डोक्याच्या मागील बाजूचे जे २५ हजार केस उरलेले असतात त्यापैकी दोन ते तीन हजार केस काढून ते पुढील बाजूला जिथे टक्कल पडलेले आहे तिथे रोपण करून दाट केसांचा आभास तयार करणे ही खरी कला आहे. केस रोपणामुळे पूर्वीसारखेच सौंदर्य खुलते. ■

### मसाला चहा



चहा हे पेय सर्वांनाच आवडतं. जगभरात चहा आवडीने प्यायला जातो. चहाचा सुंगध, रंग, कडकपणा यासोबत चहामध्ये काही असेही घटक असतात जे तुमच्या आरोग्यासाठी उत्तम ठरतात. चहा अतीप्रमाणात घेणं योग्य नसलं तरी जर तुम्हाला आजारापणापासून दूर राहायचे असेल तर तुम्ही मसाला चहा नक्कीच ट्राय करू शकता.

मसाला चहा तयार करण्यासाठी एक कप पाणी उकळून त्यात आलं किसून टाका. मग अर्धा चमचा चहापावडर टाका. चहा उकळल्यावर शेवटी चहाचा मसाला टाका. त्यात वेलची, दालचिनी, लवंग, काळीमिरी, तुळशीची पाने, गवती चहा वापरू शकता. चहामध्ये साखर आणि दूधाचा वापर कमी करा. ■■

### भारतात सिकलसेल चाचणीला अभिनव रूपांतरणासाठी लॉर्ड्स मार्क आणि आयआयटी मुंबईची भागीदारी

लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज या समूहाने भारतातील सिकलसेल चाचणीत क्रांती घडवून आणण्यासाठी प्रख्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई (आयआयटी-बी) सोबत भागीदारी केली आहे.

आयआयटी मुंबईद्वारे पेटंटप्राप्त देशातील पहिले एआय-सक्षम पॉस उपकरणे, सिकलसेल चाचणीशी संबंधित आव्हानांना सामोरे जातील, १०० टक्के अचूकतेसह ते या उपकरणांना अधिक सुलभ आणि सोयीस्कर बनवतील. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज २०२६-२७ पर्यंत १०० कोटी रुपयांच्या कमाईचे लक्ष्य ठेवून तंत्रज्ञान-सक्षम पॉस उपकरणे विकसित आणि वितरित करण्यासाठी २५ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज वसईतील त्यांच्या आयव्हीडी उत्पादन सुविधेमध्ये सिकलसेल पॉस उपकरणे तयार करण्यासाठी त्यांच्या इन-हाउस संशोधन व विकास संघाचा वापर करेल. ही उपकरणे देशभरातील सरकारी आरोग्य केंद्रे, पॅथॉलॉजी लॅब आणि लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये उपलब्ध असतील.

आयआयटी-मुंबईमधील बायोसायन्सेस आणि बायो इंजिनियरिंग विभागातील प्रा. देबजानी पॉल आणि त्यांच्या संघाने विकसित केलेली मायक्रोस्कोपी-आधारित चाचणी ही निगेच्या ठिकाणी रक्त नमुन्यांचे निरोगी, सिकल ट्रेट आणि सिकल ॲनिमिया अशी फारकत करू शकते. आयआयटी-मुंबई आणि लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज यांच्यातील सहकार्याचे उद्दिष्ट भारतातील सिकलसेल चाचणीत क्रांती घडवून आणणे, उपचार खर्च कमी करणे व सुविधा सक्षम करणे हा आहे.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## भुजबळांकडून धनंजय मुंडेंची पाठराखण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली आहे.

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी करू. दोषी कोणीही असो, त्याच्यावर कारवाई करू, असे म्हटले आहे. मग त्यापूर्वीच धनंजय मुंडे यांचा राजीनामा का मागत आहात, असा सवाल छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना केला.

भुजबळ म्हणाले की, तेलगी प्रकरणात माझ्यावर आरोप झाले. माझा राजीनामा घेतला. माझे उपमुख्यमंत्री पद गेले. मात्र, सीबीआय चौकशीत माझे नावसुद्धा आले नाही. कुणाचा बळी देऊन मला मंत्रीपद नको असल्याचे ते म्हणाले.

## ७४ हजार गोळ्या, अडीच लाख सिगारेट जप्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
मुंबईतील नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने बंदी असलेल्या तब्बल ७४ हजार गोळ्या (२९ किलो ६०० ग्रॅम किलो) आणि २ लाख ४४ हजार ४०० ई-सिगारेटही जप्त करण्यात आले आहेत.

मुंबई विमानतळावरील एअर कार्गो टर्मिनलवर ही कारवाई करण्यात आली. प्रतिबंधित असलेल्या या सिगारेट आणि गोळ्या लंडन येथून पाठवण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

तपासणीदरम्यान एनसीबीने लॉजिस्टिक कंपन्यांशी संबंधित दोन कंटेनरची तपासणी केली असता ॲड्रेस इंडिया आणि युडीक्स वर्ल्डवाइड कंपन्यांच्या कंटेनरमध्ये गोळ्या व सिगारेट सापडल्या. कंटेनरमध्ये खाद्यपदार्थ आणल्याचे सांगण्यात आले. प्रत्यक्षात तपासणी केली असता यात सिगारेट आणि गोळ्या आढळल्या.

## कराडवर ३०२ चा गुन्हा दाखल करा
### वडेट्टीवार यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड याच्यावर कलम ३०२ चा म्हणजे हत्येचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

प्रस्तुत प्रकरणात पुरावे दाबले जात आहेत, नष्ट केले जात आहेत. त्यामुळेच आम्ही धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत, असेही ते यावेळी म्हणालेत.

वडेट्टीवार यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडासह शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी मतदारांविषयी केलेल्या विधानाचा खरपूस समाचार घेतला.

वडेट्टीवार म्हणाले, सरकारने संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी नियुक्त केली आहे. या एसआयटीमधील काही अधिकारी बीड जिल्ह्यातील आहेत. विशेषतः त्यांची आरोपींशी ओळखही आहे. त्यांची त्यांच्याशी घनिष्ट मैत्री आहे असे मी म्हणणार नाही. पण ते आरोपीला ओळखतात.

धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांना केवळ खंडणीच्या प्रकरणात अटक झाली आहे. आवादा कंपनीतील दलित वॉचमनला खंडणीच्या प्रकरणातच मारहाण झाली. संतोष देशमुख यांनी या गरीब वॉचमनची बाजू घेतली होती. हाच त्यांचा मोटा गुन्हा ठरला. त्याचा सूड म्हणून त्यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या प्रकरणाचे धागेदोरे हे स्पष्टपणे वाल्मीक कराडपर्यंत जातात. त्यामुळे वाल्मीक कराडवर कलम ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा.

वडेट्टीवार यांनी यावेळी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी घेतलेली भूमिकाही फेटाळून लावली. भुजबळांची भूमिका आपल्याला पटली नाही, मी छगन भुजबळांची पत्रकार परिषद पाहिली. त्यात त्यांनी आरोप सिद्ध होईपर्यंत राजीनामा घेऊ नका अशी भूमिका मांडली. माझा एवढाच प्रश्न आहे की, छगन भुजबळ यांच्यावरही आरोपच झाले होते. त्यानंतरही त्यांना तुरुंगात का जावे लागले? त्यावेळच्या लोकांना शहाणपण नव्हते का? विलासराव देशमुख, आर आर पाटील यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आरोप झाल्यानंतर पदांचे राजीनामे दिले, असे ते म्हणाले.

## मीनाताई ठाकरे यांना अभिवादन



■ **छत्रपती संभाजीनगर** : स्व. मीनाताई ठाकरे यांचा ६ जानेवारी जन्मदिवस सर्वत्र ममतादिन म्हणून साजरा केला जातो. ममतानिमित्त मीनाताई ठाकरे यांना शिवसेनेतर्फे गुलमंडी अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिजित व सरला शिंदे प्रस्तुत आलाप ग्रुपतर्फे संगीतमय आदरांजली वाहण्यात आली.

माझी रेणुका माऊली- कल्पवृक्षाची सावली, मेरी माँ, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा आदी भावभक्तीगीतांनी परिसर मंत्रमुग्ध झाला होता. यावेळी गरजू महिलांना शिवसेना महिला आघाडी, वैजयंती खैरे यांच्यातर्फे ब्लॅंकेट वाटप करण्यात आले.

### स्मारकावर ठाकरे दाम्पत्यांकडून अभिवादन

**मुंबई** : मीनाताई ठाकरे ह्यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथील स्मारकावर आज उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांनी अभिवादन केले. या वेळी शिवसेना उपनेत्या ज्योती ठाकरे, उपनेते माजी महापौर मिलिंद वैद्य, उपनेते गुरुनाथ खोत, शिवसेना सचिव ॲड. साईनाथ दुर्गे, विभागप्रमुख आमदार महेश सावंत, विभागसंघटक माजी महापौर श्रध्दा जाधव तसेच इतर पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

### पानिपतकार विश्वास पाटील यांना पुरस्कार

**अकलूज** : अकलूज येथील विजय गणेशोत्सव ट्रस्टच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील विशेष राज्यस्तरीय साहित्यिक पुरस्कार पानिपतकार लेखक विश्वास पाटील यांना जाहीर झाला. राज्यस्तरीय साहित्यिक पुरस्कार अप्पासाहेब खोत व गोपाळराव देशमुख यांना तर यंदापासून दिला जाणारा माळशिरस तालुकास्तरीय साहित्यिक पुरस्कार अकलूजचे लेखक प्रमोद जोशी यांना जाहीर झाला आहे. विजय गणेशोत्सव पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते पाटील यांनी घोषणा केली.

### मनोज जरांगेंच्या चुलत भावाचा अपघाती मृत्यू

**शिरूर** : मनोज जरांगे यांचे शिरूर तालुक्यातील मातोरी येथील चुलत बंधू अशोक जरांगे यांचे उमरी- खांडेपारगाव जवळ शनिवारी सायंकाळी सात वाजता टेम्पो व दुचाकी अपघातात निधन झाले. त्यामुळे रविवारी पुण्यातील जनआक्रोश मोर्चा अर्धवट सोडून मनोज जरांगे हे मातोरीत परतले. मातोरी येथील अशोक तात्याराम जरांगे (४२) हे माजलगाव येथे खासगी फायनान्स कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून काम करत होते. अशोक जरांगे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

### मुंडेंबाबत वक्तव्य; मनोज जरांगेंविरुद्ध गुन्हा

**परळी** : मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने मनोज जरांगे यांच्यावर परळी शहर पोलिस ठाण्यात रविवारी अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला. हा गुन्हा नोंद व्हावा यासाठी मुंडे समर्थकांनी 5 तास पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले होते. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ व आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी परभणीत मोर्चा काढण्यात आला होता. या वेळी ह्यमुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही. शेजारी जिल्ह्यातील मराठ्यांनी घरात घुसून मारावेह्व असे चिथावणीखोर वक्तव्य केले होते.

नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. ७, जानेवारी २०२५ ■


# ठकबाजाकडून सुशिक्षीत बेरोजगाराची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

एका ठकबाजाने नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत एका सुशिक्षित बेरोजगाराकडून पैसे घेतले. काही दिवसांनी त्याला नोकरी लागल्याचे सांगत नियुक्तीपत्रही दिले. मात्र जेव्हा तो तरुण नियुक्तीपत्र घेऊन नोकरीवर रुजू होण्यासाठी गेला तेव्हा हे कार्यालय आमच्या कार्यालयाचे नाही, हे सांगण्यात आले आणि त्या तरुणाचे सर्व स्वप्न धुळीस एका क्षणात धुळीस मिळाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने पोलिसात तक्रार केली. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी पीडित तरुणाचे वडील निलकचंद दुकारीलाल तांडेकर (50) रा. ताजनगर, मानकापूरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रजत गुप्ता (40) रा. गणपतीनगर, गोधनी असे आरोपीचे नाव आहे.

रजत हा कोराडी औष्णिक केंद्रात कंत्राटी पद्धतीवर सुरक्षा रक्षक म्हणून कामाला होता. तो नेहमीच मानकापूर ठाण्यांतर्गत फरस परिसरातील एका पानटपरीवर जात होता. त्याच ठिकाणी तांडेकर यांचा मुलगा सुद्धा जायचा. त्यामुळे आरोपी रजत सोबत त्याची तोंड ओळख होती. दोघांमध्ये नेहमी बोलचाल होत होती. यातूनच तांडेकर यांचा मुलगा कामाच्या शोधात असल्याचे आरोपीला समजले. रजतने त्याला जाळ्यात अडकविण्यासाठी योजना आखली.

कोराडी औष्णिक केंद्रात सुरक्षा अधिकारी असल्याची बतावणी करून सुरक्षा रक्षक पदासाठी भर्ती होत असल्याची तांडेकर यांच्या मुलाला माहिती दिली. तसेच तुला नोकरीवर लागायचे असेल तर काही खर्च करावे लागेल असे सांगितले. पीडित तरुण त्याच्या जाळ्यात अडकला. त्याने वडिलांना सांगितले. निलकचंद हे पाटोळी विकतात. त्यांच्या मुलाने बीसीएचे शिक्षण घेतले आहे. सध्या नोकरी नसल्याने तो वडिलांच्या कामात मदत करतो. मुलास नोकरी मिळत असल्याने वडिलही आनंदी होते.

### नियुक्तीपत्र निघाले बनावट

रजतने रिझर्व्ह बँकेत चालान भरायची आहे, अशी थाप मारून वेळोवेळी पीडित तरुणाकडून 1 लाख 83 हजार रुपये घेतले. मात्र 8 महिने लोटूनही नोकरी मिळाली नाही. याबाबत विचारपूस केली असता रजत नव-नवीन बहाणे बनवून वेळ मारून नेत होता. त्यामुळे पीडिताने त्याच्यावर पैसे परत करण्यासाठी दबाव टाकण्यास सुरूवात केली. त्याला शांत करण्यासाठी रजतने बनावट नियुक्तीपत्र देत नोकरी मिळाल्याचे सांगितले. नियुक्तीपत्र घेऊन पीडित नोकरीवर रुजू होण्यासाठी गेला असता ते बनावट असल्याचे सांगण्यात आले. पीडित तरुणाच्या पायाखालची वाळूच सरकली. त्याने रजतविरुद्ध पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# एचएमपीव्ही विषाणूचा धोका वाढला!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



करोनाच्या प्रभावातून जग सावरला असताना आता नवा एचएमपीव्ही विषाणूचा धोका जगासमोर आहे. देशात या विषाणूचे प्रकरण बघायला मिळत आहे. राज्यात या विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करत राज्याच्या आरोग्य विभागाला विशेष कृती दल स्थापित करण्याचे आदेश द्यावे, अशी विनंती करणारा अर्ज सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आला.

करोनाचा प्रादुर्भाव झाल्यावर २०२० मध्ये उच्च न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेतली होती. करोनाबाबत अप्रभावी व्यवस्थापनामुळे न्यायालयाने उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाला वारंवार आदेश दिले होते. आता याच जनहित याचिकेत वेगाने पसरणाऱ्या नव्या एचएमपीव्ही विषाणूबाबत न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला आहे.

### उच्च न्यायालयाला हस्तक्षेप

नव्या विषाणूचे लक्षण अगदी करोना विषाणूसारखे आहे. त्यामुळे राज्यात परिस्थिती हाताच्या बाहेर जाण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची विनंती अर्जाच्या माध्यमातून न्यायालयीन मित्र ॲड. श्रीरंग भांडारकर यांनी केली आहे. नव्या विषाणूच्या रुग्णांची चाचणी करणे, लक्षणांबाबत तसेच प्रतिबंधात्मक उपायांबाबत सार्वजनिक जनजागृती अभियान राबविणे, राज्यात आरोग्य व्यवस्थेला नव्या विषाणूला हाताळण्यासाठी सज्ज करणे आदी मागण्या अर्जाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. याशिवाय राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने तात्काळ विशेष कृती दलाची स्थापना करून न्यायालयाला नियमित अहवाल द्यावा, अशी मागणीही अजार्तून केली गेली आहे. याचिकेवर बुधवार, ८ जानेवारी रोजी न्यायालयात सुनावणी होण्याची शक्यता आहे. चीनमध्ये सध्या मानवी मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरू आहे. राज्यात अद्याप या विषाणूचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असे आरोग्य विभागाने रविवारी स्पष्ट केले. दरम्यान, एचएमपीव्हीबाबत दक्षतेसह सर्दी-खोकल्याच्या रुग्णांच्या सर्वेक्षणाचे पाऊल आरोग्य विभागाने उचलले आहे.

एचएमपीव्हीचा धोका वाढल्याने आरोग्य विभागाने राज्यातील श्वसन संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. राज्यात २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये श्वसन संसर्गात कोणतीही वाढ झालेली दिसून आलेली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी श्वसनविकाराच्या संसगार्पासून आपला बचाव करण्यासाठी काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागाने म्हटले आहे. चीनमध्ये एचएमपीव्ही साथरोगाचा संसर्ग सुरू असून, त्याबाबत चिंता करण्याचे कारण नाही. याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भीतीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्वेक्षण अधिक गतिमान करून सर्दी-खोकला रुग्णांचे नियमित सर्वेक्षण अहवाल सादर करावे, असे आदेशही आरोग्य विभागाने दिले आहेत.

# विराट भक्ती सत्संग रौप्य महोत्सव सोहळा ८ ते १२ जानेवारीला

**नागपूर :** विश्व जागृती मिशन, अंतर्गत नागपूर मंडळ, अध्यात्माच्या गंगेत गुरु दर्शनासाठी नागपुरात दूरदूरचे भाविक येतील आणि रौप्य महोत्सवमध्ये ज्ञानाचा प्रवाह होईल. विश्व जगगपूर मंडळाच्या नेतृत्वाखाली, आचार्य सुधांशू यांच्या मार्गदर्शनाखाली 8 ते 12 जानेवारी दरम्यान रेशमबाग मैदानावर 5 दिवसीय विराट भक्ती सत्संग रौप्य महोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. महाराज नागपूरमधील आचार्य सुधांशु जी महाराजांच्या विराट भक्ती सत्संगाचे हे 25 वर्ष आहे.

या रौप्य वर्षात, त्यांचे दूरदूरचे भक्त नागपूरला गुरुवार आचार्य सुधांशु महाराजांचे दर्शन घेण्यासाठी येतील. विश्वा जगगपूर शाखेचे प्रमुख दिलीप मुरर्का यांनी सांगितले की, 8 जानेवारी रोजी दुपारी 4 वाजता रेशमबाग मैदानावर सत्संग सुरू होईल. कथेचे मुख्य यजमान श्रीमती वनिथा पोटुवर आणि गुरुदेव नगरचे रहिवासी श्री सुयोग प्रकाश पोटुवार आहेत.

9 जानेवारी ते 12 जानेवारी या कालावधीत सत्संगाचे सत्र सकाळी 9 वाजता सुरू होईल आणि दुपारचे सत्र दुपारी 4 वाजता सुरू होईल. 11 जानेवारी रोजी रौप्य महोत्सवाचा विशेष कार्यक्रम होणार आहे. गुरुमाता रिचा सुधांशुजी आणि गुरुपुत्री योग गुरु डॉ. अर्चिका दीदी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. योगगुरू डॉ. अर्चिका दीदी 12 जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात ध्यान करतील.

यानंतर, विशेष कार्यक्रमांतर्गत, सकाळी 11.30 पासून, गुरुवर सुधांशु महाराज विशेष आशीर्वाद आणि गुरुमंत्र दीक्षा देतील. प्रधान, दिलीप मुरारका यांनी सांगितले की, गांधीबागमधील आग्रासेन भवन येथे गावाबाहेरून येणाऱ्या भक्तांच्या घरांची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या यशासाठी, मिशनचे पदाधिकारी, दिलीप मुरारका, युवा क्रांती दाल सदस्य, गुरुभक्त कुटुंब प्रयत्न करत आहेत.

# अल्पवयीन चोर गुन्हेशाखेच्या जाळ्यात

**नागपूर :** मानकापूर चौकातील पानठेला फोडून 70 हजारांचा माल चोरी प्रकरणात गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गोपनिय माहितीवरून एका अल्पवयीनला ताब्यात घेतले. चौकशीत अल्पवयीनने साथीदारासोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फियार्दी अमित पन्नालाल यादव (40) रा. जयहिंदनगर, मानकापूर यांचा मानकापूर चौकात पानठेला आहे. गत 10 नोव्हेंबरच्या मध्यरात्री अज्ञात आरोपीने पानठेल्याचे कुलूप तोडून विविध कंपनीचे सिगारेट्स, परफ्यूम व रोख 30 हजार असा एकूण 70 हजार रुपये किंमतीचा माल चोरून नेला होता. दुसऱ्या दिवशी ही चोरी उघडकीस आल्यानंतर अमित यांनी मानकापूर ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट 5 चे पथकाकडूनही सुरू होता. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी एका अल्पवयीनला ताब्यात घेतले.

# ५७८ भजनी मंडळ करणार श्रीकृष्ण भक्तीचा जागर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :




केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून उद्या, दि. ७ जानेवारीपासून खासदार भजन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. ११ जानेवारीपर्यंत नागपुरातील सहा विधानसभा क्षेत्रांमध्ये ही स्पर्धा होणार आहे.

मंगळवार, दि. ७ जानेवारीला मध्य नागपुरात श्री संत कोलबा स्वामी हॉल मंगळवारी येथे सेवासदन संस्थेच्या अध्यक्ष सौ. कांचनताई गडकरी आणि अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस गुरुकुंज मोझरीचे जनार्दनपंत बोथे गुरुजी यांच्या विशेष उपस्थितीत खासदार भजन स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

यावेळी विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दटके, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, भाजप शहराध्यक्ष बंटी कुकडे, भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष प्रगती पाटील, माजी महापौर अर्चना डेहनकर आदींची प्रमुख उपस्थिती असेल.

भजन स्पर्धेत नागपुरातील ५७८ भजनी मंडळांनी आपला सहभाग निश्चित केला आहे. स्पर्धेत प्रत्येक मंडळाला पहिले गीत म्हणून गवळण गीत, अभंग आणि दुसरे गीत म्हणून पारंपरिक लोकगीत, जोगवा, गोंधळ, भक्तिगीत सादर करायचे आहे. अशी दोन गीते आठ मिनिटांच्या आत सादर करायची आहेत.

या खासदार भजन स्पर्धेचे संयोजक डॉ. श्रीरंग वराडपांडे असून आयोजन समितीत अमोल ठाकरे, विश्वनाथ कुंभलकर, माया हाडे, रेखा निमजे, सपना सागुळले, श्रद्धा पाठक, श्वेता निकम, सुजाता कथोटे, रंजना गुप्ता, अभिजित कठाले आदी कार्यरत आहेत.

मंगळवार, दि. ७ जानेवारीला मध्य व उत्तर विभागाची प्राथमिक फेरी श्री संत कोलबा स्वामी सांस्कृतिक हॉल, जुनी मंगळवारी सीए रोड येथे होईल. बुधवार दि. ८ जानेवारीला पूर्व विभागाची प्राथमिक फेरी संताजी हॉल, छापरू नगर येथे, गुरूवार दि. ९ जानेवारीला दक्षिण विभागाची प्राथमिक फेरी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, उदय नगर रिंग रोड येथे, शुक्रवार दि. १० जानेवारीला दक्षिण पश्चिम विभागाची प्राथमिक फेरी छत्रपती सभागृह, वर्धा रोड येथे आणि शनिवार दि. ११ जानेवारीला पश्चिम विभागाची प्राथमिक फेरी श्रीराम मंदिर, राम नगर येथे आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत ही स्पर्धा होईल.

### युवा आणि ज्येष्ठ गट

खासदार भजन स्पर्धेत यावर्षी भजनी मंडळांसाठी युवा वयोगटातून (२१-३५ वर्षे) पाच पुरस्कार आणि ज्येष्ठ वयोगटातून (३५ ते ७० वर्षे) सात पूरस्कार देण्यात येणार आहे.

२१ हजार, १५ हजार, ११ हजार, ७ हजार, ५ हजार अशी पुरस्काराची रक्कम असेल. महाअंतीम फेरी कविवर्य सुरेश भट्ट सभागृह रेशीमबाग येथे आयोजित असून विजेत्या मंडळांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

# डॉ. आशिष मुजुमदार यांचे 'गझल आख्यान' ९ जानेवारी रोजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

'सप्तक' आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक डॉ. आशिष मुजुमदार यांचे गझल आख्यान (मुजुमदार सरांचा क्लास) या कार्यक्रमाचे आयोजन येत्या ९ जानेवारी 2025 रोजी सायं. ६.०० वा. अमेय हॉल ४ था मजला, विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले आहे.

आयुष्य समृद्ध करणारा काव्यानुभव' ही कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना असून गझलेचे तंत्र, आशय, विषय आणि सौंदर्य, गझल संगीत रचना, गझल गायकी, गझल गायन या बद्दल या कार्यक्रमात संगीतमय चर्चा होणार आहे. मराठी आणि हिंदी गझल आणि संगीत जगतात डॉ. आशिष मुजुमदार हे एक सर्वपरिचित नाव असून मजूमदार यांनी संगीत प्रेमींना गेल्या 25 वषार्पेक्षा अधिक काळापासून सुमधुर गझलांनी रिझवले आहे.

गझल रसिकांनी आवर्जून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन 'सप्तक' आणि विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आले आहे.

# वाघांचा रस्ता अडविला; न्यायालयाकडून गंभीर दखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात ३१ डिसेंबरला पर्यटक वाहनांनी वाघीण आणि तिच्या बछड्यांचा दोन्ही बाजूने मार्ग रोखल्याची घटना उघडकीस आली होती. पर्यटनाच्या नावावर अशाप्रकारच्या घटना वारंवार होत असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याप्रकरणाची गंभीर दखल घेतली. उच्च न्यायालयाने याबाबत सोमवारी स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचे आदेश देत राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांना दोन दिवसात जबाब नोंदविण्याचे आदेश दिले.



वाघांना पर्यटकांनी घेरले

३१ डिसेंबरला एफ २ वाघीण आणि तिच्या पाच बछड्यांना पर्यटकांच्या वाहनांनी बराच वेळ घेरले होते. या वाघिणीची व तिच्या बछड्यांची वाट रोखून धरली होती. उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील कुही वनक्षेत्रातील गोठणगाव सफारी मार्गावर ही घटना घडली. याबाबत वृत्तपत्रांनी प्रकाशित केलेल्या बातम्यांच्या आधारावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेण्याचे आदेश दिले. यासह न्यायालयाने राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना बुधवारपर्यंत याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी सांगितले आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी जबाब नोंदविल्यावर बुधवारी याप्रकरणी न्यायालयात सुनावणी होणार आहे. मागील काही महिन्यापासून व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्यात वाघांचा रस्ता अडविल्याचे प्रकरण वारंवार बघायला मिळत आहे. वन पर्यटनाबाबत स्पष्ट नियमावली असताना देखील जिप्सी चालक आणि मार्गदर्शक नियमांचे सर्रास उल्लंघन करत आहे. व्याघ्र पर्यटनाचे वाढलेल्या आकर्षणामुळे पर्यटकांकडूनही नियमांची पायमल्ली होती. या सर्व पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने याप्रकरणाची दखल घेण्याचा निर्णय घेतला. येत्या बुधवारी न्यायालयाकडून याबाबत न्यायालयीन मित्राची नियुक्ती केली जाईल आणि पुढील सुनावणी होईल.

अभयारण्यात एफ-२ वाघीण आणि तिच्या पाच बछड्यांचा रस्ता अडवणाऱ्या चार पर्यटक वाहनचालक आणि मार्गदर्शकांच्या निलंबन कालावधीत वाढ करण्यात आली आहे. तर दंडाच्या रकमेत देखील वाढ करण्यात आली आहे. यात सहभागी असणाऱ्यांवर प्राथमिक गुन्हा नोंदवण्याचा आदेश देण्यात आला आहे. चारही पर्यटक वाहनचालक आणि मार्गदर्शकांचे निलंबन आता सात दिवसांवरून तीन महिन्यांसाठी करण्यात आले आहे. पर्यटक वाहनांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर पर्यटक मार्गदर्शकांना एक हजार रुपयाचा दंड ठोठावण्यात आला आहे. या घटनेत सहभागी असणाऱ्या पर्यटकांविरुद्ध प्राथमिक गुन्हा नोंद करण्याचा आदेश देण्यात आले आहे.

# वर्षभरात ७३ हजारावर लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोडणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

केंद्राच्या 'इज ऑफ लिव्हिंग' निदेर्शांकानुसार ग्राहक सेवा प्रदान करताना, महावितरणच्या नागपूर परिमंडलाने 1 जानेवारी 2024 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत तब्बल 73 हजार 897 लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोड दिले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री आणि ऊजार्मंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात महावितरण नागपूरचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांच्या मार्गदर्शनात आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या नेतृत्वात नागपूर परिमंडलात ह्यइज ऑफ लिव्हींगह्ण या संकल्पनेनुसार वीज ग्राहकांना तातडीने सेवा दिल्या जात आहेत.यात मागिल वर्षभरात नागपूर शहर मंडलातील 42 हजार 607, नागपूर ग्रामिण मंडलातील 19 हजार 136 आणि वर्धा मंडलातील 12 हजार 154 लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोडण्या दिल्या गेल्या आहेत.

यात नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक 11 हजार 622 वीज जोडण्या या कॉंग्रेसनगर विभागात तर त्याखालोखाल महाल विभागात 8 हजार 880 वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय सिव्हील लाईन्स विभागात 8 हजार 26, बुटीबोरी विभागात 7 हजार 909, गांधीबाग विभागात 6 हजार 170, मौदा विभागात 8 हजार 151, सावनेर विभागात 4 हजार 859, उमरेड विभागात 3 हजार 277, काटोल विभागात 2 हजार 849 ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय वर्धा जिल्ह्यातील वर्धा विभागात 5 हजार 439, हिंगणघाट विभागात 3 हजार 575 तर आर्वी विभागात 1 हजार 140 लघुदाब ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

या 73 हजार 897 नवीन वीज जोडण्यांमध्ये सर्वाधिक 58 हजार 63 या घरगुती वीज जोडण्या असून यात नागपूर शहर मंडलातील 35 हजार 385, नागपूर ग्रामिण मंडलातील 14 हजार 601 तर वर्धा मंडलातील 8 हजात 77 वीज जोडण्यांचा समावेश आहे. याशिवाय परिमंडलात 3 हजार 761 कृषी ग्राहकांना देखील नवीन वीज जोड देण्यात आले आहे. याशिवाय 9 हजार 51 वाणिज्यीक, 19 इलेक्ट्रीक वाहन चार्जिंग केंद्र, 1 हजार 116 औद्योगिक ग्राहक, 55 कुक्कूटपालन केंद्र, 10 पॉवरलूम, 670 तात्पुरत्या वीज जोडण्या, 412 सार्वजनिक सेवा, 117 सार्वजनिक पाणि पुरवठा आणि 140 रस्त्यावरील दिवाबत्तींना देखिल वीज जोड देण्यात आले आहेत.

'महावितरण'कडून 'इज ऑफ लिव्हिंग' अंतर्गत नागपूर परिमंडलात नवीन वीज जोडणीसाठी आवश्यक पायाभुत सुविधा उपलब्ध असलेल्या भागात मागेल त्यास ताबडतोब नवीन वीजजोड देण्यात येत आहे. 'महावितरणच्या 'इज ऑफ लिव्हिंग' चा लाभ घेत ग्राहकांनी देखील नवीन वीज जोडणी घेतल्यानंतर त्यांच्या वीज बिलांचा भरणा ऑनलाईन पद्धतीच्या माध्यमाने नियमित करुन सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# सावित्रीबाईंचे कार्य सर्वकाळ प्रेरणादायी : राज्यमंत्री पंकज भोयर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

"क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्री फुले यांचे त्या काळातील कार्य हे निश्चितच असामान्य असून आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे आचरण हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल," असे विचार महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री, डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केले. महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग,नागपूर अंतर्गत ' थोर महापुरुषांची जयंती / स्मृतिदिन समारोह समिती', 'गौरी प्रकाशन, वर्धा' व सावित्रीबाई फुले गौरव ग्रंथ निर्मिती मंडळ" यांचे संयुक्त विद्यमाने महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह, रेशीमबाग चौक, नागपूर या ठिकाणी आयोजित सावित्रीबाई फुले गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून अशोकराव मानकर, माजी आमदार,विधान परिषद, नागपूर हे होते. सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून डॉ. अविनाश आवलगावकर, कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर (अमरावती ) यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत गौरी प्रकाशन, वर्धा तर्फे प्रकाशित सावित्रीबाई फुले यांचे जीवन, कार्य व साहित्याचा गौरव करणारा सावित्रीबाई फुले गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.



डॉ.वेदप्रकाश मिश्रा, मुख्य सल्लागार, दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सावंगी मेघे (वर्धा) डॉ.श्रीनिवास खांदेवाले, ज्येष्ठ अर्थतज्ञ, नागपूर, डॉ.विनायक देशपांडे, कुलगुरू रायसोनी विद्यापीठ, अमरावती तसेच महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रकाश देवते, उपाध्यक्ष गुलाबराव चिंचाटे, सहचिटणीस रमेश राऊत, यांची उपस्थिती लाभली. गौरव ग्रंथ निर्मिती मंडळाच्या वतीने मुख्य संकल्पक प्रेरणा राजेश खवले,मुख्य संपादक डॉ.पुष्पाताई तायडे, सहसंपादक प्रकाश अंधारे (शिक्षणाधिकारी), अकोला, अतुल दोड, जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपूर, प्रशांत वावगे, लेखाधिकारी, महाज्योती, रश्मी वावगे उपस्थित होते.

क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुतळ्यांचे, प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करून सोहळ्याचा शुभारंभ झाला. खुशबू कठाणे हिने सावित्रीआई अभिवादनपर गीतगायन केले. मनिषा गिरडे यांनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून मान्यवरांचा परिचय गौरव ग्रंथाच्या मुख्य संपादिका डॉ.पुष्पाताई तायडे यांनी करून दिला.

डॉ.अविनाश आवलगावकर, डॉ. वेदप्रकाश मिश्रा,डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.विनायक देशपांडे, आदी मान्यवरांनी अतिशय अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी विचार व्यक्त केलेत. माजी आमदार अशोक मानकर यांनी अध्यक्षिय विचार व्यक्त केले.गौरव ग्रंथाचे सहसंपादक प्रकाश अंधारे यांनी उपस्थितांचे आभार मानले तर शोभा लेकुरवाळे यांनी संचालन केले.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकर्ते व माळी समाज बांधव तसेच अनेक सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.अरूण पवार, सरचिटणीस रवींद्र अंबाडकर, कोषाध्यक्ष प्रा.मुकेश घोळसे, राजेंद्र पाटील संयोजक,/ संचालक थोर महापुरुषांची जयंती स्मृतिदिन समारोह समिती. सहसंयोजक/ संचालक प्रा.डॉ. अभिजीत पोतले संचालक सुनील चिमोटे, अजय घाडगे, कृष्णा महादुरे, शरद चांदोरे, मोहित श्रीखंडे, प्रकाश बोबडे, राजेंद्र वाघे, नंदू कनेर, प्रा.पंकज कुरळकर, देवेंद्र काटे, शोभा लेकुरवाळे, डॉ.सौ अलका झाडे, संचालक मंडळांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# भारतीय संस्कृती ही वाचन कौशल्यावर आधारित

## जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात वाचन संकल्प

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ६ :

जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत प्रथम सप्ताहात ग्रंथालयाची स्वच्छता, ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचनाचे महत्व, सामूहिक वाचन सोहळा, पुस्तकाचे सामूहिक वाचन, वाचन आपल्या आवडीनुसार व वाचन संवाद अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांनी ग्रंथालयमध्ये आपला वेळ जास्तीत जास्त घालवावा, म्हणून पहिल्या व दुसऱ्या दिवशी ग्रंथालयाची स्वच्छता व ग्रंथ प्रदर्शनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांचा मानसिक कल वाचनाकडे वळावा यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पाठवलेल्या लिंक वरून विद्यार्थ्यांना वाचन कौशल्य कार्यशाळेचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले.

द हितवाद वृत्तपत्राचे संपादक विजय फणशीकर यांनी वाचन कौशल्यावर आधारित मार्गदर्शन केले. "भारतीय संस्कृती ही वाचन कौशल्यवर आधारित आहे माणसे मेले तरी चालतील पण पुस्तके जगले पाहिजे" हे मत हे त्यांनी यावेळी व्यक्त केले वाचन संस्कृतीचे जतन व्हावे यासाठीच 'वाचनाचे महत्त्व'या विषयावर निबंध स्पर्धा ही घेण्यात आली व विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आले.

सर्वांनी वाचनाचा आनंद घ्यावा यासाठी सामुहिक वाचन सोहळ्याचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी वाचनाचा आनंद लुटला. वाचन आपल्या आवडीनुसार व वाचन संवाद या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी त्यांना जे साहित्य आवडते त्या साहित्याचे वाचन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय टेकाडे यांनी विद्यार्थ्यांना जे आवश्यक आहेत ते सर्व पुस्तके आपल्या महाविद्यालयात आहेत त्या पुस्तकांचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घ्यावा व आपले जीवन घडवावे असे वक्तव्य यावेळी केले. कार्यक्रमाचे आयोजन हे महाविद्यालयाच्या ग्रंथलयाद्वारे करण्यात आले. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक ग्रंथालयाच्या ग्रंथपाल डॉ.प्रेमलता कुऱ्हेकर,रा.से.यो.चे समन्वयक डॉ. काशीनाथ मानमोडे, हिंदी विभागाच्या सहाय्यक प्रा. आकांक्षा बांगर, मराठी विभागाच्या सहाय्यक प्रा. डॉ. वैशाली धनविजय, इग्रंजी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. लिना फाटे, डॉ. देशमुख कॉमर्स विभागाच्या विभाग प्रमुख डॉ.नभा कांबळे आदी उपस्थित होते.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधुन पत्रकार दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ६ :

कन्हान शहर विकास मंच द्वारे दर्पणकार मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या 213 व्या जयंती चे औचित्य साधुन जागतिक पत्रकार दिवस कार्यक्रमाचे आयोजन गांधी चौक येथे करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष एन.एस मालवीय, प्रमुख पाहुणे कन्हान मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मा.सुर्यभान फरकाडे, जेष्ठ पत्रकार चंद्रकुमार चौकसे, संस्थेचे मार्गदर्शक भरत सावळे सह आदि मान्यवरांचा हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कन्हान शहर विकास मंच च्या पदाधिकार्यांनी संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पत्रकार बंधुना डायरी, पेन आणि पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले. कार्यक्रमात उपस्थित पत्रकार बांधवांनी आणि शहर विकास मंचच्या पदाधिकार्यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन करीत पत्रकार दिवस थाटात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन मंच सदस्य प्रदीप बावने आणि आभार अर्जुन पात्रे यांनी केले. या प्रसंगी लोकल ॲप नागपुर जिल्हा प्रतिनिधि उमेश फुलबेल, पत्रकार सुनिल सरोदे, दिनेश नानवटकर, धनंजय कापसीकर, कमलसिंह यादव, सतिश घारड, जयंत कुंभलकर, रमेश गोडघाटे, आकाश पंडितकर, निलेश गाढवे, भरत पगारे, विवेक पाटील, रोहित मानवटकर सह आदि पत्रकार बंधु प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर, माहेर इंचुलकर, राजेंद्र बावनकुळे, कैलास डाले, उमेश मेश्राम , रोशन जामकर, अजय चव्हान, लोकेश दमाहे, प्रफुल देऊळकर, नाना ऊकेकर, योगेंन्द्र आकरे, राहुल सोनबरसे सह आदि मंच सदस्यांनी सहकार्य केले.

# नारसिंगी येथे भजन व शाहिरी सादरीकरण मेळावा उत्साहात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ६ :

नारसिंगी येथे मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था, काटोल, राष्ट्रसंत सम्येक संदेश फाउंडेशन, सातारा,कुही व समता बहूउदेशिय संस्था,पारडसिंगा याचे वतीने दि.३१/१२/२०२४ ला श्री हनुमान मंदीर नारसिगी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे पुण्यतिथि निमित्य भजन व शाहीरी सादरीकरण मेळावा पार पडला.



या मेळाव्याची सुरुवात ला वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे फोटो चे पूजन व माल्यार्पण करन्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजू वानखेड़े होते तर प्रमुख अतिथि संजय काळे महाराज, भिमराव गायकवाड, प्रकाश राउत, संदेश गणवीर, प्रा. रविन्द्र सोमकुवर, विशेष अतिथी नरेद डोंगरे, नितिन तायवाडे, मिलींद बन्सोड, बाबाराव तागडे, सुनिल नार नवरे,संजय बडोदेकर होते.

या मेळाव्यात भजन, भारुड,व शाहीरी सादरीकरण केले. मंजुळा वानखेडे यांनी अंधश्रद्धा आणि आशा मेढे डेबुजी नी केलेले स्वच्छते विषयी गायन केले. व प्रमुख अतिथीनीं तुकडोजी महाराज यांच्या जिवन चरित्रावर गायन सादर करुन समाज प्रबोधन केले.

तसेच मिनाक्षी गनवीर, लुमेश नेहारे, निर्मला नागोसे, अनुसया परतेती, उषाबाई डाखोळे, गजेद्र काकडे भाऊ, विरेद्र मानकर प्रतिभा हिवसे, आशा हिवसे, कल्पना सहारे, निलिमा इगळे, कविता भोयरकर, पंचफुला मोरोलिया, लता जाधव सावित्री डोगरे, अनीता लोही,मिना पाटील, वंदना गजभिये,सीमा वानखेडे, कांबळे, वंदना बागडे, कांता वरघट, व इतर कलावंतानी गायन करुन जनजागृती केली. त्याचप्रमाने अजित बालक मन्दिर, वाडी, नागपूर यांचे सचिव रामदास मानेराव याचा सहभाग होता. मेळाव्याचे सूत्रसंचालन कविता भोयरकर यांनी केले तर आभार गजेंद काकडे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी नारसिगी गावकरी मंडळींनी अथक परिश्रम घेवुन कार्यक्रम यशस्वी केला.

# कन्हान येथे विराट हिंदु युवा रॅलीचे जल्लोषात स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ६ :

वीर बजरंगी संस्थान नागपुर द्वारा आयोजित विराट हिंदु युवा रैलीचे सकल हिंदू समाजा द्वारे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा वीर बजरंगी संस्थान नागपुरद्वारे विराट हिंदु युवा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नागपुर वरुन विराट हिंदु युवा रॅली काढण्यात आली. रॅली कामठी मार्गाने कन्हान श्री हनुमान शिव पंचायत मंदिर गांधी चौक येथे पोहचली असता सकल हिंदू समाजा द्वारे फुलाच्या वर्षाने जल्लोषात स्वागत करण्यात आले. सकल हिंदू समाजा युवकांनी जय श्री राम, जय जय श्री राम च्या घोषना करुन पालखीची पुजा अर्चना केली. रॅली रामटेक मार्गाने रवाना झाली. या प्रसंगी ज्ञानेश्वर दारोडे, विनोद केने, छोटु भैया, शुभम बावनकर, हितेश राजपुत , सुजल यादव, सुधीर लोंढे, ऋषभ बावनकर, अमन यादव, कृणाल आगुटलेवार, शिव यादव, ओम यादव, अमन यादव, मोहित यादव, हिमांशु सावरकर, मोहित सावरकर, सार्थक खंगार, अनुराग महल्ले, कृणाल सिंग तिलवार सह आदि युवा उपस्थित होते.

# संगीतोपासक संस्थेद्वारे हिंदी गीतांचा कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

संगीतोपासक संस्थेद्वारे आयोजित 'गीत गाता चल' हा हिंदी गीतांचा निःशुल्क कार्यक्रम सायंटिफिक सभागृहात स्व.कृष्णा भोयर सरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. यात 'दिल जो भी है कहेगा, अकेले है चले आओ, लेकर हम दिवाना दिल, वो भुली दास्ताँ, यारी है इमान मेरा, सिमटी सी शरमाईसी, ये दिल ना होता बेचारा, चुपकेसे दिल दे दे, जादुगर सैंया, हम प्यार मे जलने वालों को, खयीके पान बनारसवाला, कोई लौटा दे अशी २८ एकल व युगल गीते आयोजक दिलीप रपाटे, विवेक सकदेव, संजय कुळकर्णी यांच्यासह मोहन पांडे, आबा भोगे, चेतन एलकुंचवार, डॉ. सुशील गाडेकर, दिपा रपाटे, शुभलक्ष्मी पितळे, प्राची खडक्कार, डॉ.वैशाली खंडाईत, मानसी बढे, रोहिणी पाटणकर, डॉ. कविता खोंड या गायक कलाकारांनी सुरेल गायलीत. शिरीष पाटणकर व स्नेहल खंडागळे यांच्या निवेदनाने कार्यक्रमाची रंगत वाढली. संगीत संयोजन आनंद मास्टे यांचे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संगीतोपासक संस्थेचे संगीत सल्लागार राहिलेल्या स्व. कृष्णा भोयर सरांच्या कुटुंबीयांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

# पथसंचलनातून समाजात सकारात्मक विश्वास : भाग्यश्री साठे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

मकरसंक्रमणोत्सव किंवा पथसंचलनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विश्वास, आत्मविश्वास निर्माण करणे हा राष्ट्रसेविका समितीचा उद्देश असल्याचे प्रतिपादन अ. भा. महिला समन्वयाच्या सहसंयोजिका भाग्यश्री साठे यांनी केले.




राष्ट्र सेविका समिती नागपूर विभागाचा मकरसंक्रमण उत्सव आज भगवान नगरमधील बॅनर्जी ले-आऊटमध्ये झाला. सन गोल्ड एजी फॉर्म्सच्या संचालिका सुमती अग्रवाल प्रमुख अतिथी तसेच प्रमुख वक्त्या भाग्यश्री साठे, नागपूर विभाग कार्यवाहिका करुणा साठे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

भाग्यश्री साठे उदबोधनात म्हणाल्या की, आज मकरसंक्रमणोत्सवाच्या निमित्ताने पथसंचलन झाले. संचलन अर्थात सम्यक चलन. चांगले, व्यवस्थित, विनाचुक, असे सम्यकचे अर्थ आहेत. जीवनात कसे चांगले चालणे. व्यक्तिनिमार्णाचा एक छोटा भाग म्हणजे पथसंचलन आहे.

पथसंचलन एक दुसऱ्याप्रति समायोजन शिकवते. त्याशिवाय जीवन सुखमय होऊ शकत नाही. एकमेकांप्रति समाजोयजन हवे, तेव्हाच कुठे समाजही स्वस्थ, सुखी होतो. कदम कदम बढायेजा साधनाकी राहपर त्याग की मशाल ले जिंदगी की थाहपर, असा संदेश पथसंचनातून जीवनभर चालण्यासाठी मिळतो. गणवेश आपण सर्व एक आहोत, जातीवगैरे कुठलाही भेद नाही, भारत देशाचे पुत्र, हिंदू धर्माचे उपासक असल्याचा संदेश मिळतो.

पथसंचलन हे समरसतेचे, सम्यक क्रमण करण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे. शक्तीचे प्रदर्शन होते. शिवाय समाजमनात एक विश्वास जागृत होतो की, चांगले काम करणारे लोक आज समाजात आहेत. सकारात्मक मानसिक वातावरण निर्माण होते, असे त्या म्हणाल्या.

# अनेक युवकांचा शिवसेनेत पक्षप्रवेश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

आज दि.०३/०१/२०२५ ला शिवसेना नागपुर लोकसभा जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांच्या नेतृत्वात रितेश सातोके यांच्या सहकार्याने रितीक ढोले, भुषण धोतरकर, कुणाल उजगावकर, यश धोतरकर, रितीक सुरमवार, रोहीत ठाकरे, आदित्य शास्त्री, तेजस ऊईके, अविनाश पिंपळीकर, राकेश मौंदेकर, तेजस बावने, रीशिकेश कामडे यांचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी शहर उपप्रमुख अल्पेशजी शिवनकर, विभागप्रमुख सागर मौंदेकर, आशिष नाकाडे, विभाग उपप्रमुख चिंतामण पारशिवनिकर, प्रभाग प्रमुख हरिष पाठराबे, अक्षय मोहाडीकर , योगेश रंभाड, जनार्दन भगत, गौरव रामापुरे, अक्षय वंजारी व शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# पोलीस स्टेशन येथे वर्धापन दिन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ६ :

3 जानेवारी पोलीस वर्धापन दिन रायझिंग डे च्या अनुषंगाने कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे नगरपरिषद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट देऊन पोलीस स्टेशनच्या कार्यपद्धतीची व विविध विभागातील माहिती जाणून घेतली. तसेच याप्रसंगी शस्त्र प्रदर्शन ठेवण्यात आले होते, त्यामध्ये विविध स्वरूपातील बंदुका मध्ये एस एल आर रायफल, ॲक्शन गन, गॅस गन, हातकडी, लाठी, हेल्मेट व अन्य शस्त्र विषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. वाहतूक नियमाबाबत व गुड टच बॅड टच बाबत सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे, पोलीस उपनिरीक्षक सविता वड्डे, पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे, कळमेश्वर पोलीस स्टेशनच्या महिला समुपदेशक गीता दळवी. व पोलीस स्टेशनचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# हर्षल ढोके प्राईड ऑफ यंग हिंदुस्थान २०२४-२५ या पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ६ :

5 जानेवारी 2025 रोजी यंगिस्तान फाउंडेशन, कल्याण मुंबई द्वारे आयोजित पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आले श्री मिथिलेश झा आणि त्यांच्या महाविद्याला मित्रांनी स्थापन केलेल्या संस्था जे भारतभरातील तरुण विद्यार्थ्यांच्या पाठिंब्याने विविध सामाजिक समस्यांवर कार्य करत आहे.



पुरस्कार वितरण सोहळ्यात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि महिला सुरक्षा यासारख्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १५ सामाजिक कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले.

हर्षल ढोके हे शशी ड्रीम फाऊंडेशनचा संस्थापक आणि काटोल जिल्हा नागपूरचा रहिवासी आहे. वंचित मुलांसाठी मागील 6 वर्षांपासून काम करत आहे आणि ऑनलाइन ट्युशन क्लासेस आणि कम्युनिटी सेंटरद्वारे संपूर्ण भारतभर मोफत आणि दर्जेदार शिक्षण देत आहे.

ते त्यांचे आभारी टीम शशी ड्रीम फाउंडेशनचे आशिष कुमार दास, सिमा कुमारी, लक्ष्मी कुमारी,क्रिष्ना गोयंका, प्रियांशू सुमन, ममता गुप्ता, वृषाली सिंग बायस आणि अध्यक्ष लक्ष्मीकांता नागोरे तागडे यांना दिले.

### डॉ. दळवी स्मारक रुग्णालय व अनुसंधान केंद्र संस्थेची नवी कार्यकारिणी

**नागपूर :** डॉ. राजेंद्र प्रसाद चौक, सेंट्रल एवेन्यूस्थित डॉ. दळवी स्मारक रुग्णालय व अनुसंधान केंद्र संस्थेची कार्यकारिणी मंडळाची ३ वर्ष कार्यकाळाकरिता नव्याने निवडणूक झाली असून नवीन कार्यकारिणी मंडळ जाहीर करण्यात आले आहे.

कमलेश ठवकर (अध्यक्ष), सुभाष गोतमारे (उपाध्यक्ष), मोहन अग्रवाल (उपाध्यक्ष), पुरुषोत्तम घाटोळे (सचिव), रवींद्र भेलोंडे (सहसचिव), श्रीकांत पोटे (सहसचिव), नेऊलकर (कोषाध्यक्ष), डॉ. अनिल राऊत , नाना आखरे, प्रवीण गुप्ता, कन्हैयालाल धाकड, लक्ष्मीदास पटेल, पवनसिंग राजपूत, ताराचंद अग्रवाल, किशोर पटेल हे सर्व सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले.

# प्रबोधनकर ठाकरे विद्यालयात नाटीकेने प्रेक्षक मंत्रमुग्ध

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ६ :

येथील गुरुप्रसाद स्मृती माध्यमिक विद्यालय व गुरुप्रसाद प्राथमिक शाळा आणि मूव्हमेंट २१ संघटनेच्या सहकार्याने क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्ताचे औचित्य साधत सावित्री का सफरनामा "ही नाटिका "मी सावित्रीबाई बोलतेय " हा एकपात्री प्रयोग, "धन्य धन्य सावित्रीमाई"हे गीत, पोवाडाच्या सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे आयोजन मूव्हमेंट संघटना व संस्थेचा संचालिका मीनाक्षी नारायणराव घोडखांदे यांनी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती ( न.प. वाडी ) कल्पना सगदेव होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून विभागीय वन अधिकारी दिपाली तलमले, संस्थेच्या संचालिका मिनाक्षी घोडखांदे, मुव्हमेंट २३ चे सदस्य नगराळे ,मोहोड, प्रबोधनकार ठाकरे शाळेची मुख्याध्यापिका अर्चना डायगव्हाणे, गुरुप्रसाद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा चौधरी उपस्थित होते.

समुह गीत प्रबोधनकार ठाकरे स्मृती माध्यमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षिका मंजुषा भोसे आणि इतर शिक्षिका,शिक्षक यांनी सादर केले.

गुरुप्रसाद प्राथमिक शाळेतर्फे नर्सरी,वर्ग १ ते ४ च्या चिमुकल्यांनी गायन, भाषण व पालकांच्या विविध स्पर्धांचे आयोजन मुख्याध्यापिका प्रज्ञा चौधरी व इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाई यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या संचालिका मीनाक्षी घोडखांदे तसेच दोन्ही शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्माचाऱ्यांनी केले.


### -: जाहिरनामा :-

कोर्ट विद्य. कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालय भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१२०१
E-mail ID-tahsilbhiwapur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक -०७१०६ २३२२४१.
क्र. प्रस्तु-१/तह.भि./कावि १००४/२०२४
दिनांक: २६/१२/२०२४

वाचा :- १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचें कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ २०२३ चा २०) च्या खंड १ आणि उपखंड. ४. मा. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांचे कडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१५८/२०२३ दिनांक ११/०५/२०२४ अन्वये. ५. मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांचे पत्र क्र. प्रस्तु.४/उविअ/- उम/कावि-१५/२०२४. दिनांक ३०/०५/२०२४, अन्वये. ६. अर्जदार श्री. चंद्रमणी नामदेव चव्हाण, राह. मोखाळा तह. भिवापूर जि. नागपूर

ज्याअर्थी अर्जदार श्री. चंद्रमणी नामदेव चव्हाण, राह. मोखाळा तह. भिवापूर जि. नागपूर यांनी त्यांचे स्वतःचे जन्माची नोंद बाबत ग्राम पंचायत, तास ता. भिवापूर येथे दसरी घेणे करीता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहु अर्जदार यांचा जन्म दिनांक ३०/६/१९८६ रोजी मौजा मोखाळा, तह. भिवापूर, जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदहु अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३. ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलांमार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांका पासून तीस दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा नायब तहसिलदार, भिवापूर

जा.क्र./१२४७४/२० ....
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिविल लाईन्स, नागपूर- ०१
नमुना क. ७५ दिनांक : ११/१२/२०२४
आदेशिकावाहका मार्फत
ACC-2

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपुर विभाग, नागपुर.**
**चौकशीची जाहीर नोटीस**
अर्ज कमांक : ३९७/२०२४-१९

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक - हर हर महादेव सेवा ट्रस्ट, भिवापुर, ता.भिवापुर जि.नागपुर द्वारा. - श्री. सुनिल महादेव पुरी, ३९३१, वार्ड न. २, इंदिरा नगर, भिवापुर, ता. भिवापुर जि. नागपुर

श्री. सुनिल महादेव पुरी- अर्जदार.

सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) : रू. ४५००/- सुनिल महादेव पुरी यांचेकडे संस्थेच्या नावाने जमा आहे.

(ब) स्थावर मिळकत (वर्णन): काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयायचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. साहायक धर्मादाय आयुक्त नागपूर, यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी दिली.

अधिक्षक (न्याय शाखा),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

### सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. २२/२०२४
पेशी दिनांक : २१.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६२/२०२५
दिनांक : ४/१/२०२५
अर्जदार : भाग्यश्री सुनिल मलवे,
राह. पो. पिपळा, तह, सावनेर, जि. नागपूर.
---- विरूध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : उमेश चंद्रकांत रोडे

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार उमेश चंद्रकांत रोडे ही मौजा-चाचेर, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार उमेश चंद्रकांत रोडे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. पुष्पलता चंद्रकांत रोडे यांचा मृत्यु दि. १७/०९/२०२४ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २१.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

### सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. २१/२०२४
पेशी दिनांक : २१.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६१/२०२५
दिनांक : ४/१/२०२५
अर्जदार : भाग्यश्री सुनिल मलवे,
राह. पो. पिपळा, तह, सावनेर, जि. नागपूर.
---- विरूध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : पुष्पलता चंद्रकांत रोडे

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार पुष्पलता चंद्रकांत रोडे ही मौजा-चाचेर, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार पुष्पलता चंद्रकांत रोडे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. पुष्पलता चंद्रकांत रोडे यांचा मृत्यु दि. ३०/०५/२०२० रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २१.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

# काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघाचा पाच वर्षात सर्वांगीण विकास होणार : आ. चरणसिंग ठाकूर

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ६ :

ज्याला आपण निवडले तोच आपला तारणारा, समस्या सोडवणारा, परिसराचा विकास करणारा, चरणसिंग ठाकूर हा आमदार नसून कामदार आहे, असा विश्वास काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघातील सर्व गावांमध्ये व जनतेमध्ये प्रचलित आहे.

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आशीर्वादाने मी लोकसेवक म्हणून काम करत आहे, यापूर्वीही केले, आता करतोय, भविष्यातही करत राहीन.




विधानसभा मतदारसंघातील सर्व गावांमध्ये रस्ते, नाले, वीज, पाणी असावे, शेतकरी सुखी-समृद्ध व्हावा, बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी उद्योग उभारले जावे, कोरडवाहू क्षेत्र नष्ट व्हावे, असा संकल्प मी केला आहे. हिरवळीची निर्मिती, एका वर्षात सर्व गावात पांदण रस्ते बांधणे, नंतर खडीकरण, नंतर डांबरिकरण, कन्हान. नदीचे पाणी सावनेर मागार्ने नरखेड सावरगावला आणून पाण्याची समस्या संपवायची आहे.

कार प्रकल्प, जाम प्रकल्प, चिखली प्रकल्पातील पाणी, शेतीकरिता वरदान ठरणार आहे. पुरातन काटोलचे सरस्वती मंदिर, चंडिका मंदिर, ऋषीधरी या ठिकाणी क क्षेत्रात आणून पुरातन मंदिरांचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे मत काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघात अखंड सेवा करण्याचा माझा संकल्प आहे, असे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी सांगितले.

शारदा चौक काटोल येथे कृतज्ञता सभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अध्यक्षस्थानी आमदार चरणसिंग ठाकूर बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्षा वैशाली ठाकूर, लक्ष्मी जोशी, भाजप जिल्हा सरचिटणीस दिनेश ठाकरे, जिल्हा परिषद सदस्य समीर उमप, साहित्यिक प्राध्यापक देविदास कठाणे, जिल्हा उपाध्यक्ष उकेसिंग चौहान, राजू हरणे, नरेश अरसडे आदिंची उपस्थिती होती.

## तरुणाचे अपहरण करण्याचा प्रयत्न

**नागपूर :** वैमनस्यातून चार तरुणांनी एका तरुणाला मारहाण केली. कारमध्ये जबरीने बसवून त्याचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. मात्र अचानक पोलिस दिसल्याने आरोपींनी पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी जिनोद पुसनाके (26) रा. रघुजीनगरच्या तक्रारीवरून ऋषी नरेश पुट्टेवार (33) आणि त्याच्या 3 साथीदारांवर गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी जिनोद आणि ऋषीमध्ये भांडण झाले होते. जिनोदने ऋषीला मारहाण केली होती. तेव्हापासून ऋषी जिनोदला धडा शिकविण्याची योजना बनवत होता. गुरूवारी जिनोद छोटा ताजबाग जवळील एका पानठेल्यावर उभा होता. या दरम्यान ऋषी व त्याचे साथीदार तेथे आले. आरोपींनी जिनोदला मारहाण सुरू केली. जबरीने कारच्या डिक्कीत डांबून अपहरण करण्याचा प्रयत्न करीत असतानाच एक पोलिस कर्मचारी तेथे पोहोचला.

# माझ्या क्षेत्रात निकृष्ट दर्जाची कामे खपवून घेतली जाणार नाहीत : आ .आशिष देशमुख

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर दि. ६ :

तालुक्यातील वाकी या गावात घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात कचरा साठविण्याची टाक्याचे जे बांधकाम सुरू होते, ते काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होते. बांधकामासाठी जो मसाला वापरण्यात येत होता त्यात सिमेंट नव्हते. कोणताही पायवा न खोदता, फक्त भिंत बांधून टाके बांधण्याचे थातूरमातूर काम सुरू होते.



स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांनी सावनेर-कळमेश्वर क्षेत्राचे भाजपाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांना या संदर्भात तक्रार केली. क्षणाचाही विलंब न करता डॉ. आशिष देशमुख वाकी स्थळावर दाखल झाले. त्यांनी तात्काळ बिडीओ आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्या स्थळावर बोलवले. हे काम तावडतोब बंद करून त्यांनी संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात सर्वांसमक्ष आदेश दिलेत. "विकास कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा चालणार नाही. माज्या क्षेत्रात निकृष्ट दजार्ची कामे खपवून घेतली जाणार नाहीत", असे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी यावेळी निक्षून सांगितले. सर्वश्री भाजपा नेते रामराव मोवाडे, अशोक धोटे, रोहित मुसळे, किशोर चौधरी, किशोर मुसळे, नाना गुडधे, प्रमोद पिंपळे, प्रशांत खोरगडे, अनंता पडाळ, अतुल पाटील, राजू पांडे तसेच भाजपाचे अनेक नेते, कार्यकर्ते व गावकरी यावेळी उपस्थित होते.

## रोकड व दागिन्यांसह ३ लाखांचा माल चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

रात्रीला झोपण्यापूर्वी घराचे दार बंद करणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने उघड्या दारातून घरात प्रवेश करीत कपाटातील रोकड व सोन्याच्या दागिन्यांसह एकूण 3 लाख 1 हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी पंकज नारायण खांडेकर (42) च्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

फिर्यादी पंकज हे नरसाळा मार्गावर ब्रम्हानगर परिसरात कुटुंबासह राहतात. शुक्रवारी रात्री संपूर्ण कुटुंबाने सोबत जेवण केले आणि झोपायला गेले. मात्र झोपण्यापूर्वी घराचे मागचे दार बंद करणे खांडेकर कुटुंब विसरले. ही लहानशी चूक कुटुंबाला चांगलीच महागात पडली. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने उघड्या दारातून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटाचे लॉकर उघडून त्यातील सोन्याचे दागिने व रोख 6 हजार रुपये असा एकूण 3.01 लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला. शनिवारी सकाळी कुटुंबाची झोप उघडली असता पंकज यांच्या पत्नीला कपाटाचे हॅन्डल खाली वाकलेले दिसले. संशय आल्याने त्यांनी कपाटात उघडले असता त्यातील दागिने व रोकड गायब होती. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# राष्ट्रीय आदर्शच्या इको क्लबद्वारा स्वच्छता अभियान



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ६ :

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय नवेगाव खैरी येथे संस्थेचे सचिव मयंकराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ४ जानेवारीला शाळेच्या परिसरात असलेल्या पेंच धरणाच्या पारीवर पसरलेल्या घनकचऱ्याचे संकलन करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय आदर्श विद्यालय द्वारा संचालित राष्ट्रीय हरित सेनेच्या इयत्ता पाचवी ते बारावीतील निसर्गदूतांनी सहभाग घेतला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र चन्ने, इको क्लबचे समन्वयक शिक्षक साक्षोधन कडबे यांनी ऋतू बदलाचा अभ्यास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाला अनिल कोल्हे, प्रशांत पोकळे, दिलीप पवार, सतीश जुननकर, शैलेंद्र देशमुख, अमित मेश्राम, अर्चना येरखेडे, प्रा. अरविंद दुनेदार, प्रा. मोहना वाघ, रितेश मैंद, करीना धोटे, कार्यालयीन कर्मचारी गोविंद कोठेकर, लीलाधर तांदुळकर, राशिद शेख, मोरेश्वर दुनेदार हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील समस्त विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# नागपूर उपविजेता तर ठाणे तृतीय

## आदिवासी विकास राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा -१ हजार ८७० खेळाडूंनी सहभाग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

आदिवासी विकास विभाग राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाच्या समारोप दिवशी नागपूरच्या हँडबॉल संघाने (१९ वषार्खालील मुले) विजयश्री खेचून आणली व एकूणच झालेल्या स्पर्धेच्या गुणांकना नागपूर द्वितीय स्थानावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आदिवासी विकास विभाग राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचे बक्षीस वितरण पोलिस लाईन टाकळीतील पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर शानदार समारंभात पार पडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सर्वाधिक ४७५ गुण सर्वसाधारण विजेता ठरलेल्या नाशिक विभाग संघाला तसेच ४५४ गुण घेऊन उपविजेता ठरलेल्या नागपूर संघाला व २८१ गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकाविलेल्या ठाणे विभाग संघाला मान्यवरांच्या उपस्थितीत चषक देऊन गौरविले.पाहुण्यांच्या आगमन प्रसंगी मुख्य प्रवेशद्वारापासून ते मंचापर्यंत चंद्रपूर प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी ढोल ताशाच्या साह्याने स्वागत केले. नागपूर येथील सेंट उसुर्ला हायस्कूलच्या विद्यार्थिनीने बांबू नृत्य सादर केले. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नागपूर, ठाणे व अमरावती या चार विभागातील ३० प्रकल्पातील ९७४ मुले व ८९६ मुली असे एकूण १ हजार ८७० खेळाडूंनी सहभाग घेतला.



व १९ वर्षे वयोगटात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, रिले या सांघिक खेळासह लांबउडी, उंचउडी, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक , धावणे आदी वैयक्तिक खेळ पार पडले. आदिवासी विभाग राज्यात ४९७ शासकीय आश्रम शाळेत २ लाख १ हजार ३९८ विद्यार्थी शिकत असून ५५३ अनुदानित आश्रम शाळेत २ लाख ५२ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यात आदिवासी विकास विभाग अंतर्गत ४९० वसतीगृह असून ५६ हजार विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. आश्रम शाळेत शिकत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये त्यांच्या असलेले कौशल्य व नैपुण्यता दाखविण्याची एक संधी प्राप्त झाली होती.

नागपूर विभागातील शासकीय आश्रम शाळेमध्ये राबविल्या जात असलेल्या ब्रायटर माईंड, मेमरी इन्हान्समेंट, बोलका वर्ग या उपक्रमाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. यावेळी मंचावर आश्रम शाळेया विद्यार्थ्यांनी ब्रायटर माईंड उपक्रमाचे सादरीकरण करून दाखविले व उपस्थितांना केले.

# अशोका बुद्ध विहारात सावित्रीबाई फुले जयंती

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ६ :

लाव्हा ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या अशोका बुद्ध विहारात सावित्रायबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम दीप प्रज्वलन करुन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी लाव्हा ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अनिल पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य श्रुक्राचार्य मेश्राम, सुनीता मेश्राम, किरण पाटील, छाया शेंडे जोती भोतकर, बेबी जामनिक, यशोधरा गजभिये, माधुरी हाडके, बंडू भोतकर, सिद्धार्थ घोडेस्वार, विजय गजभिये व बुद्ध उपासक, बुद्ध उपासिका हजर होते.

प्रास्तविक मुकुंद हाडके यांनी तर आभार सुरेश भाबळे यांनी मानले.

# हिंगणा तालुक्यातील पिक आणेवारी ५० टक्केवर दाखवल्याने शेतकऱ्यांचा आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ६ :

काही वृत्तपत्रात अंतिम आणेवारीत नागपुर जिल्ह्यातील पिक परिस्थिती उत्तम असल्याबाबत चे वृत्त प्रसारीत झाले. त्या अनुषंगाने संपुर्ण हिंगणा तालुक्यातील शेतकरी विवचनेत सापडला आहे. प्रत्यक्षात हिंगणा तालुक्यातील परिस्थिती वेगळी असतांना ही आणेवारी संबंधित कृषी व महसूल विभागाने कुठून आणली? हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. सदर वृत्ताची नोंद भाजपा नागपुर जिल्हा उपाध्यक्ष विशाल भोसले ह्यांनी घेवून, तालुक्यातील विविध गावांतील सरपंच, शेतकरी आणी ग्रामपंचायतीचे ठराव घेवुन हिंगणा तहसिलदार सचिन कुमावत यांना निवेदन देण्यात आले.




हिंगणा तालुक्यात आधीच अतिवृष्टीने पिके पिवळी पडली असुन, कपाशी, तुर, चना इत्यादी खरीप पिके निस्तनाबुत झाली आहेत. त्यातही शेतमालाला सुयोग्य भाव नाही. एकरी उत्पादनात मोठी घट झाली आहे.

सिंचनाची पुरेशी व्यवस्था व निसर्गाच्या लहरीपणाने हिंगण्यातील शेतकरी वर्ग आधीच डबघाईस आला आहे. अश्यातच महसुल विभागाने अंतिम आनेवारी ५० टक्के च्या वर घोषीत केली असल्याने शेतक-यांत संभ्रम निर्माण झाला आहे. अशा खोट्या आणेवारीमुळे , हिंगणा तालुक्यातील संपुर्ण शेतकरी शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहतील. त्यामुळे शेतक-यांनी परत फेर सर्वेक्षण करण्याची मागणी निवेदनात लावून धरली आहे.

सदर निवेदन जिल्हा भाजप उपाध्यक्ष विशाल भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली देण्यात आले. यावेळी ग्रा.पं. कवडस सरपंच उषा सावळे, सरपंच ग्रा.पं. अडेगांव माधुरी ऊईके, घोडेघाटचे शुभम उडाण सरपंच, सुदाम तेलंग, पंकज तेलंग, संजय बाजनघाटे, सुरज नेहारे, प्रभाकर कडू तथा शेतकरी बंधु उपस्थित होते.

# कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात वेदांग ज्योतिष विभागाद्वारे आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ६ :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागा द्वारे दिनांक ७-०१-२०२५ सायं ०४:०० वाजेपासुन ते ०७:३० पर्यंत विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

खगोलप्रेमींसाठी विशेष पर्वणी आहे. आज संध्याकाळी ७ च्या दरम्यान सात चंद्र एकाच वेळेला बघता येणार आहे. सूर्यमालेतील सात ग्रह बघण्याचा दुर्मिळ अनुभव मिळणार आहे. या अनोख्या नजराण्या साठी कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या ज्योतिष विभागाने विशेष तयारी केली असून या आकाश दर्शन कार्यक्रमात तारामंडल आणि दुर्बिणीद्वारे आकाशीय ग्रह-नक्षत्रांचे दर्शन घडवले जाईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी भूषवतील. तसेच कुलसचिव डॉ.देवानंद शुक्लजी, प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्य शास्त्र संकायाचे अधिष्ठाता प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख डॉ. दिनकर मराठे आणि वेदांग ज्योतिष विभागाचे प्रो. प्रसाद गोखले जी, सहा.प्राध्यापक डॉ.आशीष जे., डॉ.अंबालिका सेठिया, डॉ.हृषीकेश साहू, अनुज प्रदीप शर्मा, कल्याणी डहाळे उपस्थित राहतील.



**हिंगणा :** वानाडोंगरी येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

# क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू तयार करा : सचिन गाढवे

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ६ :

बालवयातच शिक्षणासोबतच खेळाचे सुध्दा अनन्यसाधारण महत्त्व आहे. धर्मराज प्राथमिक शाळेत आयोजित क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू तयार करावे, असे आवाहन कांद्री नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन गाढवे यांनी केले.

धर्मराज प्राथमिक शाळेत आजपासून (ता ६) चार दिवसीय आंतर वर्गीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन कांद्री नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन गाढवे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विधिलाल डहारे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कन्हान नगर परिषदेचे उपाध्यक्ष योगेश रंगारी, मुख्याध्यापक खिमेश बढिये, ज्येष्ठ शिक्षक दिनेश ढगे, पालक प्रतिनिधी ज्ञानेश्वर वैद्य उपस्थित होते.



यावेळी पाहुण्यांच्या उपस्थितीत वर्ग चौथीच्या अ व ब वर्गाचा कबड्डीचा दर्शनीय सामना खेळविण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना श्री गाढवे म्हणाले, धर्मराज शाळेने शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रशासकीय कामात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

नवनवीन शैक्षणिक उपक्रमासोबत विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असून हे कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शक्य ते योगदान देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी उपस्थितांनी सुध्दा समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक खिमेश बढिये यांनी करुन शाळेच्या प्रगतीची व क्रीडा महोत्सवाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन गणेश खोब्रागडे यांनी तर आभार भिमराव शिंदेमेश्राम यांनी मानले. क्रीडा महोत्सव २०२४ चे आयोजन क्रीडा समितीचे सदस्य अमीत मेंघरे, गणेश खोब्रागडे, कु शारदा समरीत, कु हर्षकला चौधरी यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९४ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (6) रोजी शोध पथकाने 94 प्रकरणांची नोंद करून 45,700/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 40 प्रकरणांची नोंद करून 16,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 400 रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 9 प्रकरणांची नोंद करून 3,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 19 प्रकरणांची नोंद करून 143,500/- रुपयांची वसुली करण्यात आली.



वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 16 प्रकरणांची नोंद करून 3,200/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 3 प्रकरणांची नोंद करून 3,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मी नगर झोन अंतर्गत नितीन रक्षक यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत श्री. गुरूमुख सिंग भसिन (बिल्डर्स) यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. नेहरूनगर झोन अंतर्गत मे. आकरे पेपर वर्कस यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

तसेच मे. गाडबैल डेंटल हॉस्पिटल यांनी मनपा यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. सतगुरु स्विट भंडार यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. गणेश सोन पापडी यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. मंगळवारी झोन अंतर्गत मे. 7 - बुटीक अर्पाटमेंट यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

# २८ जानेवारीपासून अभाविपचे विदर्भ प्रांत अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांताचे 53 वे प्रदेश अधिवेशन दि. 28, 29, 30 जानेवारी रोजी स्मृतिमंदिर परिसर, रेशीमबाग मैदान येथे होणार असून या अधिवेशनात संपूर्ण विदभार्तून 2000 विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती स्वागत समिती सचिव आशीष उत्तरवार यांनी रविवारी पत्रपरिषदेतून दिली.



## स्वागत समिती सचिव आशीष उत्तरवार यांची माहिती

यावेळी सुप्रसिद्ध उद्योजक व स्वागत समितीचे अध्यक्ष वीरेंद्र कुकरेजा, प्रा. अभय मुद्गल, पायल किनाके, दुर्गा भोयर व अबुजर हुसेन उपस्थित होते. प्रा. अभय मुद्गल म्हणाले, हे अधिवेशन विदभार्तील तरुणाईला नवी ऊर्जा व दिशा देणारे ठरणार असून या अधिवेशनात विदर्भाच्या 120 तालुके व 119 मोठे केंद्र अशा एकूण 239 स्थानांवरील 550 महाविद्यालयातून 2000 विद्यार्थी प्रतिनिधी सहभाग घेणार आहेत. नागपुरातील पावनभूमीवर तब्बल 13 वषार्नंतर विदर्भ प्रांताचे अधिवेशन होत असून विदर्भातील विविध जिल्ह्यांच्या माध्यमातून वैदर्भीय संस्कृतीचे दर्शन यात होईल, असे विदर्भ प्रदेश मंत्री पायल किनाके यांनी यावेळी सांगितले.

या अधिवेशनादरम्यान भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार असून यात्रेचा शेवट जाहीर सभेने होणार आहे. या जाहीर सभेच्या मंचावरून विदर्भ प्रांतातील छात्रनेते विविध विषयांवर भाषण देतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली. तसेच सामाजिक एकता ही या अधिवेशनाची संकल्पना आहे. अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष म्हणून शहरातील सुप्रसिद्ध उद्योजक वीरेंद्र कुकरेजा जबाबदारी पार पाडतील तर सचिव आशिष उत्तरवार असतील.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी खासदार अजय संचेती, दत्ता मेघे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सेवानिवृत्त न्यायाधीश मीरा खडक्कार, डॉ. उपेंद्र कोठेकर, माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर, महाराष्ट्र बार कौन्सिलचे अध्यक्ष पारिजात पांडे, आमदार मोहन मते, आमदार प्रवीण दटके संरक्षक म्हणून भूमिका पार पाडतील, असे आशीष उत्तरवार म्हणाले. युवा म्हणजे भविष्यातील भावी नेतृत्व आणि ते नेतृत्व या अधिवेशना दरम्यान विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून नागपूरला येणार आहेत. ही नागपूरकरांना लाभलेली मोठी संधी आहे.

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीकडून देहव्यवसाय

* गंगा स्पा सेंटरमध्ये एसएसबीची धाड
* पती-पत्नी चालवत होते कुंटणखाना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

शिक्षणासाठी येणारा खर्च कसा पूर्ण करायचा, कुठून पैसे आणायचे, असा प्रश्न तिच्यासमोर उभा झाला. ती मसाज पार्लरच्या नावावर देह व्यवसायाचे रॅकेट चालविणाऱ्या दाम्पत्याच्या संपर्कात आली. आरोपी पती-पत्नीने तिला पैशांचे आमिष दाखवून देहविक्रीच्या नरकात ढकलले. ते तिच्याप्रमाणेच इतरांकडून देह व्यवसाय करून घेत होते.

दरम्यान गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी) ला माहिती मिळाली आणि मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या कुंटणखाण्यावर धाड टाकण्यात आली. पोलिसांनी विद्यार्थिनीसह 4 पीडितांची सुटका केली. गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. नवीन सिंग (37) रा. अमरनगर, सोनेगाव असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याची पत्नी विद्या हिचा पोलिस शोध घेत आहेत.

पीडित विद्यार्थिनी अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षाला आहे. आरोपी दाम्पत्याचे सोनेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोमलवाडा येथे गंगा स्पा सेंटर नावाने मसाज पार्लर आहे. या ठिकाणी बॉडी मसाज केली जाते. मात्र, वास्तवात मसाजच्या नावाखाली महिला व मुलींना देहव्यापारासाठी ग्राहकांना उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती एसएसबीच्या पथकाला मिळाली.

पोलिस निरीक्षक कविता ईसारकर यांच्या नेतृत्वातील पथकाने सापळा रचला. ग्राहक बनवून एका पंटरला पाठविले. सौदा पक्का होताच त्याने पथकाला ईशारा केला. दबा धरून बसलेल्या पथकाने पार्लरमध्ये धाड मारली. यावेळी एक विद्यार्थिनी आणि 3 महिला मिळून आल्या. चौकशीत आरोपी नवीन हा पत्नीच्या मदतीने देह व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाले. सिंग दाम्पत्य पैशांचे आमिष देवून, पीडित व ग्राहकांना जागा उपलब्ध करून देह व्यवसाय चालवित होते. आरोपी नवीन सिंग याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक मोबाईल, रोख साडेचार हजार, डीव्हीआर व ईतर साहित्य असा एकूण 58 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. आरोपीस मुद्देमालासह सोनेगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनात एसएसबीच्या पोलिस निरीक्षक कविता ईसारकर, पोहवा सचिन बढीये, प्रकाश माथनकर, लक्ष्मण चौरे, अजय पौनिकर, नितीन वासने, लता क्षीरसागर यांनी केली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत ऑटो चालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

अज्ञात वाहनाच्या धडकेत एका ऑटो चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही दुदैर्वी घटना हिंगणा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. रोशन राजूसिंग ठाकूर (38) रा. मोतिबाग असे मृताचे नाव आहे. रविवारी सकाळी 8 वाजताच्या सुमारास रोशन आपला एमएच-31/एबी-2634 क्रमांकाचा ऑटो घेऊन डोंगरगावकडून वर्धाकडे जात होते. या दरम्यान अज्ञात वाहनाच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या ऑटोला जबर धडक दिली आणि पळून गेला. रोशन गंभीर जखमी झाले. त्यांच्या ऑटोचाही चुराडा झाला होता. रस्त्याने ये-जा करणाऱ्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. रोशन यांना उपचारार्थ एम्स रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी रोशनचे नातेवाईक शेख नासिरच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# महाराष्ट्रात चिकुनगुनियाचा फैलाव

## नागपूरमध्ये सर्वाधिक संसर्ग, मुंबई दुसऱ्या क्रमांकावर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

राज्यात चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक ५,७५७ रुग्ण २०२४ मध्ये सापडले आहेत. त्यात पहिल्या क्रमांकावर नागपूर शहर आणि दुसऱ्या क्रमांकावर मुंबई आहे. यंदा रुग्ण मोठ्या संख्येने वाढल्याने वैद्यकीय वतुर्ळात तो चर्चेचा विषय झाला आहे.



चिकुनगुनिया हा विषाणूजन्य आजार एडिस इजिप्ती आणि एडिस अल्बोपिक्टस डासांच्या संक्रमित मादीपासून फैलावतो. डेंग्यूसारखी लक्षणे असली तरी या आजारासाठी भिन्न उपचारांची आवश्यकता असते. राज्याच्या आरोग्य विभागामार्फत रुग्ण शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

### महाराष्ट्रात सर्वाधिक रुग्ण

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ पर्यंत चिकुनगुनिया रुग्णांची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार या आजाराचे १२,५८७ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ४,७९२ रुग्ण महाराष्ट्रात आढळले. तर दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आहे. तेथे २,२१३ रुग्ण आढळले आहेत.

### लक्षणे काय?

रुग्णाला दोन ते बारा दिवस जास्त ताप येतो. सांधे दुखतात, काही रुग्णांमध्ये वेदना अनेक आठवडे, महिनेही टिकतात. सांध्यांना सूज येते. आजारपणाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी अंगावर पुरळ येतो. डोकेदुखी, डोके दाबल्यासारखे जाणवते. यापूर्वी या आजाराचे रुग्ण राज्याच्या ग्रामीण भागात आढळत असत. आता मुंबईतही त्यांची संख्या वाढली आहे. या आजारात लक्षणानुसार औषध दिले जाते. आजूबाजूच्या परिसरात डास होणार नाही, याची दक्षता घ्या, डासांपासून संरक्षण करा. कुठल्याही प्रकारचा ताप आणि अंगदुखी असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# मधुमक्षिका पालन प्रशिक्षण उपक्रमाबाबत अर्ज करण्यास मुदतवाढ

**नागपूर:** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, (सारथी) पुणे ही संस्था महाराष्ट्र राज्यतील मराठा, कुणबी, कुणबी मराठा, मराठा - कुणबी या लक्षित गटाच्या विद्यार्थ्यांकरिता सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी नियोजन विभागाच्या अधिपत्त्याखाली स्थापन करण्यात आलेली आहे. या संस्थे मार्फत शेतकरी युवक/युवती यांना सारथी संस्थेच्या खर्चाने केंद्रीय मधमाशी संशोधन, प्रशिक्षण संस्था, शिवाजीनगर पुणे व मध संचनालय, महाबळेश्वर सातारा या प्रशिक्षण संस्थे मार्फत मोफत मधमाशी पालन प्रशिक्षण देण्यात येत असून, त्या करिता अर्ज मागविण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अर्ज करण्यासाठी शेवटची तारीख ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

# बांधकाम स्थळावरून २ लाखांचा माल चोरी

**नागपूर :** अज्ञात आरोपीने एका बांधकाम स्थळावरून दोन लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी शुभम हिरालाल मोहने (27) रा. विद्यानगर, वाठोडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. शुभम बांधकामाचे कंत्राट घेतो. नंदनवनच्या गोपाळकृष्णनगरात त्याचे बांधकाम सुरू होते. बांधकामाशी संबंधित साहित्य साईटवरच एका खोलीत ठेवले होते. रविवारी बांधकाम बंद होते. ही संधी साधून अज्ञात आरोपीने खोलीचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत ग्राईडर मशीन, कटर मशीन, बेसिंग मिक्सर, डाय कटर व इतर साहित्य असा एकूण 2 लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला. सकाळी शुभम साईटवर आला असता साहित्य चोरी झाल्याचे समजले. त्याने घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# आंतरराष्ट्रीय विमानतळ विस्तारीकरणासाठी महसूल संदर्भात कामांची तत्काळ पूर्तता करू : जिल्हाधिकारी डॉ. इटनकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ विस्तारीकरणाच्या माध्यमातून येथील औद्योगिक क्षेत्रासह रोजगार निर्मितीला मोठा हातभार लागणार आहे. या विस्तारीकरणात भारतीय वायुदलाकडील जमिनीचा समावेश असल्याने त्यांना हस्तांतरीत केलेल्या नवीन जागेवर स्थलांतरीत होण्यासाठी ज्या काही प्रलंबित बाबी आहेत त्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी तथा सहव्यवस्थापकीय संचालक, म.वि.वि.कं.मर्या. नागपूर यांनी आज भारतीय वायुदलाच्या सोनेगांव येथील कार्यालयात आज व्यापक बैठक ठेवून आढावा घेतला.

विदर्भाच्या विकासातील एक प्रमुख मापदंड म्हणून ज्याकडे पाहिले जात आहे.

त्या या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचे काम हे कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी जमिनीचे पूर्ण हस्तांतरण व इतर बाबीची पूर्तता तत्परतेने होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिवणगाव येथील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाणात त्वरीत स्थलांतरीत करण्याबाबत व संपादीत जागेवरील अतिक्रमीत बांधकामे हटविण्याबाबत त्यांनी सक्त निर्देश दिले.

त्यांनी यावेळी विमानतळ विस्तारीकरणात येणाऱ्या व भारतीय वायुदलास हस्तांतरीत केलेल्या जागेची भारतीय वायुदल, मिहान इंडिया लि.चे व म.वि.वि.कं.चे अधिकारी यांच्या समवेत संयुक्त पाहणी केली.

# आज आकाशात बघता येणार एकाच वेळेला सात ग्रह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागाद्वारे ७ जानेवारीला मंगळवारी सायंकाळी ४ वाजता रामटेक परिसरात आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. खगोलप्रेमींसाठी ही विशेष पर्वणी आहे. सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान सात ग्रह एकाच वेळेला बघता येणार आहे. सूर्यमालेतील सात ग्रह बघण्याचा दुर्मिळ अनुभव मिळणार आहे. या अनोख्या नजराण्यासाठी कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या ज्योतिष विभागाने विशेष तयारी केली असून या आकाश दर्शन कार्यक्रमात तारामंडल आणि दुर्बिणीद्वारे आकाशीय ग्रह-नक्षत्रांचे दर्शन घडवले जाईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी भूषवतील. तसेच कुलसचिव डॉ. देवानंद शुक्लजी, प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्य शास्त्र विभागाचे अधिष्ठाता प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख डॉ. दिनकर मराठे आणि वेदांग ज्योतिष विभागाचे प्रो. प्रसाद गोखले जी, सहा. प्राध्यापक डॉ. आशीष जे., डॉ. अंबालिका सेठिया, डॉ. हृषीकेश साहू, अनुज प्रदीप शर्मा, कल्याणी डहाळे प्रामुख्याने उपस्थित राहतील.

नभोमंडपात ग्रह-तारकांचा अनोखा मेळा एकत्र बघता येणार आहे. विशेष म्हणजे आगामी ७ जानेवारीला सुमारे सात घटनांचा संगम अनुभवण्याची संधी मिळणार आहे. नव्या वर्षाच्या सुरुवातीला ७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास सूर्यमालेतील सात खगोल, सात राशी, नक्षत्र समूहातील सातव्या पुनर्वसू नक्षत्राचे, सात तारकांच्या सप्तर्षीचे उदय समयाला, सात बहिणींच्या व सात तारकांच्या कृत्तिका नक्षत्राच्या उपस्थितीत, सात चंद्र दर्शनाचा हा अनोखा सोहळा होणार आहे. सूर्यमालेतील सात ग्रह बघता येतील. यावेळी पृथ्वीवरुन पश्चिमेस शुक्राची तेजस्वी चांदणी २५ अंशावर, जरा वर शनी ग्रह ३५ अंशावर कुंभ राशीत, नंतरचा नेपच्यून ४७ अंशावर आणि आकाश मध्याशी अष्टमीचा अर्धा चंद्र ७५ अंशावर मीन राशीत, नंतर पूर्वेस वर युरेनस ७४ अंशावर मेषेत, त्याचे जवळचा ठळक गुरु ग्रह ५६ अंशावर वृषभ राशीत रोहिणी जवळ आणि पूर्व क्षितिजावर उदित लालसर मंगळ ग्रह कर्क राशीत असेल.

# सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिलांकरिता कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

सावित्रीबाई फुले यांच्या जयंती व नारी मुक्ती दिवस निमित्त आज प्रधानमंत्री आवास योजना 63 बिल्डिंग नंबर 23 च्या समोर नारीशक्ती सेवा संघटन द्वारा महिलांकरिता कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकता मृणाल यादव, प्रदीप चौधरी उपस्थित होते. संघटनच्या प्रमुख कल्पनाताई चव्हाण, गुंजन काळे आणि नीताताई बुलाखे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.



सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. सोबतच नवीन वर्षाच्या अनुषंगाने सर्व महिलांना कॅलेंडर वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता किरण गुप्ता, भारती वाकचौरे, भावना भोगे, ज्योती मरगडे, वंदना येवले, अर्चना चरडे, श्वेता दिवाण, शुभांगी उमरेडकर, रत्नमाला साखरकर, कविता देशमुख, कविता कातवटे, अर्चना मोहिते, वंदनाताई कडू ,दीक्षा रामटेके इतर महिलांनी आपला सहयोग दिला.

# तडीपार गुंड गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

गुन्हे शाखा युनिट 1 च्या पथकाने एमआयडीसी ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून एका तडीपार गुंडाला विना परवानगी शहरात फिरताना अटक केली. राजेश गौतम तलवारे (31) रा. वाडी असे अटकेतील गुंडाचे नाव आहे.

राजेश हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहेत. त्याच्या गुन्हेगारीची लगाम कसण्यासाठी परिमंडळ क्र. 1 च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला गत डिसेंबर महिन्यात नागपूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले होते.

त्यानंतरही राजेश विना परवानगी शहरात फिरत होता. शनिवारी दुपारी 2.20 च्या सुमारास गुन्हे शाखेचे पथक एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते.

या दरम्यान एक तडीपार गुंड बजाज चौक ते टोल नाक्यादरम्यान फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिस तेथे पोहोचले असता राजेशने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून राजेशला ताब्यात घेतले.

पोलिस ठाण्यात नेऊन त्याचा अभिलेख तपासला असता तो तडीपार असल्याची माहिती मिळाली. त्याच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# पत्रकार भवनात आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या 213 व्या, जयंतीनिमित्त 6 जानेवारीला, टिळक पत्रकार भवनातील त्यांच्या अर्धपुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. हा दिवस मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्व पत्रकारांची उपस्थित होती. टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे उपाध्यक्ष व व्यवस्थापक प्रभाकर दुपारे यांनी जांभेकरांना अभिवादन करून माल्यार्पण केले. याप्रसंगी हरीश तिवारी, योगेश पांडे, दिलीप कांबळे, भीमराव लोणारे तसेच ज्येष्ठ पत्रकार राजीव जोशी यांची उपस्थिती होती.

# विदर्भ विज्ञान उत्सवाचा यशस्वी समारोप



**विज्ञान मॉडेल स्पर्धा विजेते:**
यथार्थ जानईकर, सार्थक आठवले, सोहम ठाकरे, सई नवलाखे, खुशी अग्रवाल, साई कठाणे, नवाज खान,स्वाती डोमले, शोभम ढाकणेकर, दीपक कांबळे, साहिल गोस्वामी, आरव दहीभात, अभिनव चव्हाण, निधी तायडे, अवनी देशमुख, अमित मलंगी यांनी विज्ञान मॉडले स्पर्धेत विविध गटात पारितोषिके पटकावली.

**पोस्टर स्पर्धेचे विजेते:**
नव्या सिंग, नेहा दिवे, अमरज्योत डोडियाल आणि चांदनी मन्सुरी

**रांगोळी स्पर्धेचे विजेते:**
आस्था सोंढिया, गार्गी गायकवाड, ओशिन लांजेवार आणि अनुष्का मानकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

विज्ञान भारती, विदर्भ प्रदेश मंडळ, एल.ए.डी. व आर पी कॉलेज फॉर वुमन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त वतीने एलएडीच्या शंकर नगर कॅम्पसमध्ये आयोजित विदर्भ विज्ञान उत्सवाचा समापन समारंभ दिमाखदारपणे पार पडला. व्यासपीठावर नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, एम्सचे संचालक डॉ. प्रशांत जोशी, व्हीएनआयटीचे संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, विभाचे उपाध्यक्ष रामकृष्ण, डब्ल्यूइएसचे उपाध्यक्ष डॉ. अविनाश देशमुख, आणि एलएडीच्या प्रभारी प्राचार्या डॉ. रिजुता बापट यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. प्रशांत काकडे यांनी राष्ट्रीय स्तराचे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. डॉ. पटेल यांनी उद्योजकतेशी संबंधीत चार ते पाच नावीन्यपूर्ण प्रकल्पांवर भाष्य केले. डॉ. प्रशांत जोशी म्हणाले, अशा आयोजनांमुळे भविष्यात भारताचे नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कलागुणांना उजाळा मिळू शकतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक शंकरराव तत्ववादी यांनी उपस्थितांशी संवाद साधला व विज्ञान भारतीच्या दूरदृष्टीचे कौतुक केले.

या उपक्रमात नागपूरमधील अनेक शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह 7,000 हून अधिक लोकांनी उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रागिणी झलके यांनी तर महोत्सवाचा सर्वसमावेशक आढावा डॉ. प्रकाश इटनकर यांनी केला. वर्षा मेंढे यांनी आभार मानले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेंद्र सातफळे, राजेश कारेमोरे, किशोर भुरचुंडी, गिरीश जोशी, डॉ. सुनील भट, रोहित गणोरकर, आशिष जैन, सतीश घारे, मनीषा घारे, वसुंधरा साठे, माधुरी देहेडकर, पाणिनी तेलंग, संकेत जोशी, साकेत पांडे, अनुजा मैत्रेय, सुयोग गुर्जर, मृणालिनी कुंभारे, राजीव चांदूरकर आणि समीर रावले यांचे सहकार्य लाभले. डॉ. पी. पाठक, डॉ. एस. सप्रे, ए. लिहितकर आणि एस. अनवाणे यांच्या मार्गदर्शनात व्ही. गाडे, एनएसएस स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# वर्धमाननगरात डॉक्टरच्या घरी चोरी

**नागपूर :** चोरांनी खिडकीची ग्रील तोडून एका डॉक्टरच्या घरात प्रवेश केला. रोकड, दागिने व विदेशी चलनासह लाखो रुपयांचा माल चोरून नेला. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत वर्धमाननगर परिसरात घडली. वर्धमाननगरच्या श्रेयश उद्यानाजवळ डॉ. जुगल वृंदावन तापडिया यांचा बंगला आहे.

गत शुक्रवारी तापडिया घराला कुलूप लावून कुटुंबासह राजस्थान येथे फिरायला गेले होते. या दरम्यान चोरांनी खिडकीची ग्रील तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटाचे कुलूप तोडून लॉकरमध्ये ठेवलेली 4 लाखांची रोकड, सोन्याचे दागिने, 1.38 लाख रुपये किंमतीचे अमेरिकन डॉलर आणि 18 हजार रुपये किंमतीचे कॅनेडियन डॉलर चोरून नेले. शनिवारी सकाळी तापडिया यांचा माळी रोपट्यांना पाणी आणि स्वच्छता करण्यासाठी आला असता खिडकीची ग्रील तुटलेली दिसली. त्याने तत्काळ तापडिया यांना माहिती दिली. तापडिया यांनी जवळच्या नातेवाईकांना घरी जाऊन पाहण्यास सांगितले. आत कपाटातील सर्व सामान अस्तव्यस्त पडून होते. दागिने व रोकड गायब होती. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. लकडगंज पोलिस घटनास्थळी पोहोचले. चोरांनी घरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची डीव्हीआरही चोरून नेली होती, त्यामुळे चोरांचा सुगावा लागू शकला नाही. रेकी करून ही घरफोडी केल्याचा अंदाज आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.